# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १०/२००६.** **दिनांक १४.१०.२००६**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी २.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक १५ऑक्टोबर, २००६ रोजी दुपारी २.३० वाजता शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१३९०३-२००६, दिनांक ०७ऑक्टोबर, २००६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

परंतू काही अपरिहार्य कारणास्तव सदरहू सभा रविवार दिनांक १५ऑक्टोबर,२५००६ रोजी दुपारी २.३० वाजेऐवजी शनिवार दिनांक १४ऑक्टोबर,२००६ रोजी दुपारी २.३० वाजता शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१४०३७-२००६, दिनांक १०ऑक्टोबर, २००६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे |
| ०३. | मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग | ०४. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. |
| ०५. | मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव | ०६. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे |
| ०७. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर | ०८. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर |
| ०९. | मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय | १०. | मा.डॉ.पी.एल.तिवारी |
| ११. | मा.श्री कैलास गोविंदराव कोते | | |

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील, मा.श्री. रमाकान्त गणेश कर्णिक व मा.श्रीमती रिम्पल लोहिया यांनी दूरध्वनीद्वारे तसेच श्री प्रकाश रामदास काळे, मा.श्री मा.श्री समि खतिब, मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा यांनी पत्र व फॅक्सव्दारे कळविले आहे, त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर संस्थानचे मा.उपाध्यक्ष, श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, यांची अखिल भारतीय साखर महासंघाचे उपाध्यक्षपदी निवड झालेबद्दल तसेच त्यांनी सहकार क्षेत्रात उल्लेखनिय काम केल्याबद्दल इफको संस्थेच्या वतीने देण्यात येणारा "सहकाररत्न"पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थानचे मा.अध्यक्ष,आमदार श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांनी त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१.** **व्यवस्थापन समितीचे दि.१६.०९..२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७८४.** व्यवस्थापन समितीचे दि.१६.०९.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रति सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**(०१)** निर्णय क्र. ६८७ अन्वये नगर-मनमाड रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण कामाचे ठेकेदार मे.न्यु महावीर कंन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या भाव फरक (Price Escalation ) बिलाबाबत ठरल्यानुसार मा.श्री.फकीर सो., यांना व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उपस्थित राहणेसाठी दूरध्वनीवर विनंती करण्यात आल्याचे, तसेच त्यावेळीमा.श्री.फकीर सो., यांनी त्यांचे पूर्वनियोजीत कार्यक्रमामुळे सभेस उपस्थित राहता येणार नाही असे सांगितले बाबत माहिती मा.कार्यकारी अधिकारी यांनी आजचे सभेपुढे दिली. त्यावर मा.अध्यक्ष सो., यांनी मा.श्री. फकीर सो., यांचेशी दूरध्वनीवर चर्चा केली. सदरहू चर्चेत "पाच महिन्याचे काम पंचवीस महिने चालले. या कालावधीत झालेली भाववाढ ठेकेदारास देणे आवश्यक आहे. चुकीची निविदा व संस्थानच्या जून्या वास्तूविशारदाच्या चुकीमुळे ठेकेदार कोर्टामार्फत विविध मागणीपोटी संस्थानवर एक कोटी ची मागणी करू शकतो. त्यासाठी ठेकेदाराला मी तयार करून पाठविलेले भाववाढीचे रू.१५.१० लक्ष्याचे देयक दिले तर ते संस्थानच्या फायद्याचे आहे". असे सांगितल्याचे मा.अध्यक्ष महोदय यांनी विषद केले. त्यावर सविस्तर चर्चा होऊन मा.श्री.फकीर सो, यांचे अभिप्रायानुसार ठेकेदार मे.न्यु महावीर कन्स्ट्रक्शन यांना रु. १५.१० लक्ष मात्र रकमेचे भाववाढीचे देयक अदा करण्यात यावे असे ठरले.

**(०२) निर्णय क्र.७३० मध्ये -**

" .. .. यावर साधक-बाधक चर्चा होऊन, संस्थान वकीलांनी दिलेल्या अभिप्रायाचा विचार करुन, संबंधीत संस्थेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा-तथा-विचारविनिमय करुन, योग्य तो बदल करारनाम्याच्या प्रारुप मसुद्यात करणेत यावा. अशा सुधारीत करारनाम्याच्या प्रारुप मसुद्यास मान्यता देण्यात येत आहे. "

**<u>याऐवजी</u>**

" ........यावर साधक-बाधक चर्चा होऊन, संस्थान वकीलांनी दिलेल्या अभिप्रायाचा विचार करुन,संबंधीत संस्थेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा-तथा-विचारविनिमय करुन, योग्य तो बदल करारनाम्याच्या प्रारुप मसुद्यात करणेत यावा. अशा सुधारीत करारनाम्याच्या प्रारुप मसुद्यास मान्यता देण्यात येत आहे. याप्रमाणे करारनामा संपन्न झालेनंतर, करारनाम्यातील अटी-शर्ती नुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित, मुंबई / पुणे यांना पहिल्या टप्प्यातील रस्ते विकसित करणेकामी येणाऱ्या अंदाजित खर्चाच्या १० टक्के रक्कम त्यांचे मागणीप्रमाणे लवकरात लवकर अदा करण्यात यावी. त्यानंतर करारनाम्याच्या अटी-शर्तीस अधिन राहून महामंडळाच्या मागणीप्रमाणे व आवश्यकतेनुसार वेळोवेळी रक्कम अदा करण्यात यावी. पूर्व प्राथमिक कामकाज सुरु करणेकामी महामंडळास त्यांचे दिनांक ०५ जून, २००६ रोजीचे पत्रानुसार रुपये ५० लाख मात्र त्वरीत अदा करण्यांत यावेत.

तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना पहिल्या टप्प्यातील रस्ते विकसित करणेकामी करावयाचे भूसंपादन कार्यवाहीसाठी आवश्यकतेनुसार, नगरपंचायतीने सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करुन नगरपंचायतीस अथवा संबंधीत भूसंपादन कार्यालयास रक्कम वेळोवेळी अदा करण्यात यावी.

याकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मंजुरी मिळणेकामी पाठपुरावा करण्यात यावा." (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०२. व्यवस्थापन समितीचे दि.२३.०९.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.७८५.** व्यवस्थापन समितीचे दि.२३.०९.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या पती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१) <u>Hp कलर डॉपलर प्रिंटर खरेदी बाबत-</u>**

दि. १५/०५/२००६ पासून श्री साईबाबा हॉस्पिटल सुरू झाले असून त्यातील बहुतेक विभाग जवळजवळ सुरू झालेले आहेत. हॉस्पिटलमधील C.T. SCAN, या विभागास कलर डॉप्लर खरेदी करणेत आलेले आहे. हॉस्पिटल सुरू झाल्यापासून कलर डॉप्लर व प्रिंटर नसल्यामुळे त्यावरील काम बंद आहे. सदर कलर डॉप्लर पेशंटचे रिपोर्टस देण्यासाठी आवश्यक आहे. हया विभागातील मागणी नुसार रूग्णांचे मेडीकल रिपोर्ट (PHOTO, DOPPLER इ. ) साठी कलर डॉप्लर प्रिंटरची आवश्यकता आहे.

HP कलर जेट (कलर डॉप्लर ) ३८०० हे प्रिंटर C.T. SCAN साठी आवश्यक आहे. हया प्रिंटरची अंदाजे किंमत रू ६००००/- (अक्षरी साठ हजार) इतकी आहे व त्याकरीता लागणारे टोनर्स/कार्टेज याची अंदाजे किंमत रू २५०००/- (अक्षरी पंचवीस हजार) इतकी आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रिंटर व टोनर खरेदीकामी एकूण अंदाजे किंमत रू ८५०००/- (अक्षरी पंच्याऐंशी हजार) खर्च अपेक्षित असून सदरची खरेदी कोटेशन्स मागवून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०२) <u>प्रयोगशाळा विभागाकरीता किरकोळ साहित्य खरेदी बाबत-</u>**

श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागात लागणारे किरकोळ साहित्य व केमीकल्स इत्यादी खरेदीबाबत दि. १०/०७/२००६ चे टिपणी अन्वये अंदाजे खर्च रु. ७०,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला होता. तसेच याकामी सहा अधिकृत विक्रेते यांचेकडून बंद पाकीटात कोटेशन देखील मागविण्यात आले होते.

सदर टिपणीवरील मा.कार्यकारी अधिकारी यांचे आदेशानुसार सदरचा विषय मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६/०७/२००६ चे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. तथापि सदर दिवशी सदर विषयावर निर्णय होऊ न शकल्यामुळे व सदरची मागणी तातडीची असल्यामुळे याकामी प्राप्त झालेले कोटेशन हे उपसमिती सभा दि. २०/०७/२००६ चे सभेपुढे उघडणेस व रु. ७०,०००/- च्या खर्चास मान्यता घेण्यात आली होती.

सदरच्या कोटेशनचा तुलानत्मक तक्ता आजचे सभेत सादर केलेला असून त्यामध्ये अ. नं. १,२,४,५,६ साठी फक्त एकाच कोटेशनधारकाचे दर प्राप्त झाले आहे. तर उर्वरित साहित्यासाठी एकापेक्षा जास्त दर प्राप्त झालेले आहे

वरील साहित्याची शिफारस करताना कंपनी, तांत्रिक बाबी, इत्यादीचा पॅथोलॉजीस्ट डॉ.न्यायधीश यांनी अभ्यास करुन शिफारस केलेली आहे. सदरचे शिफारसीनुसार सदरचे खरेदी कामी रु. ८५,६६३.१३ इतका खर्च अपेक्षित आहे असा प्रस्ताव दि.२७.०७.२००६ चे उपसमितीपुढे प्रथम सादर करण्यात आला होता त्यावर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मागणी करण्यात आलेले प्रयोगशाळा साहित्य हे हिस्टोपॅथी विभागाचे आहे. संस्थानचे श्रीसाईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय हे वेगवेगळया प्रयोगशाळा

साहित्याची मागणी करतात. याकरीता दोन्ही प्रयोगशाळा विभागाकडील डॉ.भारद्वाज व डॉ. न्यायाधीश ह्या वैद्यकिय अधिकाऱ्यांनी एकत्रित बसून प्रयोगशाळा विभागासाठी आवश्यक असणारे साहित्याचा फेर प्रस्ताव व्यवस्थापन समीतीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा आहे. तसेच श्रीसाईबाबा हॉस्पीटलकडील लॅब रिपोर्ट डॉ.न्यायाधीश यांना दाखवून त्यांच्या सह्या घेत जाव्यात, अशी या उपसमीतीची शिफारस मान्य करण्यात आली.

दि.२७.०७.२००६ चे उपसमितीचे इतिवृत्तास मा.व्यवस्थापन समिती सभा दि १९/०८/२००६ चे सभेमध्ये त्यास पुष्टी मिळालेली आहे.

मा. विश्वस्त डॉ. पी.एल. तिवारी साहेब यांच्या सुचनेवरुन दि.३०/०८/२००६ रोजी सदर मागणीचा तसेच दोन्ही रुग्णालयाचे प्रयोगशाळा स्वतंत्र ठेवणे व त्यासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्याबाबत त्यांना फॅक्स करुन विचारणा करण्यात आली होती. त्यावर त्यांनी स्वाक्षरी करुन सहमती दिलेली आहे.

सदर प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी व उपरोक्त साहित्य कोटेशन्स मागणी करुन खरेदी करावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०३) कुपोषित बालकांवरचे शिबीरासाठीचे औषधे खरेदीस मंजूरी मिळणे बाबत-**

श्रीसाईबाबा रुग्णालयात दि. १४/०६/२००६ पासून एकात्मिक बालविकास योजने अंतर्गत कोपरगाव तालुक्यातील कुपोषित बालकांवर वैद्यकिय तपासणी करुन त्यांच्यावर उपचार करण्यात आले.

प्रशासन शाखा जा.नं.एसएसएस/एसएसएच/२१६४/२००६ दि.१०/०८/२००६. रोजीचे परीपत्रका नुसार सदर कुपोषित बालकांच्या उपचारासाठी आपल्याकडे जी औषधे उपलब्ध होती ती देण्यात आली होती तर जी औषधे आपल्याकडे उपलब्ध नव्हती ती तातडीने खरेदी करण्यात आली आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे एकूण रु.२६,११९.०० इतका खर्च आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

| अ.न. | पुरवठाधारकाचे नाव | बिल नं./ दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | विजय मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, शिर्डी | १४९८८/ २६/०७/२००६ | ४,६७६.०० |
| २ | विजय मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, शिर्डी | १४९८९/ २५/०७/२००६ | ६,१८१.०० |
| ३ | विजय मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, शिर्डी | १४९९१/ २५/०७/२००६ | १,७२५.०० |
| ४ | विजय मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, शिर्डी | १४९९७/ २६/०७/२००६ | १२,४९२.०० |
| ५ | विजय मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, शिर्डी | १५००७/ २५/०७/२००६ | ५५०.०० |
| ६ | विजय मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स, शिर्डी | १५००८/ २८/०७/२००६ | ४९५.०० |
| | | **एकूण-** | **२६,११९.००** |

याचेवळी असे निर्देश देण्यात आले की, येथूनपुढे अशा प्रकारची खरेदी उपसमितीने मान्यतेनेच करण्यात यावी. कार्योत्तर मान्यतेसाठी विषय उपसमितीपूढे ठेवण्यात येऊ नये.(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०४) डोळयाचे तपासणी शिबीरासाठी तातडीचे औषधे खरेदी बाबत-**

श्री साईबाबा रुग्णालयात नेत्रशल्य चिकित्सा विभाग नव्याने चालू झाले असून त्या विभागाचे उदघाटनानिमित्त साईबाबा रुग्णालयाने दि.१९-२०/०८/२००६ रोजी डोळे तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन केले होते. सदरच्या शिबीरात २०० रुग्णांच्या तपासणीचे नियोजन होते. त्यासाठी जी औषधे आपणाकडे उपलब्ध होती ती त्यांना देण्यात आलेली आहे. तसेच काही औषधे मागील दराने खरेदीबाबत रु.६७९३०.५० तर काही औषधे कोटेशन मागवुन खरेदी केलेली आहे. त्यासाठी रु.१,६१,९४८/- इतका खर्च अपेक्षित होता अशी मिळून एकुण रु.२,२९,८७८.५० चे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मंजुरी घेण्यात आली होती. परंतू त्यानंतर काही औषधे शिर्डी, कोपरगांव आणि पुणे येथून तातडीने खरेदी करावी लागली. त्यासाठी रु.४१,११९/- इतका खर्च आलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | **Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune** | 1191 | 17.08.2006 | 18980.00 |
| 2 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15078 | 19.08.2006 | 3780.00 |
| 3 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15072 | 18.08.2006 | 5191.00 |
| 4 | Life Line Surgical, Kopargaon | 383 | 18.08.2006 | 3780.00 |
| 5 | Life Line Surgical, Kopargaon | 381 | 18.08.2006 | 445.00 |
| 6 | DVS Medical Systems,Pune | 18 | 16.08.2006 | 4500.00 |
| 7 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15069 | 17.08.2006 | 2458.00 |
| 8 | Vijay Medical Stores,Shirdi. | 15068 | 17.08.2006 | 1985.00 |
| | | **Total Amt.Rs.** | | **41119.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे पुर्णांकित रक्कम रु.४१,११९/- चे तातडीचे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

याचवेळी असे निर्देश देण्यात आले की, यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या मोतीबिंदू शिबीरात नांव नोंदणी झालेल्या सर्वच रुग्णांची तपासणी व उपचारासाठी सिव्हील सर्जन यांचे सहकार्याने एक दिवसाचा कॅम्प आयोजित करण्यात यावा व काम पूर्ण करणेत यावे, असे ठरले त्यास मान्यता देण्यात आली (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०५) बायपास शस्त्रक्रियासाठी कन्झ्युमेबल सर्जिकल साहित्य खरेदी बाबत-**

दि.२७/०७/२००६ च्या वैद्यकिय उपसमितीच्या सभेत कार्डीयाक कन्झूमेबल सर्जिकल साहित्य खरेदीचा व रु.१७,५१,३२०/- च्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन बायपास शस्त्रक्रियेपूर्वी कोटेशन मागवून खरेदी करण्यात आलेले कन्झूमेबल साहित्य ज्या पुरवठा धारकाकडून खरेदी करण्यात आलेले आहे. ते पूर्वीचेच मान्य दराने पुरविण्यास तयार असतील तर त्यांचेकडून खरेदी करण्यात यावे. अन्यथा निविदा मागणी करुन खरेदी करावी असे ठरले.

त्यानुसार पूर्वीचेच मान्य दराने रु.७,३९,४०२.१४ ची कन्झूमेबल सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात आले असून उर्वरीत कन्झूमेबल सर्जिकल साहित्य खरेदी कामी तातडीने पुणे,मुंबई,औरंगाबाद येथून कोटेशन मागविण्यात आले असून ती दि.०९/०८/२००६ ला मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडण्यात आलेले असून त्यांचा तुलनात्मक दरांचा तक्ता तयार करुन तो आजचे सभेत सादर करण्यात आला होता, तो सोबत परिशिष्ट "अ" म्हणून ठेवला आहे.

सदरची कन्झूमेबल साहित्याची मागणी वार्षिक औषधे खरेदीमध्ये नसल्यामुळे सदरची साहित्य खरेदी तातडीने वर्ष भर पुरेल इतकी घेण्याचा प्रस्ताव आहे.

या तुलनात्मक तक्त्यानुसार अ.नं.१,३ ते ७,१०,११,१५ ते १७ साठी एकाच पुरवठाधारकाचे दर प्राप्त झाले असून तेथे त्यांच्या दरांची शिफारस केली आहे व अ.नं. २,८,९,१२ ते १४ साठी निम्नतम दरांची शिफारशी नुसार सदरच्या खरेदीस व रु.९,३९,२१५/- इतका खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. कार्डीयाक औषधे पुरवठयासाठी दरपत्रके आलेल्या कंपन्यांकडून सदर आयटेमसाठी दरमागणी करावी व पुढील सभेपुढे ठेवून निर्णय घ्यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०६) E.T.O स्टरीलायझर पेपर खरेदी बाबत-**

श्रीसाईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर,कॅथ लॅब ओ.टी.इत्यादी ठिकाणी सर्जीकल कन्झूमेबल साहित्य, स्टराईल (निर्जंतुक) केलेले सर्जीकल साहित्यवर लेबल लावणेकामी उपरोक्त पेपरची आवश्यकता असते. सदरचे पेपर रोल ५छ, १०छ व १५छ अशा तीन प्रकारे २०० मीटर लांबीचे असतात. सध्या आपल्याकडे सदरचे पेपर रोल शिल्लक नाही. तेंव्हा यासाठी तातडीने खालील अधिकृत विक्रेते यांचेकडून बंद पाकिटात कोटेशन मागविले आहे.

सदरचे खरेदी कामी अंदाजे रु. ३०,०००/- खर्च अपेक्षित आहे. ते खालील प्रमाणे-

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | डायनामिक ट्रेडर्स , मुंबई | ०३ | ईलाईट इंडस्ट्रिज, मुंबई |
| ०२ | कौस्तुभ एंटरप्रायजेस, मुंबई | ०४ | एम.व्ही.बी. ॲड कंपनी, मुंबई |

वरीलप्रमाणे बंद कोटेशन मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष दि.०८/०९/२००६ रोजी उघडण्यात आले असून सदरचे खरेदीकामीचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सादर करणेत आला होता तो खालीलप्रमाणे-

| Sr. No | Width | Length | Qty | Kaustubh Enter. Mumbai | Elite Industeries, Mumbai | MVB & Co.Mumbai | Dynamik Traders, Mumbai | Total Cost. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5.0cm (2") | 200 mtrs | 2 | **1406.25** | 1743.75 | 1631.25 | 1687.5 | 2812.5 |
| 2 | 7.5cm (3") | 200 mtrs | 2 | **1687.5** | 2137.5 | 2025 | 2081.25 | 3375 |
| 3 | 10.0 cm (4") | 200 mtrs | 2 | **2418.75** | 2756.25 | 2587.5 | 2531.25 | 4837.5 |
| 4 | 15.0 cm(6") | 200 mtrs | 2 | **3318.75** | 3656.25 | 3431.25 | 3543.75 | 6637.5 |
| 5 | 20.0 cm (8") | 200 mtrs | 2 | **4218.75** | 4668.75 | 4556.25 | 4443.75 | 8437.5 |
| 6 | 25.0 cm(10") | 200 mtrs | 2 | **5062.5** | 5512.5 | 5287.5 | 5456.25 | 10125 |
| 7 | 30.0 cm (12") | 200 mtrs | 2 | **6468.75** | 7031.25 | 6806.25 | 6918.75 | 12937.5 |
| 8 | Plastic Roll Bag 3,4,6,8,10,12& 14" | | 14 | **Rs.219.375/kg** | Rs.253.125/kg | Rs.२१९.३७५/Kg | Rs.247.50/kg | 3071.25 |
| | | | | | | | **Total Rs.** | **52233.8** |

त्यामध्ये मे. कौस्तुभ एंटरप्रायजेस, मुंबई यांचे दर निम्नतम असून अ.नं.८ करीता मे. कौस्तुभ एंटरप्रायजेस, मुंबई. व एम.व्ही.बी. ॲड कंपनी, मुंबई यांचे दर सारखेच असून मे. एम.व्ही.बी. ॲड कंपनी, मुंबई यांनी कमीत कमी प्रत्येकी १० किलोच्या ऑर्डरची अट नमूद केलेली आहे, त्यामुळे अ.नं. ८ साठी मे. कौस्तुभ एंटरप्रायजेस, मुंबई यांच्या दरांची शिफारस करण्यात आलेली आहे. उपरोक्त

शिफारशीनुसार निम्नतम दराने सदरचे खरेदीकामी रु.५२,२३३.७५ इतका खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०७) आर्थोस्कोप सेट खरेदी बाबत-**

श्रीसाईबाबा रुग्णालयात आर्थोपेडीक विभागासाठी लागणारे आर्थोपेडिक हत्यारे या पूर्वी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४/०३/२००६ निर्णय क्रमांक १२६ अन्वये मे.मनमन पुणे,मे.बायोमेडिकॉन मुंबई, मे.सिन्थेसीस, दिल्ली यांचे कडून खरेदी करण्यात आलेले आहे.

सदर हत्यारामध्ये आपण आर्थोस्कोप सेट मे बायोमेडीकॉन सिस्टीम (इं) प्रा. लि., मुंबई यांचेकडून इकडील आदेश क्रमांक ३६९७ दि.१५/०३/२००६ अन्वये रु.१२,६७,१७०.२५ चा खरेदी करण्यात आलेला आहे.

सदर आर्थोस्कोप सेट मध्ये लाईटसोअर्स व इतर आवश्यक हत्यारे हे आलेले नाही व ते अत्यंत आवश्यक आहे असे आर्थोपेडिक सर्जन डॉ.अरोरा यांनी दि १९/०९/२००६ चे पत्रा अन्वये कळवले आहे.

सदरचे सेट साठी मे.बायोमेडीकॉन सिस्टीम (इं) प्रा. लि., मुंबई यांचेकडून दर मागविण्यात आले होते. त्यांनी त्यांचे दि.०९/०९/२००६ चे पत्रान्वये सदरच्या सेट साठी रु.२१६००४८/- इतका खर्च कळविला आहे. या पूर्वीचा सेट हा बी ब्राऊन कंपनी असून तो मे बायोमेडीकॉन मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात आलेला आहे. मे.बायोमेडीकॉन मुंबई हे बी ब्राऊन या कंपनीचे भारतातील अधिकृत विक्रते आहे तेंव्हा त्यांचेकडून घेणे अधिक संयुक्तीक राहील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, विहित पद्धतीने निविदा मागणी करुन आर्थोस्कोप खरेदी करण्यात यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०८)पोर्टेबल अल्ट्रासाऊंड मशिन खरेदीकामी आलेले कोटेशन्स उघडणे बाबत-**

श्रीसाईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजिस्ट डॉ.सचिन आनंद यांनी दि.२६/०६/२००६ च्या पत्रान्वये १ नग पोर्टेबल अल्ट्रा साऊंड मशिनची मागणी केली होती. सदरचे मशिन खरेदीचा खर्च रु. ४ लाखांचा प्रस्ताव दि.०५/०७/२००६ चे वैद्यकिय समितीच्या सभेपुढे ठेवण्यात आला होता.

यावर चर्चा होऊन सदरचे खरेदीकामी कोटेशन मागवून खरेदी करण्यात यावे असे ठरले होते. त्यानुसार इकडील पत्र क्रमांक ९३९५ दि.०७/०७/२००६ अन्वये दि. ३०/०७/२००६ अखेर एकुण ५ अधिकृत विक्रेते/उत्पादक कंपनीचे कोटेशन मागवण्यात आले होते.त्यापैकी खालील दोन कोटेशन प्राप्त झाले आहेत.

| | |
|---|---|
| ०१.मे. लार्सन ॲण्ड टुब्रो लि,पुणे. | ०२.मे. विप्रो जीई मेडीकल,मुंबई. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**०९) HP कलर प्रिंटर CD/DVD WRITER, HARD DISK खरेदी बाबत-**

दि.१५/०५/२००६ पासून श्री साईबाबा हॉस्पिटल सुरू झाले असून त्यातील बहुतेक विभाग सुरू झालेले आहेत. तर उर्वरीत विभाग लवकरच सुरू होण्याच्या मार्गावर आहेत.

सदर हॉस्पिटलमध्ये १११ संगणक व ३० प्रिंटर विविध विभागात बसविण्यात आलेले असून त्यांचे कामकाज सुरळीतपणे सुरू आहे. सदर प्रिंटर कार्यालयीन कामासाठी उपयुक्त आहेत. हॉस्पिटलमधील CARDIAC LAB, PATHOLOGY LAB, SKIN SPECIALIST, GENERAL SURGEON, BIO-MEDICAL, BLOOD BANK, MARKETING इ. ठिकाणी मेडीकल कामासाठी त्यांच्या मशीनरीच्या बनावटीनुसार प्रिंटर्स CD/DVD WRITER तसेच CD ROM ची आवश्यकता आहे आणि डाटा ट्रान्सफरसाठी एक्टर्नल हार्ड डिस्कची आवश्यकता आहे. हया विभागातील मागणी नुसार रूग्णांचे मेडीकल रिपोर्ट (ANGIO TEST, PHOTO, इ. ) साठी मशिनुरूप प्रिंटर्सची आवश्यकता आहे.

त्यानुसार खालील प्रमाणे प्रिंटर्स आवश्यक आहेत.

| अ. क्र. | प्रिंटर्स प्रकार | नग | अंदाजे किंमत | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | HP लेजर जेट 3052/3055/3309/3392 (लॅन प्रिंटर) | 2 | 40,000.00 | 80,000.00 |
| 2 | HP C4188 | 7 | 9,000.00 | 63,000.00 |
| 3 | HP फोटो स्मार्ट 3108 | 1 | 15,500.00 | 15,500.00 |
| 4 | HP लेजर जेट 1020 | 10 | 8,500.00 | 85,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | DOT MATRIX LQ300+ (मख्यत्वे बिलींगसाठी) | 5 | 8,500.00 | 42,500.00 |
| 6 | CD/DVD WRITER | 15 | 3500.00 | 52500.00 |
| 7 | EXTERNAL HARD DISK | 1 | 5000.00 | 5000.00 |
| | | | एकूण रक्कम | 3,43,500.00 |

तसेच उपरोक्त प्रिंटर्स करीता लागणारे टोनर्स/कार्टेज ची वेळोवेळी आवश्यकता भासणार आहे सदरकामी अंदाजें किंमत रू. **२,००,०००.००** (अक्षरी दोन लाख रू. पर्यंत ) वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रिंटर्स, टोनर , कार्टेज या कामाकरीता लागणारा अंदाजे खर्च **५,५०,०००/-**रू.(अक्षरी पाच लाख़ पन्नास हजार मात्र) इतका अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे HP कलर प्रिंटर CD/DVD WRITER, HARD DISK खरेदीकामी कोटेशन्स मागविण्यात यावीत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१०) <u>हॉस्पिटलबाबत माहितीपत्रक छापण्याबाबत-</u>**

दि.१५/०५/२००६ पासून श्री साईबाबा हॉस्पिटल सुरू झाले असून त्यातील बहुतेक विभाग आता जवळजवळ सुरू झालेले आहेत. हॉस्पिटलमध्ये श्री पवार के. एम. यांची नेमणूक १९/०८/२००६ रोजी मार्केटींग मॅनेजर या पदावर झालेली आहे.

हॉस्पिटल विभागामार्फत २८/०८/२००६ ते ०१/०९/२००६ या कालावधीत राहुरी येथे "भारत निर्माण अभियान" या कार्यक्रमात संस्थानचा स्टॉल ठेवला होता. त्यामध्ये मार्केटींग मॅनेजर यांनी श्री साईबाबा हॉस्पिटलची माहिती प्रस्तुत केलेली होती. सदर कार्यक्रमाच्यावेळी असे निदर्शनास आले की, साईबाबा हॉस्पिटलमध्ये असलेल्या सुविधांची माहिती स्थानिक परीसरामध्ये खूपच कमी लोकांना आहे.

तरी सदर हॉस्पिटलमधील सुविधा व आपण देत असलेल्या सेवेची माहिती परीसरातील जनतेला होणेकरीता माहीतीपत्रके, पोस्टर्स, होर्डींग्ज यांची आवश्यकता आहे. सदर कामासाठी रू. १०००००/- (अक्षरी रू. एक लाख मात्र) चा खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, माहीतीपत्रके, पोस्टर्स, होर्डींग्ज छपाई कामी कोटेशन्स मागवून छपाई करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,००,०००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. सदरची छपाई करणे अगोदर मजकूर उपसमितीचे सदस्यांना दाखवून मान्य करुन घ्यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**११) <u>MRI विभागाकरीता आवश्यक सुविधांबाबत-</u>**

श्री साईबाबा हॉस्पिटल सुरू होउन त्यातील विविध विभागही आता जवळ-जवळ पूर्ण क्षमतेने कार्यरत झालेले आहेत.

तथापि, सदर हॉस्पिटलमध्ये अजूनही काही विभाग नव्याने सुरू करण्याचे प्रस्तावित आहेत. सदर प्रस्तावित विभागांत प्रामुख्याने नेफ्रॉलॉजी, युरॉलॉजी, न्युरॉलॉजी, MRI वगैरे विभागांचा समावेश आहे.

प्रस्तावित नवीन विभागांपैकी MRI विभागांसाठी पुढील प्रमाणे व्यवस्था करण्यात यावी, असे मत आहे. MRI करीता किमान १२०० स्क्वे. फुट जागा असावी.

उपरोक्त विभागात खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, असे वाटते.

| अ.नं. | जागेचे वर्णन | साईज |
|---|---|---|
| 1 | Patients waiting room | 10’x10’ |
| 2 | Changing Room (Patients) | 7’x7’ |
| 3 | MRI Room | 15’x35’ |
| 4 | Power Supply Unit, Transformer Room etc. | 10’x10’ |
| 5 | Reporting Room | 10’x10’ |
| 6 | Stores + Tech. Room + Nursing Staff Room | 10’x10’ |

तरी सदर काम बांधकाम विभागामार्फत करून घेणेस, तथा सदरकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तबाबत उपसमितीने जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन निर्णय घ्यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१२) <u>A/C खरेदी बाबत-</u>**

श्रीसाईबाबा हॉस्पिटल आता सुरळीतपणे सुरू झाले असून त्यातील विविध विभाग जवळ-जवळ पुर्ण क्षमतेने सुरू झाले आहेत.

सदर हॉस्पिटलचे प्रशासकीय कार्यालय, ओ.पी.डी व अन्य नवीन सुरु होणाऱ्या विभागांकरीता A/C ची आवश्यकता भासत आहे,भासणार आहे. तसेच अजून नव्याने होणारे शस्त्रक्रिया गृहांसाठीही A/C ची आवश्यकता भासणार आहे.

सदर विभागांकरीता तातडीची गरज म्हणून उपरोक्तप्रमाणे विविध विभागात आवश्यकतेनुसार बसविणेकामी २० A/C नव्याने खरेदी करणे आवश्यक आहे.ते पुढीलप्रमाणे.

२ टन A/C प्रति नग रू. ३४,०००/-प्रमाणे एकूण रूपये = ६,८०,०००/-

(अक्षरी रुपये सहा लाख ऐंशी हजार मात्र.)

तरी उपरोक्तकामी संस्थानचे प्रचलीत पध्दतीने कोटेशन्स मागवून विदयुत विभाग प्रमुख, यांचेमार्फत किंवा खरेदी विभाग प्रमुख, यांचेमार्फत उपरोक्तप्रमाणे २० नग २ टनी ए.सी. खरेदी करणेस, तथा सदरकामी (व्हॅटसह) येणाऱ्या अंदाजे रुपये ७,०००००/- (अक्षरी रुपये सात लाख) पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, हॉस्पिटलचे कोणकोणत्या विभागात किती क्षमतेचे किती ए.सी.बसविणे आवश्यक आहे याबाबत पडताळणी करुन सविस्तर प्रस्ताव उपसमितीचे पुढील सभेपुढे सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/विद्युत विभागप्रमुख)

**१३) रेडिमेड फोल्डर खरेदी बाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटल आता सुरळीतपणे सुरू झाले असून त्यातील विविध विभाग जवळ-जवळ पूर्ण क्षमतेने सुरू झाले आहेत.

सदर हॉस्पिटलचे प्रशासकीय कार्यालय, ओ.पी.डी व अन्य नवीन सुरु होणाऱ्या विभागांतील स्टेशनरी व इतर सामान ठेवणेकरीता रेडिमेड फोल्डर्सची आवश्यकता भासत आहे, तसेच अजून नव्याने होणारे शस्त्रक्रिया गृहांसाठीही उपरोक्तप्रमाणे फोल्डर्सची आवश्यकता भासणार आहे.

हॉस्पिटलमधील विविध विभागांकरीता तातडीची गरज म्हणून उपरोक्तप्रमाणे आवश्यकतेनुसार विविध ठिकाणी बसविणेकामी ४X२ या साईजचे लोखंडी अथवा स्टीलचे चार उतरते कप्पे असणारे १०० नग रेडिमेड फोल्डर्सची नव्याने खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे १०० नग लोखंडी अथवा स्टील फोल्डर्स गोदरेज अथवा इतर नामांकित कंपनीकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये ३,०००००/- (अक्षरी रुपये तीन लाख पर्यंतचे) खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, हॉस्पिटलकरीता लागणारे १०० नग लोखंडी फोल्डर्स गोदरेज कंपनीचे खरेदी करावेत व खरेदीकामी कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये ३ लाख चे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१४) नेत्र विभागाचे दरांबाबत**

श्री साईबाबा हॉस्पिटल आता सुरळीतपणे सुरु झाले असून त्यातील बहुतेक विभाग आता जवळजवळ पूर्ण क्षमतेने सुरु झालेले आहेत.

सदर हॉस्पिटलचे नेत्र विभागाचे दिनांक १८.८.२००६ रोजी भारतातील सुप्रसिध्द नेत्ररोगतज्ञ मा.डॉ. एस्.नटराजन,मुंबई, यांचे शुभहस्ते उद्‌घाटन होउन तो विभागही आता सुरळीतपणे सुरु झाला आहे. उद्‌घाटन प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या नेत्रशिबीरामध्ये सुमारे १५०० रुग्णांनी फायदा घेतला आहे. त्यांत काही रुग्णांवर शस्त्रक्रियाही करण्यात आलेल्या आहेत तर काहींवर आजही शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नेत्ररुग्णांना अदा कराव्या लागणाऱ्या सेवांचे दरपत्रक खालीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| **MINOR**<br>**360-60=300** | - Chalazion Removal (I & C)<br>- Corneal foreign body removal<br>- routine procedure |
| **Intermediate**<br>**720-120=600** | - Corneal foreign body removal<br>- Emergency procedure<br>- Torsorrhaphy<br>- Ant. Chember tap / wash<br>- Conjunctival tear repair / exploration<br>- Pterygium (Bare sclera)<br>- DCT<br>- ND – Yag Capsulotomy / Iridotomy<br>- F.F.A. // Laser P.H.C. |
| **Major** | - Squint Surgery |

| | |
|---|---|
| 1440-240=1200 | - Ectropion Surgery<br>- Entropion Surgery<br>- Ptosis Surgery<br>- Enucleation Surgery<br>- Evisceration Surgery<br>- Pterygium excision + Autograft<br>- Lid tear repair |
| **Major Plus**<br>**2880-480=2400** | - E.C.C.E.Cataract Surgery ± IOL<br>- Corneal tear repair |
| **Supra Major**<br>5760-960=4800 | - Sutureless Non – phaco S.I.S.C.S.(small Incision Sutureless Cataract Surgery - SISCS) + IOL Implantation<br>- Glaucoma Surgery (Trabeculectomy)<br>- Phacoemulcification Cataract Surgery + PMMA IOL implantation |
| **Supra major plus**<br>11520-1920=9600 | - Phaco emulcification Cataract Sugery + foldable IOL implantation<br>- Cataract Surgery + Glaucoma Surgery ± IOL implantation<br>- Pars Plana Vitrectomy<br>- Retinal Surgery<br>- Keratoplasty Surgery |

Cost of lens to charged separately on actuals.

तरी उपरोक्तप्रमाणे दर आकारणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**१५) लूज नोट काऊंटींग मशिन खरेदी करणेसाठी आलेले कोटेशन्स उघडणे बाबत.**

दक्षिणापेटीतून प्राप्त होणाऱ्या नोटांची मोजणी करणेकरीता दोन लूज नोट काऊंटींग मशिन खरेदीसाठीचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.९.२००६ रोजी होणा-या सभेत ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन सदरच्या मशिन खरेदीसाठी तत्वतः मान्यता मिळाली असुन, येणारी कोटेशन्स मा.उपसमितीच्या सभेसमोर उघडण्यात येऊन पुढील कार्यवाही करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत :-

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | कोरस इंडिया लि. पुणे |
| ०२. | सुलभ एन्टरप्रायजेस, पुणे |
| ०३. | रुतुजा इलेक्ट्रॉनिक्स् , पुणे |

उपरोक्त प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले. कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१. | कोरस इंडिया लि. पुणे | २,२५,०००/- + १२.५० % VAT |
| ०२. | सुलभ एन्टरप्रायजेस, पुणे | २,४०,०००/- + १२.५० % VAT |
| ०३. | रुतुजा इलेक्ट्रॉनिक्स् , पुणे | २,३५,०००/- + १२.५० % VAT |

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन कोरस (इं) लि., पुणे यांच्याकडून प्रात्याक्षिक पाहण्यासाठी सदरचे लूज नोट काऊंटींग मशिन मागविण्यात यावे. त्याचे प्रात्याक्षिक मा.व्यवस्थापन समिती/उपसमितीसमोर करण्यात यावे. विश्वस्त, अधिका-यांना सदर मशिनची उपयुक्तता योग्य व खात्रीशीर वाटल्यासच पुरवठा आदेश देऊन लुज नोट काऊंटींग मशिन संस्थानसाठी खरेदी करणेत यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**१६) श्री साईनाथ रुग्णालयासाठी धर्मशाळा इमारतीमध्ये करावयाचे फेरबदल व नुतनीकरण कामांबाबत.**

दिनांक १६.९.२००६ रोजी शिरडी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईनाथ रुग्णालयासाठी धर्मशाळा क्र.०२ मधील इमारतीत तळमजल्यावर डॉक्टरांचे केबीनमध्ये तात्पूरते बांधकाम करण्यात आलेले आहे ते काढून त्याऐवजी सुनियोजित पध्दतीने नवीन पार्टीशन, फॉल्स सिलींग इ.अनुषंगिक कामे गोरगरिब रुग्णांचे सोयीसाठी करणे गरजेंचे आहे. त्यासाठी सदर कामे करणेबाबत चर्चा झाली आहे.त्यासाठी मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व वैद्यकीय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय यांचेशी चर्चा करुन मे.काबरे चौधरी आर्किटेक्ट,नाशिक यांचेमार्फत नकाशा तयार करणे आला आहे. सदर कामासाठी ४" विट बांधकाम करणे, प्लास्टर, सिरॅमिक टाईल्स डॅडो पेंटींग,

नवीन दरवाजे इ. कामे करणेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजनुसार रुपये २४,०७,५००.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास व काम लवकर होणेचे दृष्टीने धर्मशाळा परिसरात व्दारावती इमारतीचे बांधकाम करीत असलेले ठेकेदार मे.गोलानी बिल्डर्स हे त्यांचे मंजूर दरात काम करणेस तयार असलेस त्यांचेकडून काम करुन घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रुख)

**१७) ध्वनीक्षेपण विभागाकरिता एल.सी.डी. टाईप टी.व्ही. खरेदीबाबत.**

व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.८.२००६ चे सभेत निर्णय क्र.५९२ अन्वये एल.जी.मेक एल.सी.डी.टाईप तीन टी.व्ही. खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरील टी.व्ही. हे पुण्यतिथी उत्सवापूर्वी बसवावयाचे असल्याने दिनांक १९.२.२००६ चे पत्रान्वये एकूण १५ वितरकांकडून फॅक्स पत्राद्वारे कोटेशन्स मागविण्यात आले होते. त्यानुसार खालील कोटेशनधारकांनी दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | मॉडेल | देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | आहूजा इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर | मॉडेल नं.टी-३२एलझेड५० | ६६,०००/- |
| ०२ | राजेश ट्रेडिंग कंपनी,पुणे | मॉडेल नं.टी-३२एलझेड५० | ७२,०००/- |
| ०३ | जेमिनी इलेक्ट्रॉनिक्स,मुंबई | मॉडेल नं.टी-३२एलझेड५० | ८२,५००/- |
| ०४ | तिरुमला म्यूझिक सेंटर,प्रा.लि.,हैद्राबाद | मॉडेल नं.टी-३२एलसी२आर | ६५,०००/- |
| ०५ | एस.जोशी ब्रदर्स प्रा.लि.,नाशिक | मॉडेल नं.टी-३२एलसी२ आर | ७६,०००/- |
| ०६ | जितेंद्र इलेक्ट्रॉनिक्स एजन्सी,नाशिक | मॉडेल नं.टी-३२एलसी२ आर | ७७,५००/- |
| ०७ | सुजाता इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद | मॉडेल नं.टी-३२एलसी२ आर | ८०,०००/- |
| ०८ | दास इलेक्ट्रीक ट्रेडिंग प्रा.लि.,पुणे | मॉडेल नं.टी-३२एलसी२ आर | ७३,०००/- |
| ०९ | पारख इलेक्ट्रॉनिक, नाशिक | मॉडेल नं.टी-३२एलसी२ आर किंवा ३२-एलझेड ५० | ७४,०००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन,तिरुमला म्युझिक सेंटर प्रा.लि., हैद्राबाद यांचे निम्नतम दर रुपये ६५,०००/- प्रति नग स्वीकारणेत येऊन, त्यांना तीन टी.व्ही.पुरविणेकामी आदेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

**१८) कंत्राटी पदाची मुदत वाढवून मिळणेबाबत.**

श्री.सिताराम चंद्रभान वाखुरे, ॲडव्होकेट यांची कंत्राटी पद्धतीने रुपये ७०००/- मात्र एकत्रित मानधनावर कन्सलटंट म्हणून दिनांक २१.१०.२००५ पासून सहा महिन्यांकरिता नेमणूक करण्यात आली होती. सदरची मुदत दिनांक २०.०४.२००६ रोजी संपुष्टात आल्याने व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.४.२००६ चे सभेतील निर्णय क्र.२९४(ब) नुसार दिनांक २१.४.२००६ पासून पुढे सहा महिन्यांकरिता वाढविण्यात आलेली आहे. सदरची मुदत दिनांक २०.१०.२००६ रोजी संपणार असल्याने श्री.वाखुरे यांनी त्यांचे दिनांक २१.९.२००६ चे पत्रान्वये दिनांक २०.१०.२००६ रोजी संपणाऱ्या मुदतीपूर्वी पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.वाखुरे यांना पुर्वीचे अटी व शर्तीवर दिनांक २१.१०.२००६ पासून पुढे सहा महिन्यांचे कालावधी साठी मुदतवाढ देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**१९) ध्यान साधना शिबीर आयोजनाबाबत-**

दि.पुणे पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी,पुणे यांचे दि.२१/०९/२००६ चे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले आहे.त्यात त्यांनी असे म्हटले आहे की,ते संस्थान परिसरामध्ये ध्यान साधना शिबीर आयोजीत करु इच्छीत आहे.सदर शिबीर दि.३१/१२/२००६ पर्यंत म्हणजे तीन महिने कालावधी साठी घेणार आहेत.त्यासाठी त्यांनी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) कडील एका खोलीची मागणी केली आहे.सदरचे ध्यान साधना शिबीर संस्थान कर्मचारी,साईभक्त व इतर सर्वांसाठी विनाशुल्क आयोजीत करणार आहेत.सदर ध्यान साधना शिबीरामध्ये ध्यान कसे करावे व मनाची एकाग्रता वाढविणे बाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

सदरचे ध्यान साधना शिबीर विनामोबदला आयोजीत करणेत येणार आहे.त्या ध्यान शिबीरांसाठी त्यांना ५०० रुम्स कडील दुस-या मजल्यावरील व्हि.आय.पी.समोरील कॉमन हॉल देता येईल. कारण या हॉलला संडास,बाथरुम ॲटॅच नाही.अती गर्दीच्या काळात क्वचीत प्रसंगी मुक्कामासाठी साईभक्तांना सदरचा हॉल देण्यात येतो.

सबब,सदर ध्यान शिबीराचे आयोजन करणे कामी त्यांना तीन महिने कालावधीसाठी ५०० रुमकडील व्हि.आय.पी.समोरील कॉमन हॉल सकाळी ०९-०० ते सायंकाळी ०६-०० या वेळेत विना शुल्क देता येईल.रात्रीचे वेळी भक्तांसाठी उपलब्ध होऊ शकेल तरी त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव

मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-भक्तनिवासस्थानप्रमुख)

**२०) <u>मा.विश्वस्तांचे सुचनांबाबत</u>**

**(अ)** श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालय असे दोन रुग्णालये रुग्णांचे सेवेसाठी सज्ज आहेत. श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे कांही विभागांसाठी डॉक्टर कमी पडत आहेत त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या गरीब रुग्णांवर उपचार व इलाज वेळेवर होत नाही. याकरिता श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालय अशा दोन्ही रुग्णालयांमध्ये भेदभाव न करता हे दोनही रुग्णालये एकच आहेत असे समजण्यात येऊन या दोन्ही रुग्णालयाची वेळ सकाळी ८.३० ते १.३० व दुपारी ४ ते ६ अशी करण्यात यावी. तसेच श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुग्ण तपासणी, शस्त्रक्रिया व उपचारासाठी श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे आठवड्यातून तीन दिवस आलटून पालटून सक्तीने पाठविण्यात यावे.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालय/अधिक्षक,आस्थापना विभाग)

**(ब)** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधे येणाऱ्या रुग्णांना डॉ.खुराणा हे मानेचा पट्टा ठराविक मेडिकल स्टोअरमध्ये घेण्यास भाग पाडतात तो किंमतीने अतिशय महागडा असून, तोच पट्टा इतर मेडिकल स्टोअरमध्ये खरेदी केल्यास किंमतीमध्ये बरीच तफावत आढळून येते. याबाबत डॉ.खुराणा यांना लेखी खुलासा मागविण्यात यावा. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/कामगार अधिकारी)

**क)** संस्थानमध्ये नव्याने रुजू होणाऱ्या सर्वच वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून संस्थान सेवेत दोन वर्ष राहू असा बॉण्ड घेण्यात यावा.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालय/अधिक्षक,आस्थापना विभाग)

**ड)** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्ण व त्यांचे नातेवाईकांचे सोईसाठी हॉस्पिटल परिसरात टेलीफोनचे २ क्वॉईन बॉक्स त्वरीत बसवून द्यावेत. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**२१) <u>डॉ.चेतन तुकाराम खाडे,एम.बी.बी.एस.यांचे दि.०५/०९/२००६ चे नोकरी मिळणेबाबतचे अर्जाबाबत.</u>**

डॉ.चेतन तुकाराम खाडे,एम.बी.बी.एस.लोणी यांनी दि.०५/०९/२००६ रोजी अर्ज करुन त्यात," I Dr.Chetan Khade doing my intenship in P.M.T.,Loni my MBBS intenship will be completed on २०th Sept.२००६ As I am interested in joing shri Sainath Hospital under Dr.Ram Naik, as I am interested in surgery.Please give me opportunity."अशी विनंती केलेली आहे.

त्यावर वैद्यकीय अधिक्षिका,श्री साईनाथ रुग्णालय यांनी," Interviewed found suitable, for our hospital DR.Khochikar referred." असे अभिप्राय दिलेले आहेत.

तसेच श्री साईनाथ रुग्णालयात आर.एम.ओ.पदावर नेमणूक दिल्याने डॉ.सारंग खोचीकर यांनी राजीनामा दिलेला असल्याने त्यांचे आर.एम.ओ.पद रिक्त झालेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/११/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६७ नुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/७५/२००५ दि.०७/०१/२००६ अन्वये,"वैद्यकीय शास्त्रातील स्नातक (एम.बी.बी.एस.) उमेदवारांस रु.१७,०००/- व त्यापुढील पदवीका धारकांस रु.१८,०००/- एकत्रीत मानधन दर्शविण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त डॉ.खोचीकर यांचा आर.एम.ओ. पदाचा राजीनामा तसेच वैद्यकीय अधिक्षिका,श्रीसाईनाथ रुग्णालय यांचे अभिप्राय विचारात घेवून, डॉ.चेतन खाडे यांना रु.१७,०००/- एकत्रीत मानधनावर आर.एम.ओ.पदावर श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**२२) <u>वार्षीक औषधे खरेदीबाबत-</u>**

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता सन २००६-२००७ या वर्षाकरीता लागणाऱ्या औषधे खरेदीकामी दि. २४/०४/२००६ चे सभेत निर्णय क. २८५ अन्वये रु.५,९३,९१,९८४/- चे खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच सदरचे ठरावानुसार प्रवरा हॉस्पिटल, लोणी येथे समक्ष जाऊन तेथील कार्यपध्दतीची देखील माहिती घेण्यात आली होती.

सदरचा विषय मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १६/०७/२००६ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार तसेच प्रवरा हॉस्पिटल येथील प्रस्तावित केलेल्या पध्दतीचा समावेश करण्यात यावा. तसेच यावर चर्चा होऊन इतर सुपर स्पेशालिटी रुग्णालयात कशाप्रकारे औषधे खरेदी केली जातात त्याची देखील माहिती घेण्यात यावी, असे ठरले. त्यानुसार लोणी येथे जाऊन समक्ष माहिती घेण्यात आली.

सदरचे वार्षीक औषधे खरेदीकामी आपण वर्तमान पत्रात जाहिरात देऊन उत्पादक कंपन्या / अधिकृत विक्रेते यांचेकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. तसेच इकडील पत्र क. ९००५ दि. १०/०७/२००६ अन्वये २०५ उत्पादक कंपन्याना पत्र पाठवून त्यांचेकडून देखील दि. २६/०७/२००६ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. विक्रीसाठी निविदा हया संस्थानचे शिरडी तसेच मुंबई कार्यालयात ठेवण्यात आल्या होत्या. शिरडी येथे एकुण १३५ निविदांची विकी झाली आहे तर मुंबई कार्यालयात एकुण १०९ निविदांची विक्री झालेली आहे. दोन्ही कार्यालयात मिळून २४४ निविदांची विक्री झालेली आहे. दि. २६/०७/२००६ अखेर १४४ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या. तसेच दि. १८/०८/२००६ रोजी मे. अलमेट कार्पोरेशन, मुंबई यांची निविदा फॅक्सव्दारे प्राप्त झालेली आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा हया दि. १९/०८/२००६ चे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या होत्या. याच दिवशी सदरहू निविदाधारकांना चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यास अनुसरून एकुण १०५ निविदाधारक आजचे सभेपुढे समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी उपस्थित होते. उपस्थित सर्व निविदा सादर कर्त्यांना एकत्रित बोलवून त्यांना श्री साईबाबा संस्थान हे धर्मादाय संस्था असल्याने पुर्वी दिलेल्या दरामध्ये काही सवलत देणार किंवा कसे ? याबाबत सुधारीत दर / सुट बंद पाकीटात दयावे असे सांगण्यात आले होते. त्यानुसार एकुण ९१ निविदा सादर कर्त्यांनी बंद पाकीटात सुट दिलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | देऊ केलेली सुट | अ.नं. | निविदाधारकाचे नांव | देऊ केलेली सुट |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री एंटरप्रायजेस, पुणे | आयटमप्रमाणे | १० | मे.महेश सर्जीकल, पुणे | आयटमप्रमाणे |
| २ | मे.नेहा एंटरप्रायजेस,पुणे | १ टक्के | ११ | मे.रेणुका सर्जीकल सिस्टीम, औरंगाबाद | आयटमप्रमाणे |
| ३ | मे.अभिनव एजन्सी,नाशिक | आयटमप्रमाणे | १२ | मे.मॉरिन सर्जीकल, औरंगाबाद | २ टक्के |
| ४ | मे.जे.एस.पी.सर्जीकल, नाशिक | आयटमप्रमाणे | १३ | मे.मंत्री एजन्सी, अहमदनगर | आयटमप्रमाणे |
| ५ | मे.श्री स्वामी समर्थ आयुर्वेदीक, जळगांव | ३ टक्के | १४ | मे.आयव्हीएस ड्रग्ज प्रा.लि. इंदोर | सुट नाही. |
| ६ | मे.युनिव्हर्सल केमीकल्स, नाशिक | आयटमप्रमाणे | १५ | मे.युनिव्हर्सल ट्रेडर्स, पुणे | सुट नाही. |
| ७ | मे.सुर्या सर्जीकल फार्मा, नाशिक | सुट नाही | १६ | मे.संजय एजन्सी,अहमदनगर | २ टक्के |
| ८ | मे.एस.पी.डिस्ट्रीब्युटर्स, पुणे | आयटमप्रमाणे | १७ | मे.गौरव मेडीकल ॲण्ड जनरल, श्रीरामपुर | सुट नाही. |
| ९ | मे.महर्षी आयुर्वेदा प्रॉडक्ट, नागपुर | २ टक्के | १८ | मे.इंटीग्रेटेड हेल्थकेअर डिव्हाईसेस, पुणे | ४ टक्के |
| १९ | मे.फार्मासिया लिंक,पुणे | सुट नाही | ४७ | मे.श्रीजी एजन्सी,श्रीरामपुर | सुट नाही. |
| २० | मे.फार्मासिया लिंक,पुणे | सुट नाही | ४८ | मे.श्रीजी एजन्सी,श्रीरामपुर | सुट नाही. |
| २१ | मे.नुलाईफ फार्मास्युटिकल्स,पुणे | आयटमप्रमाणे | ४९ | मे. अलमेट कार्पोरेशन, मुंबई | आयटमप्रमाणे |
| २२ | मे. शर्लॅक्स फार्मास्युटिकल्स प्रा.लि., दिल्ली | ३ टक्के | ५० | मे.जेसीपीएल फार्मा,जळगांव | आयटमप्रमाणे |
| २३ | मे.कुंदन सर्जीकल,अहमदनगर | १ टक्के | ५१ | मे.भारत सिरम ॲण्ड व्हॅक्सीन लि.मुंबई | आयटमप्रमाणे |
| २४ | मे.बोरा एजन्सी,अहमदनगर | ५ टक्के | ५२ | मे.क्रिटीकल केअर सिस्टीम, पुणे | आयटमप्रमाणे |
| २५ | मे.हाय-टेक सर्जीकल सिस्टीम, मुंबई | आयटमप्रमाणे | ५३ | मे.कांचन ड्रग्ज प्रा.लि.,पुणे | आयटमप्रमाणे |
| २६ | मे.मिलन एंटरप्रायजेस,अहमदनगर | सुट नाही | ५४ | मे.परमेश्वर एंटरप्रायजेस, श्रीरामपुर | सुट नाही. |
| २७ | मे.सुभाष डिस्टीब्युटर्स, नेवासा | सुट नाही | ५५ | मे.काब्रा मेडीकल,जळगांव | आयटमप्रमाणे |
| २८ | मे.लाईफलाईन सर्जीकल, कोपरगांव | आयटमप्रमाणे | ५६ | मे.उत्कर्ष एजन्सी,राहूरी | ५ टक्के |
| २९ | मे.पंकज फार्मा,पुणे | आयटमप्रमाणे | ५७ | मे.राहूल एंटरप्रायजेस,नाशिक | सुट नाही. |
| ३० | मे.श्रेया एंटरप्रायजेस,अहमदनगर | ५ टक्के | ५८ | मे.माऊली फार्मा ॲण्ड सर्जीकल,कोपरगांव | आयटमप्रमाणे |
| ३१ | मे.सुभाष एजन्सी,अहमदनगर | १.५ टक्के | ५९ | मे.विशाल एजन्सी,अहमदनगर | आयटमप्रमाणे |
| ३२ | मे.श्रीराम एटरप्रायजेस,श्रीरामपुर | २ टक्के | ६० | मे.हेम एजन्सी,कोपरगांव | सुट नाही. |
| ३३ | मे.अभिषेक एंटरप्रायजेस,बीड | १ टक्के | ६१ | मे.सर्जीलिंक,श्रीरामपुर | आयटमप्रमाणे |
| ३४ | मे.पायोनिअर एंटरप्रायजेस, अहमदनगर | ७ टक्के | ६२ | मे.एमआरके हेल्थकेअर,मुंबई | आयटमप्रमाणे |
| ३५ | मे.स्पंदन बायोटेक, औरंगाबाद | आयटमप्रमाणे | ६३ | मे.महाराष्ट्र सर्जीकल हाऊस, पुणे | आयटमप्रमाणे |
| ३६ | मे.विजय ट्रेडींग कार्पो.श्रीरामपुर | २ टक्के | ६४ | मे.एच ॲण्ड एच फार्मास्युटिकल्स, मुंबई, | सुट नाही. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | मे.स्पंदन एंटरप्रायजेस,नाशिक | २ टक्के | ६५ | मे.साई फार्मास्युटिकल्स,पुणे | १० टक्के |
| ३८ | मे.फार्माको, पुणे | आयटमप्रमाणे | ६६ | मे.ट्रिस्टार रेमीडीज प्रा.लि., अहमदाबाद | ३ टक्के |
| ३९ | मे.ए-वन मेडीकल ॲण्ड सर्जीकल, नारायणगांव | २ टक्के | ६७ | मे.व्हीन्टेक सर्जीकल,मुंबई | ५ टक्के |
| ४० | मे.फार्माकेम एंटरप्रायजेस,पुणे | आयटमप्रमाणे | ६८ | मे.इंगा लॅब्रोटरीज प्रा.लि.मुंबई | आयटमप्रमाणे |
| ४१ | मे.ओमनी लेन्स प्रा,लि., अहमदाबाद | ५ टक्के | ६९ | मे.बी.एल.लाईफसायन्स,दिल्ली | सुट नाही. |
| ४२ | मे.सोनल सर्जीकल ,मुंबई | २ टक्के | ७० | मे.टी.टी.के. हेल्थकेअर लि.,मुंबई | सुट नाही. |
| ४३ | मे.चंद्राभगत फार्मा.प्रा.लि,मुंबई | आयटमप्रमाणे | ७१ | मे.खंडेलवाल लॅब्रोटरीज प्रा. लि., मुंबई | सुट नाही. |
| ४४ | मे.एन.पी.एजन्सी,मुंबई | आयटमप्रमाणे | ७२ | मे.निलेश सर्जीकल ,मुंबई | आयटमप्रमाणे |
| ४५ | मे.इन्टरमेडीक्स,मुंबई | २ टक्के | ७३ | मे.सेंटेनियल सर्जीकल सुचर्स, ठाणे | ५ टक्के |
| ४६ | मे.कार्डीओ प्रॉडक्स,मुंबई | १ टक्के | ७४ | मे.इंडको रेमीडीज लि.,मुंबई | ५ टक्के |
| ७५ | मे.हाफकीन बायोफार्मा,मुंबई | सुट नाही | ८४ | मे.पिनाकल बायोमेड प्रा. लि., मुंबई | २ टक्के |
| ७६ | मे.तिरुपती एंटरप्रायजेस,पुणे | सुट नाही | ८५ | मे. ॲबॉट इंडीया, मुंबई | आयटमप्रमाणे |
| ७७ | मे.हंसराज नायर मेडीकल इंडिया,मुंबई | सुट नाही | ८६ | मे. फ्रंटायर मेडी-टेक इं.प्रा.लि., मुंबई | ५ टक्के |
| ७८ | मे.ॲडव्हान्स मेडीकल डिव्हायसेस,ठाणे | आयटमप्रमाणे | ८७ | मे.इमर्जन्ट मेडी-टेक,मुंबई | ५ टक्के |
| ७९ | मे.एडवर्ड लाईफसायन्स,मुंबई | आयटमप्रमाणे | ८८ | मे.मॅक्वेट मेडीकल इंडिया फार्मा,मुंबई | ८ टक्के |
| ८० | मे.कुमार ब्रदर्स फार्मा,मुंबई | आयटमप्रमाणे | ८९ | मे.ऑस्टीन हेल्थकेअर , पुणे | ३ टक्के |
| ८१ | मे.जनेसिस रेमीडीज,पुणे | ५ टक्के | ९० | मे.सीनो केअर सर्जीकल ,मुंबई | १० टक्के |
| ८२ | मे.इंदु फार्मा,जेजुरी | २ टक्के | ९१ | मे.बी.ब्रॉन मेडीकल प्रा.लि.,मुंबई | २ टक्के |
| ८३ | मे.अल्फा एंटरप्रायजेस,मुंबई | आयटमप्रमाणे | | | |

वरीलप्रमाणे देऊ केलेली सुट / सुधारीत दर व मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असून तो सोबत परिशिष्ट "अ" म्हणून सादर केला आहे. वरील मुळ तुलनात्मक तक्ता तयार करताना खालील निविदाधारकांच्या निविदेचा तुलनात्मक दरामध्ये विचार करण्यात आलेला नाही.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्याचे नाव | विचारात न घेण्याचे कारण |
|---|---|---|
| १ | गगन फार्मा, मुंबई | टेंडरमध्ये मागणी केलेल्या औषधा व्यतिरीक्त औषधांचे दर दिलेले आहेत. |
| २ | अबॉट इंडीया लि., मुंबई | आपल्या मागणीप्रमाणे औषधांचे दर दिलेले नाहीत. |
| ३ | परमेश्वर एंटरप्रायजेस, श्रीरामपुर | टेंडरमध्ये दर भरताना कोणत्या कंपनीचा माल देणार ते नमुद केलेले नाही. |
| ४ | उत्कर्ष एजन्सीज, राहुरी | टेंडरमध्ये दर भरताना कोणत्या कंपनीचा माल देणार ते नमुद केलेले नाही. |
| ५ | श्रीराम एंटरप्रायजेस, श्रीरामपुर | आपण मान्य केलेल्या कंपन्यापैकी नसल्यामुळे |
| ६ | महर्षी आयुर्वेदा, नागपुर | टेंडरमध्ये मागणी केलेल्या औषधा व्यतिरीक्त औषधांचे दर दिलेले आहेत. |
| ७ | अंबिका सर्जिकल, संगमनेर | संपुर्ण टेंडर डॉक्युमेंट सादर केले नाही तसेच कोणत्याही प्रकारचे कागदपत्र सादर केले नाही. |
| ८ | तिरुपती एंटरप्रायजेस, पुणे | आपण मान्य केलेल्या कंपन्यापैकी नसल्यामुळे |

दि. १९/०८/२००६ चे सभेत औषधे खरेदीकामी निर्णय क्रमांक ५५९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. " निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, नामांकित कंपन्यांची औषधे निम्नत्तम दराने खरेदी करण्यात यावीत, असे ठरले. त्यात प्रयोगशाळेची केमीकल्स हि अपवाद आहे.

सदरचा तुलनात्मक तयार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये

०१) श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभाग यांनी वार्षीक मागणीचे वेळेस फक्त एकाच किटची मागणी केली होती व तसे मुळ प्रस्तावात सुचीत देखील करण्यात आले होते. कारण सदरची मागणी तयार करतेवेळी श्री साईबाबा रुग्णालय चालु झालेले नव्हते. आता रुग्णालय चालु झालेले असल्यामुळे आता एका वर्षाची मागणी निश्चित केलेली आहे व त्याप्रमाणे सोबतच्या तुलनात्मक तक्त्यात संख्या दर्शविण्यात आलेली आहे. तसेच प्राप्त झालेल्या दरामध्ये त्यांनी केलेल्या शिफारशीनुसार प्रस्तावीत करण्यात आलेले आहे. श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभाग व ब्लड बँक यासाठी लागणाऱ्या केमीकल्ससाठी त्यांनी सुचविलेल्या कंपनीचे केमीकल्सची शिफारस केलेली आहे. जेणेकरुन त्यांचे दैनंदिन कामात त्यांना अडचणी येऊ नये.

०२) श्री साईनाथ हॉस्पीटल करीता व श्री साईबाबा हॉस्पीटलचे जनरल शस्त्रक्रियेकरीता सुचर्स मटेरीयलचे बाबतीत मे. बी. ब्रॉन लि., मुंबई, मे. जॉन्सन ॲन्ड जॉन्सन, मुंबई व हिंदुस्थान लॅटेक्स, मुंबई यांचे दर प्राप्त झालेले आहे. यामध्ये मे. बी. ब्रॉन लि., मुंबई, मे. जॉन्सन ॲन्ड जॉन्सन, मुंबई हया दोन्ही विदेशी (Imported) असून त्याचे सुचर्स या चांगल्या दर्जाचे आहे. त्यामध्ये निम्नत्तम दर असणाऱ्यास ७० % व त्यानंतरचे दर असणाऱ्यास ३०% याप्रमाणे शिफारस केलेली आहे.

०३) दि. ०६/०९/२००६ चे उपसमितीचे सभेत झालेल्या चर्चेनुसार Baxter कंपनीचे सलाईनवर सिरींज पंप मोफत देण्याची योजना आहे, असे मा. विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर यांनी सभेत सांगितले. त्यावर चर्चा होऊन याकामी उपसमितीचे सदस्य यांनी पुणे येथे समक्ष जाऊन याबाबत माहिती घ्यावी, असे ठरले. त्यानुसार दि. ११/०९/२००६ रोजी मा. विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर, मा. विश्वस्त श्री. पांडुरंग अभंग व वैद्यकिय संचालक यांनी पुणे येथे समक्ष जाऊन निरामय हॉस्पिटलमध्ये या योजनेबाबत चौकशी केली व Baxter कंपनीचे सलाईनकरीता पुणे येथील अधिकृत विक्रेते मे. रोहीत एंटरप्रायजेस, पुणे ज्यांनी आपले जाहिरातीस अनुसरुन निविदा भरलेली आहे यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी आपणास जे निम्नत्तम दर प्राप्त झाले असतील त्या दराने आम्ही आपणास एक वर्षासाठी जितके सलाईन लागेल ते सलाईन पुरवठा करणेस तयार आहे, असे त्यांनी त्यांचे दि. १४/०९/२००६ चे पत्रान्वये कळविलेले आहे, तसेच १० सिरींज पंप JMS / B.Braun / Drager कंपनीचे मोफत देण्यास तयार आहोत, असे सांगितले. ज्याची अंदाजे किंमत ४.५ लाखपर्यंत आहे. या विषयावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६.०९.२००६ चे सभेत चर्चा होऊन उपरोक्त प्रमाणे एक वर्षाकरीता लागणारे सलाईन मे.रोहीत एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून खरेदी करावे असे ठरले. निम्नत्तम दरानुसार सन २००६-२००७ या वर्षासाठी लागणाऱ्या सलाईनकरीता रु.१२,५१,१२०/- इतका खर्च येणार आहे. त्यानुसार मे. रोहीत एंटरप्रायजेस, पुणे यांना पुरवठा आदेश सोबत दि.२०.०९.२००६ रोजी देण्यात आलेला आहे.

०४) आयुर्वेदीक औषधांसाठी आयुर्वेदीक विभागातील डॉक्टरांचे सल्ल्यानुसार शिफारस करण्यात आलेली आहे.

०५) कॅथलॅब ॲन्जीओग्राफीसाठी लागणारे कॉन्ट्रास्ट (Contrast) करीता नामांकित कंपनीचे कॉन्ट्रास्टची शिफारस केली आहे.

०६) उर्वरीत औषधे / साहित्य इत्यादी ठिकाणी अनुक्रमे प्रथम निम्नत्तम असणारास ७०% व व्दितीय निम्नत्तम दर असणारास ३०% ऑर्डर मा. व्यवस्थापन सभा दि. १६/०७/२००६ चे सभेत निर्णय क्र. ४२७ अन्वये विभागून देण्यात आलेली आहे.

०७) कार्डीयाक ऑपरेशन, ऑन्जीओप्लास्टी, ॲन्जीओग्राफीसाठी लागणारे सर्जीकल, कन्झुमेबल स्टेन्ट, व्हाल्व कार्डीयाक शस्त्रक्रियेसाठी लागणारे सुचर्स इत्यादीसाठी पुणे येथील निरामय हॉस्पीटलमधील डॉ.सरनोत याचा तज्ञ सल्लागार म्हणून अभिप्राय घेण्यात आलेला आहे व त्यानुसार खरेदीची शिफारस केलेली आहे. मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी सा़ो. यांनी सदरचे आयटम्स साठी केलेल्या शिफारशीमध्ये व डॉ.सरनोत यांनी केलेल्या शिफारशीमध्ये काही आयटम्ससाठीच्या कंपन्यामध्ये थोडासा फरक दिसून येत आहे.

०८) सोबतच्या तुलनात्मक तक्त्यामध्ये ५४ औषधांकरीता कुणाचेच दर प्राप्त झालेले नाही व त्यासाठी अंदाजे रु. ५,८६,४९३/- इतका खर्च येणार आहे. त्यासाठी पुन्हा फेर कोटेशन / निविदा मागव्यावा लागणार आहे. १८६ औषधांकरीता फक्त एकाच निविदा सादरकर्त्यांचे दर प्राप्त झालेले आहे व तेथे त्याची शिफारस केलेली आहे त्यासाठी रु.१,४४,९४,१५२.१४ इतका खर्च येणार आहे.

०९) सन २००६-२००७ या वार्षिक औषधे खरेदीचे मागणी करते वेळी श्री साईनाथ रुग्णालय फक्त कार्यान्वित होते. श्री साईबाबा हॉस्पिटल हे दि. १५/०५/२००६ पासून कार्यान्वित झालेले आहे. येथे येणाऱ्या रुग्णांचा / शस्त्रक्रियेचा / तपासण्याचा कोणताही अंदाज सुरुवातीस नसल्यामुळे अंदाजे मागणी हिशोबात धरण्यात आली होती. आता रुग्णालय चालु होऊन सुमारे ४ महिने झालेले असल्याने मुळ मागणी व्यतिरीक्त लागणारी अतिरीक्त औषधांची मागणी स्वतंत्र तयार केलेली असून ती सोबत सादर केली आहे. त्यासाठी निम्नत्तम दरानुसार अंदाजे रु. ४,७५,२५,८४५/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरची औषधे हि आपणास मा. व्यवस्थापन समिती सभेचे मंजुरीतील मंजुर दरानुसार खरेदी करावी लागणार आहे. तेंव्हा त्याचा पुरवठा आदेश हा मंजुर दरानुसार आवश्यकतेनुसार देता येईल.

उपरोक्त शिफारशीनुसार सदरचे औषधे खरेदीकामी संबंधीत पुरवठाधारकांना जात असणाऱ्या औषधांच्या आदेशाची रक्कम सोबत परिशिष्ट "अ" म्हणून ठेवलेली आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी एकुण रु.७,५१,२७,४२६.९२६९ इतका खर्च येणार आहे. दि. १६/०९/२००६ चे मा. व्यवस्थान समिती सभेपुढे सदरचा विषय मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला होता. त्यावर चर्चा होऊन सदर विषय मंजुरीसाठी उपसमिती सभेपुढे सादर करावे असे ठरले होते. त्यानुसार सदरचे पुरवठाधारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

त्यानुसार आजचे सभेपुढे एकुण ४६ निविदाधारक चर्चा / वाटाघाटी उपस्थित होते. त्यांनी यापुर्वी दि.१९.०८.२००६ चे सभेत दिलेल्या सुटी व्यतिरिक्त अतिरिक्त सुट दिलेली आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | दिलेली सुट |
|---|---|---|
| १ | अभिषक एंटरप्रायजेस,बीड | नाही. |
| २ | आप्पास्वामी असोसिएट,चेन्नाई | १० टक्के |
| ३ | बी.एल.लाईफ सायन्स,दिल्ली | नाही. |
| ४ | क्रिटीकल केअर सिस्टीम,पुणे | २ टक्के |
| ५ | गौरव मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स,श्रीरामुपर | नाही. |
| ६ | एच ॲण्ड एच फार्मासिटीकल,मुंबई | नाही. |
| ७ | हंसराज नायर मेडीकल इंडीया,मुंबई | नाही. |
| ८ | हेम एजन्सी,कोपरगांव | २ टक्के |
| ९ | इंदु फार्मा,जेजुरी | नाही |
| १० | आयव्हीज ड्रग्ज,इंदोर | १ टक्का |
| ११ | जे.एस.पी.सर्जीकल,नाशिक | ५ टक्के |
| १२ | जेसीपीएल फार्मा,जळगांव | २ टक्के |
| १३ | कांचन ड्रग्ज,पुणे | नाही |
| १४ | लाईफ लाईन सर्जीकल,कोपरगांव | २ टक्के |
| १५ | महेश सर्जीकल,पुणे | २ टक्के |
| १६ | मॉरीन सर्जीकल,औरंगाबाद | आयटम प्रमाणे |
| १७ | मीलन एंटरप्रायजेस,अहमदनगर | कंपनीप्रमाणे |
| १८ | एम.आर.के.हेल्थकेअर,मुंबई | नाही. |
| १९ | एन.पी.एजन्सी,मुंबई | नाही. |
| २० | निधी लाईफकेअर,मुंबई | २ टक्के |
| २१ | निलेश सर्जीकल,मुंबई | नाही |
| २२ | न्युलाईफ फार्मासिटीकल,पुणे | ५ टक्के |
| २३ | राहुल एंटरप्रायजेस,नाशिक | नाही. |
| २४ | रमन ॲण्ड वेल,मुंबई | २ टक्के |
| २५ | रेकॉन डायग्नोस्टीक,बडोदा | २० टक्के |
| २६ | रेणुका सर्जीकल,औरंगाबाद | १ टक्का |
| २७ | एस.पी.डिस्ट्रीब्युटर्स,पुणे | २ टक्के |
| २८ | साई फार्मासिटीकल,पुणे | ४ टक्के |
| २९ | शेलाक्स फार्मासिटीकल, दिल्ली | १ टक्का |
| ३० | श्रीजी एजन्सी,श्रीरामपुर | कंपनीप्रमाणे |
| ३१ | श्रेया एंटरप्रायजेस,अहमदनगर | ७ टक्के |
| ३२ | सोनल सर्जीकल,मुंबई | १ टक्का |
| ३३ | स्पंदन बायोटेक,औरंगाबाद | १ टक्का |
| ३४ | सुभाष डिस्ट्रीब्युटर्स,नेवासा | नाही |
| ३५ | सर्जीलिंग श्रीरामपुर | १ टक्का |
| ३६ | सुर्या सर्जी.,नाशिक | ०.५ टक्का |
| ३७ | युनिव्हर्सल केमीकल,नाशिक | नाही. |
| ३८ | विजय ट्रेडींग,श्रीरामुपर | नाही |
| ३९ | विशाल एजन्सी,अहमदनगर | २ टक्के |
| ४० | स्पंदन एंटरप्रायजेस,नाशिक | १ टक्का |
| ४१ | हाय-टेक सर्जीकल,मुंबई | नाही. |
| ४२ | मॅक्वेट मेडीकल,मुंबई | २ टक्के |
| ४३ | माऊली फार्मा,कोपरगांव | नाही. |
| ४४ | महाराष्ट्र सर्जीकल,पुणे | नाही. |
| ४५ | नितीन मिनीकेम,जोधपुर | नाही. |

उपरोक्त सुटीनुसार प्रथम निम्नतम दर असणाऱ्यास ७०% तर द्वितीय दर असणाऱ्यास ३०% पुरवठा आदेश देण्यात यावा तर on consignment basis वर घ्यावयाचे ठरलेले स्टेन्ट, व्हाल्व, बलुन इत्यादी करीता संबंधीत पुरवठाधारकांस प्राप्त झालेल्या निम्नतम मंजुर दराने आवश्यकतेनुसार जितके लागतील तितके खरेदी करता येतील असे पत्र देण्यात यावे ती वापरलेवर त्याचे बील संबंधीत पुरवठाधारकास अदा करावी. वार्षीक मागणी व्यतिरिक्त केलेली जादा मागणीतून अ.नं.८ मध्ये दर्शविलेली औषधे मंजुर दराने खरेदी करण्यात यावी. तसेच याबाबत मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचा देखील अभिप्राय घेण्यात आला होता. मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी नामांकित कंपन्या व निम्नतम दरानुसार औषधे खरेदी करावी परंतू निम्नतम दर असणाऱ्या ७०% व व्दितीय क्रमांकाचे दर

असणारे ३०% असा पुरवठा आदेश देण्याऐवजी एकाच नामांकित कंपन्यांची निवड करुन त्यांचेकडून १००% औषधे खरेदी करावीत अशा सुचना दिल्या होत्या. तसेच सूचर्स मटेरिअल बाबत बी-ब्रॉन कंपनीचे व जॉन्सन ॲण्ड जॉन्सन कंपनीचे प्रत्येक ५० टक्के सुचर्स खरेदी करावेत. कार्डीओव्हॅस्कलूर सूचर्स करीता सेंटेनिल कंपनीचे सूचर्स मागणी करण्यात आली होती. ती ७५% प्रमाणे खरेदी करावी व बी-ब्रॉन कंपनीचे २५% खरेदी करावी असे सांगितले.तसेच केंद्रशासनाच्या नवीन धोरणानुसार पुढील महिन्यात औषधांच्या किंमती कमी होणार असल्याने तूर्तास तीन महिने पुरु शकतील इतके औषधांचे साठ्यांची मागणी करावी तर मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी हिंदुस्थान लॅटेक्स कंपनीचे सूचर्स देखील प्रायोगिक तत्वावर मागविण्यात यावी अशा सूचना केल्या होत्या. त्यानुसार हिंदुस्थान लॅटेक्स,मुंबई या कंपनीस मुळ मागणीच्या ५% तर बी-ब्रॉन कंपनीस ९५% इतके सूचर्सचे आदेश विभागून द्यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०३.** **व्यवस्थापन समितीचे दि.१६.०७..२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.७८६.** दिनांक १६.०७.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०४.** **नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता सप्टेबर,२००६.**

**(ब) माहे सप्टेबर , २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे सप्टेबर,२००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे सप्टेबर,२००६ मध्ये श्री साईबाबांनी अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.७८७.** (A) माहे सप्टेबर,२००६ मधील जमा रुपये ९,४०,३४,२०६.५२ खर्च रुपये १२,१५,७३,४१७.७९ चे तक्ते, माहे सप्टेबर , २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्च रुपये २,०४,४६५.५० चे खर्चाचे तक्ते माहे ९ ऑक्टोबर,२००६ अखेरीस रुपये २,४७,३९,५५,५७३.२० गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे सप्टेबर ,२००६ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या एकूण रुपये ३,०५,७३,२११.०० देणगीचा तक्ता, माहे सप्टेबर ,२००६ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये १,१३,३८८.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२.माहे सप्टेबर, २००६ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र. ७८७. (B).** माहे सप्टेबर ,२००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान रुपये ७६,९२,०१३.०० चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०३.रुग्णालयातील रुग्णांना माहे सप्टेबर , २००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ७८७.(C).** माहे सप्टेबर,२००६ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता अंतररुग्ण रुपये ३२११४,बाह्य रुग्ण ३९०४९ थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये १५,५००/-ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०४.श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे सप्टेबर,२००६ देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीबाबत.**

**निर्णय क्र. ७८७.(D).**माहे सप्टेबर,२००६ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या रुपये ४,६१,२४९/- सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०५.माहे सप्टेबर ,२००६ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ७८७.(E).**माहे सप्टेबर , २००६मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४२,०५२ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०६.बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ७८७. (F)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता ज्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली तसेच चौकशी कार्यालय इंटेरिअर कामाचे अंतिम बील अदा करणेस व याकामी रक्कम रुपये ४३,३२४/- मात्रचे जादा झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७.पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र. ७८७. (G)** माहे सप्टेबर, २००६ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०५ सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादीत,सिन्नर यांचे दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने घेतलेल्या जागेत पालखी थांबा उभारणेकरीता आलेल्या निविदा उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.७८८.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१ एप्रिल, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८७ अन्वये उपरोक्त विषयांकित ३६०० चौ.मी.जागेत पालखी थांबा वास्तुच्या बांधकाम आराखडा व तपशीलवार अंदाजपत्रकासह संस्थानचे आर्किटेक्ट मे.निकम पा.असो., श्रीरामपुर यांचेकडुन तयार करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार आर्किटेक्ट मे.निकम पा.असो., श्रीरामपुर यांनी पालखी थांबा वास्तुचा बांधकाम आराखडा तयार करुन त्याचे तपशिलवार अंदाजपत्रक सादर केले होते. त्यानुसार दि.५ सप्टेंबर,२००६ च्या टिपणी अन्वये सिन्नर येथील विषयांकित जागी पालखी थांबा वास्तुचे बांधकाम करणेसाठी वर्तमानपत्रात विहित पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविणेस मान्यता मिळाली आहे. त्यानुसार कोऱ्या निविदा विक्री दि.२०/०९/२००६ ते दि.०४/१०/२००६ पर्यंत करण्यात आली. सिलबंद निविदा सादर करण्यासाठी दि.१२/१०/२००६ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आलेली आहे. विहीत मुदतीत खालील ११ ठेकेदारांनी कोऱ्या निविदा विकत घेतल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.किशोर एल. आडके, नाशिक |
| ०२ | मे.सौरभ कन्स्ट्रक्शन, ठाणे |
| ०३ | मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव |
| ०४ | मे.ममता कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| ०५ | मे.अशोक पगार, नाशिक |
| ०६ | मे.साहेबराव कोकाटे ॲण्ड असो., नाशिक |
| ०७ | मे.हर्ष कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| ०८ | मे.सय्यद आय.एच.,मनमाड |
| ०९ | मे.श्रीमंत श्री कन्स्ट्रक्शन, धारणगांव खु!! निफाड |
| १० | मे.भाग्यलक्ष्मी कन्स्ट्रक्शन, पुणे |
| ११. | मे.साई कन्स्ट्रक्शन कंपनी, कोल्हार ता.राहाता |

विहीत मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.अशोक पगार, नाशिक |
| ०२ | मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव |
| ०३ | मे.साहेबराव कोकाटे ॲण्ड असो., नाशिक |
| ०४ | मे.सय्यद आय.एच.,मनमाड |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे.अशोक पगार, नाशिक | 7% अधिक | 7% अधिक |
| ०२ | मे.आर.एल.भुतडा, कोपरगांव | 23.40% अधिक | 22% अधिक |
| ०३ | मे.साहेबराव कोकाटे ॲण्ड असो., नाशिक | 2.45% कमी | 4% कमी |
| ०४ | मे.सय्यद आय.एच.,मनमाड | 14% अधिक | अनुपस्थित |
| ०५ | मे.भाग्यलक्ष्मी कन्स्ट्रक्शन, पुणे | --- | अपात्र |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साहेबराव कोकाटे ॲण्ड असो., नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०६. नगर-मनमाड रोडच्या डिव्हायडरला बगीचा संरक्षक ग्रील तयार करणेबाबत आलेल्या निविदा उघडून निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.७८९.** नगर-मनमाड रोडच्या डिव्हायडरला बगीचा संरक्षक ग्रील तयार करणेबाबत व येणाऱ्या रु.७,६५,४९०.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९-०८-२००६ चे झालेल्या

मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव या सभेत विषय क्र.५५ निर्णय क्र. ५८४ अन्वये मान्य करण्यात आला असून या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०७ टेंडर्स प्राप्त झाले आहेत. टेंडर तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०३ | मे. रविंद्र रबर प्रॉडक्टस्, ॲण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपूर. |
| ०४ | मे.स्टार एनर्जी, नाशिकरोड, नासिक |
| ०५ | मे.दुर्गा ट्रेडींग कार्पो., औरंगाबाद |
| ०६ | मे.किशोर एल.आडके, नाशिक रोड, नासिक |
| ०७ | मे. श्रीराम इंजिनिअर्स ॲण्ड फॅब्रिकेशन, साकुरी-राहाता. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या असता निविदासादरकर्त्यानी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव | निविदेतील दर रुपये. |
|---|---|---|
| ०१ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | १५,१६,९९५.०० |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | १४,९४,१८४.०० |
| ०३ | मे. रविंद्र रबर प्रॉडक्टस्, ॲण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपूर. | १०,४५,९२१.०० |
| ०४ | मे.स्टार एनर्जी, नाशिकरोड, नासिक | ११,९०,६९५.५० |
| ०५ | मे.दुर्गा ट्रेडींग कार्पो., औरंगाबाद | १२,३३,२३७.०० |
| ०६ | मे.किशोर एल.आडके, नाशिक रोड, नासिक | १०,२६,९१६.०० |
| ०७ | मे. श्रीराम इंजिनिअर्स ॲण्ड फॅब्रिकेशन, साकुरी-राहाता. | १०,१३,५५४.०० |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दराचा विचार करता देऊ केलेले दर हे एस्टिमेटेड कॉस्टच्या ४०% पेक्षा अधिक असल्याने चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित असलेल्या निविदासादरकर्त्यांना सभेसमक्ष बोलाविण्यात येऊन याकामाच्या फेर निविदा मागविण्यात येतील असे सांगण्यात आले.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नगर-मनमाड रोडच्या डिव्हायडरला बगीचा संरक्षक ग्रील तयार करणेबाबत बांधकाम विभागाने आर्किटेक्ट यांचेकडून डिझाईन तयार करुन घ्यावे व विद्युत विभागप्रमुखांनी या कामाच्या फेरनिविदा उपरोक्त निविदासादरकर्त्यांकडून मागवाव्यात तसेच उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी निविदेसोबत भरलेली अनामत रक्कम त्याना त्वरीत परत करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख/ बाधकाम विभागप्रमुख )

**विषय नं.०७. रथ पालखी रस्त्यावरील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वीजवितरण वाहिन्या भूमिगत करणेकामी आलेल्या निविदा उघडून निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.७९०.** शिर्डी शहरातील रथ पालखी रस्त्यावरील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वीज वितरण वाहिन्या भूमिगत करणेबाबत व येणाऱ्या रु. ३४,३४,४१४.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव मान्य करण्यात आला असून या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे शिर्डी कार्यालयात ०५ टेंडर तर मुंबई कार्यालयाकडून ०२ टेंडर असे एकुण ०७ टेंडर प्राप्त झाले आहेत. टेंडर तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.विनायक इले.इंजिनिअर्स, नासिक. |
| ०२ | मे.श्री साई श्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नासिक. |
| ०३ | मे.तुळजाई इले. कॉन्ट्रॅक्टर, पुणे. |
| ०४ | मे. एस.टी. इलेक्ट्रीकल्स प्रा.लि., पुणे. |
| ०५ | मे. आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक |
| ०६ | मे. द हिंद इलेक्ट्रीक ॲण्ड इंजि. कार्पो. मुंबई. |
| ०७ | मे. दास कन्स्ट्रक्शन प्रोजेक्टस्, पुणे. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्याशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.विनायक इले.इंजिनिअर्स, नासिक. | २४,७४,९००.०० | २४,५०,१५१.०० |
| ०२ | मे.श्री साई श्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नासिक. | २५,९१,२११.०० | २५,३९,३९३.७० |
| ०३ | मे.तुळजाई इले. कॉन्ट्रॅक्टर, पुणे. | २८,६०,३८३.०० | अनुपस्थित |
| ०४ | मे. एस.टी. इलेक्ट्रीकल्स प्रा.लि., पुणे. | २७,०२,६६५.०० | अनुपस्थित |
| ०५ | मे. आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ४०,४१,०४६.०० | ३०,२०,४९१.०० |
| ०६ | मे. द हिंद इलेक्ट्रीक ॲण्ड इंजि. कार्पो. मुंबई. | २६,५४,८८०.०० | २६,१०,०००.०० |
| ०७ | मे. दास कन्स्ट्रक्शन प्रोजेक्टस्, पुणे. | ४२,४०,२७८.५४ | ३६,००,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं.०१ चे निविदासादरकर्ते मे.विनायक इले.इंजिनिअर्स, नासिक यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०१८-१२-२००५ रोजी झालेल्या सभेत या विषयावर चर्चा होऊन विषय क्र.१३ निर्णय क्रमांक ७८८ अन्वये शिर्डी शहरातील रथ पालखी रस्त्यावरील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वीज वितरण वाहिन्या भूमिगत करणेबाबतचे कामासाठी मंजूर दराने झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या १५% रक्कम "सुपरविजन चार्जेस" म्हणून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, अहमदनगर यांनी पत्र क्र.एसई /एनआरसी/ टेम्प/ ओआरसी/एलटी/३४/०६-०७ दिनांक २८-०६-२००६ चे पत्रान्वये या कामाला तांत्रिक मान्यता देऊन रु.२३,८५,०००.०० इतक्या खर्चाचे इस्टिमेट व महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या नियमानुसार या कामाच्या इस्टिमेटच्या / होणाऱ्या कामाच्या खर्चाच्या सुपरव्हिजन चार्जेसपोटी १५ % रक्कम संस्थानकडून घेण्याबाबत मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, संगमनेर यांना लेखी कळविले आहे. या कामात रस्त्यातून ओव्हरहेड कंडक्टरऐवजी भूमिगत केबल टाकणे, त्यासाठी आवश्यक फिडर पॅनेल उभारणे, वितरणासाठी पूर्वी नसलेले परंतू आता ०२ नग १०० के.व्ही.ए.क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसविणे, या रथ-पालखी रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या गल्ल्यांना व छोट्या रोडवरील वसाहतींना वीजपुरवठा करण्यासाठी केबल टाकणे, पाईप टाकणे, रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या बिल्डिंगमधील रहिवाशांना तसेच दोन्ही बाजूला असलेल्या गल्ल्यांमधील व छोट्या रोडवरील वसाहतींमधील रहिवाशांना दिलेल्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी वीजपुरवठ्याचे मापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने यापूर्वी बसविललेल्या एकुण ७०० नग सिंगल फेज मीटरला व एकुण ३०० नग थ्री फेज जुने मीटरला लागणारे सर्व्हिस कनेक्शन प्रत्येक बिल्डिंगपर्यंत / घरापर्यंत टाकणे वगैरे कामाचा समावेश असल्याने हे काम महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण होणे गरजेचे आहे. म्हणून शिर्डी शहरातील रथ पालखी रस्त्यावरील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वीज वितरण वाहिन्या भूमिगत करणेबाबतचे कामासाठी मंजूर दराने झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या १५% रक्कम "सुपरविजन चार्जेस" म्हणून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना आदा करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.०८. मध्यवर्ती भांडाराच्या खिडक्यांना लोखंडी जाळी बसविणेबाबत आलेली कोटेशन्स उघडून कोटेशन्ससादरकर्त्यांशी चर्चा / वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.७९१.** नविन गोडाऊनच्या खिडक्यांना लोखंडी जाळी बसविणेबाबत व येणाऱ्या रुपये १,०९,५००.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९-०८-२००६ चे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव या सभेत विषय क्र.५९ निर्णय क्र. ५८८ अन्वये मान्य करण्यात आला असून या कामासाठी वर्कशॉप-फॅब्रिकेटरकडून कोटेशन मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्कशॉप-फॅब्रिकेटरर्सना पत्र पाठवून कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०४ कोटेशन प्राप्त झाले आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव | अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|---|---|
| ०१. | मे.रुचा इंजिनिअरींग वर्क्स ,नवी मुबई | ०२. | मे.प्रणव कार्पोरेशन,पुणे |
| ०३. | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ०४. | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.रुचा इंजिनिअरींग वर्क्स ,नवी मुबई | १,५५,५२०.०० | अनुपस्थित |
| ०२ | मे.प्रणव कार्पोरेशन,पुणे | १,७९,८८१.०० | १,७०,०००.०० |
| ०३ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | १,६१,३४८.०० | १,५०,०००.०० |
| ०४ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | १,५३,१४६.०० | १,३५.०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं.०४ चे निविदासादरकर्ते मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.०९.** **मध्यवर्ती भांडारासाठी मटेरिअल, पुस्तकांचा साठा ठेवणेकामी लोखंडी स्टॅण्ड बनविणेकामी आलेले कोटेशन्स उघडून कोटेशन्ससादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७९२.** भांडार विभागातील पोते व पुस्तके ठेवणेसाठी ४४इंच x२८ इंच x१२ इच या मापाचे ५० नग लोखंडी स्टॅंड बाहेरील वर्कशॉपमधून तयार करुन घेणेसाठी एकुण रक्कम रुपये ७२,८००.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९-०८-२००६ चे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव या सभेत विषय क्र.६० निर्णय क्र. ५८९ अन्वये मान्य करण्यात आला असून या कामासाठी वर्कशॉप-फॅब्रिकेटरकडून कोटेशन मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्कशॉप-फॅब्रिकेटर्सना पत्र पाठवून कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०४ कोटेशन प्राप्त झाले आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.रुचा इंजिनिअरींग वर्क्स ,नवी मुबई |
| ०२ | मे.प्रणव कार्पोरेशन,पुणे |
| ०३ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०४ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.रुचा इंजिनिअरींग वर्क्स ,नवी मुबई | १,१५,१००.०० | अनुपस्थित |
| ०२ | मे.प्रणव कार्पोरेशन,पुणे | १,१६,३५८.०० | १,१५,०००.०० |
| ०३ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | १,१२,२६४.०० | १,१०,०००.०० |
| ०४ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | १,०५,२२१.०० | १,००,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या तातडीची गरज म्हणून अ.नं.०४ चे निविदासादरकर्ते मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देऊन त्यांचेकडून स्टॅंड तयार करून घेण्यात यावे व यापुढे अशा प्रकारच्या कामासाठी गोदरेज यासारख्या कंपन्याशी संपर्क साधून त्यांचेकडून दरपत्रक / माहिती मागविण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.१०.** **सहामाही गावरान तूप खरेदीबाबत निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.७९३.** **अ)**मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ निर्णय क्र.४० ड नुसार सन २००६-०७ करीता आवश्यक असणारे ३४०० क्विंटल गावरान तूप खरेदी दोन टप्प्यात निविदा मागवून खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दुस-या सहामाहीसाठी (१.११.२००६ ते ३०.०४.२००७) आवश्यक असणारे १७०० क्विंटल गावरान तूप खरेदीकामी दि.३-५ ऑक्टो.२००६ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०६.१०.२००६ ते दि.१३.०६.२००६ अखेर निविदा विक्रीस ठेवणेत येऊन निविदा स्विकारणेची मुदत दि.१४.१०.२००६ दुपारी १२.०० वा. अशी ठेवणेत आलेली आहे.

त्यानुसार मुदतीत प्राप्त होणा-या निविदांचे परिशिष्ट अलाहिदा सादर करणेत येत असून संबंधितांना आजचे सभेत चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आलेले आहे. तरी संबंधितांशी चर्चा तथा वाटाघाटी करुन दि.०१.११.२००६ ते दि.३०.०४.२००७ या दुसऱ्या सत्रासाठी गावरान तूप खरेदीबाबत निर्णय होणेस विनंती.

**ब)** सन २००६-०७ मध्ये दि.०१.०५.२००६ ते दि.३१.१०.२००६ या प्रथम सहामाहीसाठी आवश्यक असणारे १७०० क्विंटल गावरान तूप खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५.०५.२००६ निर्णय क्र.३०८ नुसार मे.एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्टस, संगमनेर यांना प्रती किलो रु.११०/-या दराने ८५० क्विंटल कॅनमधील लूज गावरान तूप पुरविणेसाठी आदेश देणेत आला होता. त्यानुसार त्यांनी पुरवठा केलेला असून १०० क्विंटल जादा पुरवठाही केलेला आहे. महाराष्ट्र शासनाने दूधाचे दरात वाढ केल्याने मे.थोरात, संगमनेर यांनी रु.१२५/-प्र.किलो व मे.पराग मिल्क,अवसरी फाटा यांनी रु.१३०/-प्र.किलो प्रमाणे मागणी केली होती. त्यावर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०८.२००६ मध्ये निर्णय होऊन " दोन्ही संघांना शिल्लक असलेल्या ८५० क्विंटल गावरान तूपापैकी प्रत्येकी ५० टक्के प्रमाणे गावरान तूप प्रती किलो रु.१२५/- या दराने पुरवठा आदेश देण्यात यावा. मे.पराग मिल्क हे रु.१२५/- प्रति किलो दराने तुप देण्यास इच्छुक नसल्यास मे.गोदावरी खोरे कोपरगांव यांचेकडून मंजूर दराने गावरान तुप खरेदी करण्यात यावे. त्यांनीही रु.१२५/- प्रति किलो दराने तुप पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यास पुर्ण ८५० क्विंटल लुज गावरान तुप मे.एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्ट संगमनेर यांचेकडून रु.१२५/- प्रति किलो दराने खरेदी करण्यात यावे " असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त निर्णयानुसार मे.थोरात,संगमनेर यांना ४२५ क्विंटल गावरान तुपासाठी पुरवठा आदेश देण्यात आलेला असून,त्यांचेकडून पुरवठा चालु आहे. मात्र प्रतिदिनी त्यांचेकडून होणारा पुरवठा पुरेसा नाही. तसेच मे.पराग मिल्क अवसरी फाटा व मे.गोदावरी खोरे कोपरगांव यांनी रु.१२५/- प्रतिकिलो दराने गावरान तुप पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेली आहे. दि.१/१०/२००६ ते दि.४/१०/२००६ या कालावधीत श्रीं चा पुण्यतिथी उत्सव असल्याने व या कालावधीत साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणात होण्याची शक्यता विचारात घेवून,दरम्यानचे कालावधीत श्री साईभक्तांना पुरेश्या प्रमाणात प्रसाद लाडु उपलब्ध व्हावेत म्हणून प्रसादालय विभागाचे मागणीनुसार मे.थोरात,संगमनेर यांचेकडे आवश्यक

त्याप्रमाणात जादा गावरान तुप पुरवविणेबाबत चौकशी केली असता,त्यांनी मार्केटमधील दुधाची आवक कमी असल्यामुळे जादा गावरान तुपाचा पुरवठा करु शकत नाही असे सांगितले. त्याचप्रमाणे मे.पराग मिल्क,अवसरी फाटा यांनीही रु.१५०/-प्रतिकिलो दराने दिपावली नंतर पुरवठा करण्याबाबत विचार करु असे सांगितले. तसेच मे.गोदावरी दुध खोरे,कोपरगांव यांनीही तुप पुरवठा करता येणार नाही असे सांगितले. त्यामुळे उत्सव कालावधीतील गावरान तुपाची अत्यावश्यकता विचारात घेवून, सन २००४ मध्ये गावरान तुप पुरवठा केलेले व संस्थानला वार्षिक किराणा माल पुरविणारे पुरवठाधारक मे.जयहींद किराणा स्टोअर्स,नासिक रोड यांचेकडून प्रतिकिलो रु.१३४/- व्हॅटसह या दराने (शिर्डी पोहोच) एकूण ९० क्विंटल ॲगमार्क गावरान तुप खरेदी करण्यात आलेले आहे. सदर गावरान तुप खरेदीमुळे उत्सव कालावधीत श्री साईभक्तांना पुरेश्या प्रमाणात प्रसादलाडु उपलब्ध करुन देणे शक्य झालेले आहे.

उत्सव संपल्यानंतरही श्री साईभक्तांची गर्दी टिकून आहे. उत्सवकाळात मे.जयहींद किराणा स्टोअर्स,नासिक रोड यांचेकडून खरेदी केलेले गावरान तुप संपलेले आहे. तसेच मे.थोरात,संगमनेर यांचेकडून दैनंदीन होणारा तुप पुरवठा अपुरा होत असल्याने गावरान तुपाअभावी श्री साईभक्तांना मागणीप्रमाणे प्रसादलाडु पुरविणे अडचणीचे होवू नये म्हणून, त्यातच सद्य परिस्थितीत गावरान तुपाची कमतरता व सध्याचे दिपावली सणामुळे गावरान तुपाचे दर वाढले असल्याने मे.जयहींद किराणा स्टोअर्स,नासिक रोड यांचेशी समक्ष चर्चा करुन त्यांचेकडून रु.१३६.५० प्रतिकिलो दराने ॲगमार्क ९० क्विंटल गावरान तुप खरेदी करण्यात आलेले आहे. मे.जयहींद किराणा स्टोअर्स,नासिक रोड यांचेकडून खरेदी केलेल्या एकूण १८० क्विंटल ॲगमार्क गावरान तुप खरेदी संदर्भात मा.उपसमिती सदस्य श्री.अभंग साो.यांचेशी तोंडी चर्चा करुन सदरची खरेदी केलेली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे 'ब' मध्ये नमुद केल्याप्रमाणे मे.जयहींद किराणा स्टोअर्स,नासिक रोड यांचेकडून रु.१३४/- प्रतिकिलो (व्हॅटसह) यादराने ९०क्विंटल व रु.१३६.५० प्रतिकिलो (व्हॅटसह) यादराने ९० क्विंटल याप्रमाणे खरेदी केलेल्या एकूण १८० क्विंटल गावरान तुप खरेदीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

तसेच "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे दि.०१/११/२००६ ते दि.३०/०४/२००७ या द्वितीय सहामाहीसाठी खरेदी करावयाच्या १७०० क्विंटल गावरान तुप खरेदीसाठी आलेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव | ब्रॅण्ड | निविदेतील दर रुपये व्हॅटसह | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | बाफना बाजार नाशिक- | महक - पॅक<br>मोहन भोग- पॅक | १२७.००<br>११७.०० | १२७.००<br>११७.०० |
| ०२. | मोहन सेल्स एजन्सी,नाशिक | पंजाब - पॅक<br>गोविंद- पॅक<br>पवित्रा-पॅक | १७६.८०<br>१७१.६०<br>१८२.०० | १३७.००<br>१४३.००<br>१५१.०० |
| ०३. | पराग मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट,मंजर | गोवर्धन-पॅक | १५६.०० | १५६.०० |
| ०४. | अग्रवाल मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट,पुणे | अग्रवाल-पॅक<br>लुज | १६५.८८<br>१६३.२८ | १६५.८८<br>१६३.२८ |
| ०५. | विजय डेअरी,जळगाव | विजय-पॅक<br>लुज | १५६.००<br>१५०.०० | १५६.००<br>१४५.०० |
| ०६. | एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्ट,संगमनेर | गगनगीरी-पॅक<br>लुज | १७०.००<br>१६५.०० | १६५.००<br>१६०.०० |
| ०७. | जयहिंद किराणा स्टोअर्स,नासिक | आबाद-पॅक | १३९.३६ | १३१.५०+४% व्हॅट =१३६.७६ |
| ०८. | जितेंद्र कुमार, औरंगाबाद | | १६१.०० | १५७.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.जयहिंद किराणा स्टोअर्स,नासिक यांनी संस्थानला वेळोवेळी तूपाचा पुरवठा केलेला आहे. त्यांनी पुरविलेल्या तूपाचा दर्जा चांगला असल्याने व संस्थानला आवश्यक असणारे तूप पुरविण्याची क्षमता असल्याने त्यांची रुपये १३१.५०+४% व्हॅट = रुपये १३६.७६ प्रति किलो या दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कालावधीपूर्वी १५ दिवस अगोदर पुरवठा आदेश देण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-खरेदी अधिकारी)

**विषय नं.११. नवीन वाहने खरेदीकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७९४.** संस्थानकडील बरीच वाहने जुनी झालेली असून त्यांचा पी.ओ.एल. आणि दुरूस्ती देखभाली वरील खर्च हा दिवसेंदिवस अप्रमाणात होत असून वाढ होत आहे. त्याचे विक्री मुल्य (रिसेल व्हॅल्यु) झपाटयाने कमी होत आहे. या बाबी एकत्रितपने विचारात घेता ही वाहने जाहीर लिलावाने विक्री करण्यात यावी. व त्या बदल्यात नवीन वाहने खरेदी करण्यात यावी. या बाबतच्या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/११/२००४ सभेतील निर्णय क्रं.१५९ ने १० वाहने व दि.१९/०८/२००६ सभेतील निर्णय क्रं.५३३(ब) व ६०५(ब) ने १४ वाहने अशी एकूण २४ वाहनांस जाहीर लिलावाने विक्री करणेस मान्यता मिळालेली आहे. पैकी दि.१७/०९/२००६ रोजी ०८ वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करण्यात आलेली आहे. तसेच, १४ वाहने जाहीर लिलावाच्या प्रक्रियेत आहेत.

वाहन विभागातील वापरात असलेली कार्यालयीन वाहने, स्कुलबसेस, भक्तनिवास बसेस, रुग्णवाहिका, मालवाहतूक वाहने अशी एकूण २४ वाहनांचा जाहीर लिलाव झाले नंतर वाहने अपुरी शिल्लक राहिलेने दैनंदिन कामात अडचणी निर्माण होणार आहे. त्या करीता नवीन वाहने खरेदी करणेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०८/२००६ चे सभेत सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रं.६०५(ब) नुसार ॲम्बेसॅडोर कार-०२, स्कॉर्पिओ-०१, टाटा सुमो-०२, महिंद्रा बोलेरो-०१, टुव्हिलर-०२, व बसेस-०५ अशी एकूण-१३ वाहने खरेदीस रू.एक कोटी मात्रचे खर्चस तसेच संबंधीत वाहनांच्या कंपनीचे अधिकृत डिलरकडून कोटेशन बोलाविणेस मान्यता मिळालेली आहे.

वरील निर्णयानुसार खालील प्रमाणे कोटेशस अधिकृत डिलर कडनू बोलावण्यात आलेली आहे.

**अ)दोन - ॲम्बेसॅडोर कार करीता**

| बोलाविण्यात आलेली कोटेशन | | प्राप्त झालेली कोटेशन | |
|---|---|---|---|
| ०१ | कैलास एजन्सी प्रा.लि., औरंगाबाद. | ०१ | कैलास एजन्सी प्रा.लि., औरंगाबाद. |
| ०२ | भारत इंजि., औरंगाबाद. | ०२ | जे विल्यम ॲण्ड कंपनी, पुणे. |
| ०३ | जे विल्यम ॲण्ड कंपनी, पुणे. | ०३ | फोर्ट पॉईट ऑटोमोटिव्ह,प्रा.लि., ठाणे. |
| ०४ | फोर्ट पॉईट ऑटोमोटिव्ह,प्रा.लि., ठाणे. | | |

**ब) एक - महिंद्रा स्कॉर्पिओ करीता**

| बोलाविण्यात आलेली कोटेशन | | प्राप्त झालेली कोटेशन | |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीराम ऑटोमोबाईल्स, अ.नगर. | ०१ | श्रीराम ऑटोमोबाईल्स, अ.नगर. |
| ०२ | जितेंद्र मोटर्स, नाशिक. | ०२ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि.कं., मुंबई (उत्पादक कं.) |
| ०३ | NBS इटरनॅशाल लि., मुंबई | ०३ | रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद. |
| ०४ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि.कं., मुंबई (उत्पादक कं.) | | |
| ०५ | रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद. | | |
| ०६ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कं., नाशिक. | | |

**क) एक - महिंद्रा बोलेरो करीता**

| बोलाविण्यात आलेली कोटेशन | | प्राप्त झालेली कोटेशन | |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीराम ऑटोमोबाईल्स, अ.नगर | ०१ | श्रीराम ऑटोमोबाईल्स, अ.नगर. |
| ०२ | जितेंद्र मोटर्स, नाशिक | ०२ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि. कं., मुंबई (उत्पादक कं.) |
| ०३ | NBS इटरनॅशाल लि., मुंबई. | ०३ | रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद. |
| ०४ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि.कं., मुंबई (उत्पादक कं.) | ०४. | NBS इटरनॅशाल लि., मुंबई. |
| ०५ | रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद. | | |
| ०६ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कं., नाशिक | | |

**ड) दोन - टाटा सुमो (व्हिक्टा) करीता**

| बोलाविण्यात आलेली कोटेशन | | प्राप्त झालेली कोटेशन | |
|---|---|---|---|
| ०१ | शुभयाना मोटर्स, अहमदनगर. | ०१ | हुडेकरी मोटर्स, प्रा. लि., अहमदनगर |
| ०२ | हुडेकरी मोटर्स, प्रा.लि., अहमदनगर. | ०२ | सतिष मोटर्स, प्रा लि.,अकोला (औ.बाद) |
| ०३ | सतिष मोटर्स, प्रा लि., औरंगाबाद | ०३ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक |
| ०४ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक | ०४ | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर |
| ०५ | सन्या मोटर्स, प्रा.लि.,औरंगाबाद | ०५ | सन्या मोटर्स, प्रा.लि.,औरंगाबाद |

**इ) पाच - टाटा बसेस करीता**

**(तीन - स्कुल बस व दोन - भक्तनिवास बस)**

| बोलाविण्यात आलेली कोटेशन | | प्राप्त झालेली कोटेशन | |
|---|---|---|---|
| ०१ | शुभयान मोटर्स, अहमदनगर | ०१ | शुभयान मोटर्स, प्रा. लि.,अहमदनगर |
| ०२ | सतिष मोटर्स, प्रा लि., औरंगाबाद | ०२ | सतिष मोटर्स, प्रा. लि., औरंगाबाद |
| ०३ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक. | ०३ | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर |
| ०४ | उज्जवल ऑटोमोटिव्ह, धुळे | | |
| ०५ | पंडीत ऑटोमोटिव्ह, सातारा | | |

**ई) दोन - टुव्हिलर हिरो होंडा करीता**

| बोलाविण्यात आलेली कोटेशन | | प्राप्त झालेली कोटेशन | |
|---|---|---|---|
| ०१ | शिवंग ऑटोमोबाईल्स,नाशिक. | ०१ | शिवंग ऑटोमोबाईल्स,नाशिक. |
| ०२ | जितेंद्र ऑटोमोबाईल्स प्रा लि., नाशिक. | ०२ | ईलक्सी ऑटो सेल, अहमदनगर |
| ०३ | राज ऑटो हिरो होंडा शोरूम, औरंगाबाद. | ०३ | बोरावके एंटरप्राईजेस, कोपरगांव. |
| ०४ | ईलक्सी ऑटो सेल, अहमदनगर | ०५ | बोरावके एंटरप्राईजेस, कोपरगांव. |
| ०६. | शिवंग आटोमोबाईल,नाशिक | | |

तरी वरील प्रमाणे १३ वाहनांकरिता प्राप्त झालेली ॲम्बेसॅडर कार करीता-०३, महिंद्रा स्कॉर्पिओ करीता-०३, महिंद्रा बोलेरो करीता-०४, टाटा सुमो (व्हिक्टा) करीता-०५, टाटा बसेस करीता-०३ तसेच टु व्हिलर करीता-०३ अशी एकूण २१ कोटेशन्स आजचे सभेत उघडणे येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

**अ) दोन - ॲम्बेसॅडोर कार (GRAND 05)**

**(ए.सी.पॉवर स्टेअरिंग पॉवर विंडो,सेंट्रल लॉक रिअर ए.सी .डक,म्यूझिक सिस्टम एम.पी.३ प्लेअर)**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | कैलास एजन्सी प्रा.लि., औरंगाबाद. | (डिझल) ५,१२,२७२.००<br>(पेट्रोल) ४,९१,०३५.०० | **५,१२,२७२.००**<br>४,९१,०३५.०० |
| ०२ | जे विल्यम ॲण्ड कंपनी, पुणे. | (डिझल) ५,२४,३००.००<br>(पेट्रोल) ४,९४,७००.०० | अनुपस्थित |
| ०३ | फोर्ट पॉईट ऑटोमोटिव्ह,प्रा.लि., ठाणे. | (डिझल) ५,१९,३३२.००<br>(पेट्रोल) ४,९०,७२०.०० | अनुपस्थित |

**ब) एक - महिंद्रा स्कॉर्पिओ करीता**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | मॉडेल | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीराम ऑटोमोबाईल्स, अ.नगर. | STD<br>DLX<br>SLX | ७,०८,९००.००<br>७,६६,८००.००<br>८,२९,९००.०० | अनुपस्थित |
| ०२ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि. कं., मुंबई (उत्पादक कंपनी) | STD<br>DLX<br>SLX | ६,६०,९१०.१८<br>७,१५,५५७.०४<br>**७,७१,३६४.४९** | अनुपस्थित |
| ०३ | रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद. | STD<br>DLX<br>SLX | ७,१८,०००.००<br>७,७३,०००.००<br>८,३२,०००.०० | अनुपस्थित |

**क) एक - महिंद्रा बोलेरो करीता**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | मॉडेल | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीराम ऑटोमोबाईल्स, अ.नगर. | XL [AC]<br>[ NON AC]<br>DX<br>SLX | ४,९०,१००.००<br>४,६४,६२०.००<br>४,९७,८००.००<br>५,६३,९५०.०० | अनुपस्थित |
| ०२ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि. कं., मुंबई (उत्पादक कं.) | XL [AC]<br>[ NON AC]<br>DX<br>SLX | ५,०५,७१६.५०<br>४,६०,८९०.९७<br>४,७३,२२९.४६<br>**५,३४,९७४.७३** | अनुपस्थित |
| ०३ | रत्नप्रभा मोटर्स, औरंगाबाद. | XL [AC]<br>[ NON AC]<br>DX<br>SLX | ---<br>---<br>५,०९,०००.००<br>५,७७,०००.०० | अनुपस्थित |
| ०४. | NBS इटरनॅशाल लि., मुंबई. | XL [AC]<br>[ NON AC]<br>DX<br>SLX | ---<br>५,०५,९००.००<br>५,१०,५००.००<br>५,६५,३००.०० | अनुपस्थित |

**ड) दोन - टाटा सुमो (व्हिक्टा) करीता**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | मॉडेल | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | हुडेकरी मोटर्स, प्रा. लि., अहमदनगर | CX<br>GX TC | ४,६२,५७३.००<br>६,०२,१९२.०० | ४,६२,५७३.००<br>६,०२,१९२.०० |
| ०२ | सतिष मोटर्स, प्रा लि.,अकोला (औ.बाद) आसन क्षमता ७+१ | CX<br>GX TC<br>GX TC | ४,६९,५४०.००<br>६,०९,१०९.००<br>६,१३,२१५.०० | अनुपस्थित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | स्टर्लिग मोटर्स, नाशिक<br>आसन क्षमता ७+१ | CX<br>GX TC<br>GX TC | ४,७१,५५४.००<br>६,११,२१५.००<br>६,१५,२६५.०० | ४,७१,५५४.००<br>६,११,२१५.००<br>५,९१,२१५.०० |
| ०४ | स्टर्लिग मोटर्स, बाभळेश्वर | CX<br>GX TC | ---<br>६,०९,२१५.०० | अनुपस्थित |
| ०५ | सन्या मोटर्स, प्रा.लि.,औरंगाबाद | CX<br>GX TC | ४,७०,५५७.००<br>५,३५,५८१.०० | **४,४५,५५७.००**<br>५,३५,५८१.००<br>(टर्बो इंजीन नाही) |

**इ) पाच - टाटा बसेस करीता**

**(तीन - स्कुल बस व दोन - भक्तनिवास बस)**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | मॉडेल | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | शुभयान मोटर्स, प्रा. लि.,अहमदनगर | स्कुल बस<br>स्टार बस | १५,१५,६९१.००<br>१५,६२,९१०.०० | **१४,९५,०००.००**<br>**१५,४२,०००.००** |
| ०२ | सतिष मोटर्स, प्रा. लि., औरंगाबाद | स्कुल बस<br>स्टार बस | १५,१६,९२९.००<br>१५,६४,१४४.०० | अनुपस्थित |
| ०३ | स्टर्लिग मोटर्स, बाभळेश्वर | स्कुल बस<br>स्टार बस | १५,१५,४८१.००<br>१५,६२,७५०.०० | १५,००,२७९.००<br>१५,४७,६५१.०० |

**ई) दोन - टुव्हिलर हिरो होंडा करीता**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | मॉडेल | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | ईलक्सी ऑटो सेल, अहमदनगर | सुपर स्प्लेंडर | ४३,२३६.०० | अनुपस्थित |
| ०२ | बोरावके एंटरप्राईजेस, कोपरगांव. | सुपर स्प्लेंडर | ४३,४००.०० | अनुपस्थित |
| ०३ | शिवंग ॲटोमोबाईल्स,नासिक | सुपर स्प्लेंडर | **४२,४८१.००** | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन,

अ) दोन ॲम्बेसॅडोर कार **(GRAND 05)** ऐवजी एक ॲम्बेसॅडोर कार **(GRAND 05- डिझेल)** खरेदी करण्यात यावी या कामी निम्नतम दर रू.५,१२,२७२.०० असलेले कैलास एजन्सी प्रा.लि., औरंगाबाद यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.

ब) एक महिंद्रा स्कॉर्पिओ ऐवजी दोन महिंद्रा स्कॉर्पिओ **(SLX)** खरेदी करण्यात याव्यात.

क) एक महिंद्रा बोलेरो **(SLX)** खरेदी करण्यात यावी.

दोन महिंद्रा स्कॉर्पिओ **(SLX)** खरेदी करणे कामी निम्नतम दर प्रति वाहन रू.७,७१,३६४.४९ व प्रती वाहन महिंद्रा बोलेरो **(SLX)** खरेदी करणे कामी निम्नतम दर रू.५,३४,९७४.७३ असलेले महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि.कं. मुंबई यांचे कोटेशन नुसार श्री राम ॲटोमोबाईल्स, अ.नगर यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.

ड) दोन टाटा व्हिक्टा खरेदी कामी एक व्हिक्टा **(CX)** निम्नतम दर रू.४,४५,५५७.०० असलेले सन्या मोटर्स, प्रा.लि. औ.बाद व एक व्हिक्टा **(GX TC)** निम्नतम दर रू.६,०२,१९२.०० असलेले मे.हूंडेकरी मोटर्स,अहमदनगर यांना पुरवठा आदेश देण्यात यावेत.

इ) तीन स्कुल बसेस व दोन भ.नि.बसेस अशा एकूण पाच टाटा बसेस खरेदी कामी स्कुल बस करीता निम्नतम दर प्रति बस रू.१४,९५,०००.०० व भक्तनिवास बस (स्टार बस) करीता निम्नतम दर प्रति बस रू.१५,४२,०००.०० असलेले शुभयान मोटर्स, प्रा.लि. अ.नगर यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.

ई) दोन टुव्हिलर-हिरो होंडा (सुपर स्प्लेंडर) खरेदी कामी निम्नतम दर असलेले शिवंग ऑटोमोबाईल्स, नाशिक यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. असे ठरले.

तसेच, वरील सर्व वाहनांचा पुरवठा आदेश देते वेळेस ५०% ॲडव्हान्स देण्यात यावा असे ही ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.१२.** **देणगी काऊंटरवर स्वॅपिंग मशिनवर क्रेडीट व डेबीट कार्डव्दारे देणगी स्विकारणेबाबत**

**निर्णय क्र.७९५.** सध्याच्या आधुनिक युगामध्ये क्रेडीट कार्डचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे. श्री साईभक्त शिर्डीस दर्शनाला येतांना मोठ्या प्रमाणात रोख रक्कम न आणता सोबत असलेल्या क्रेडीट कार्डव्दारे व्यवहार करण्याचे अधिक पसंत करीत आहे. शिर्डीत आल्यानंतर संस्थानला देणगी देण्यासाठी त्यांच्याकडे रोख रक्कम नसल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. श्री साईभक्ताच्या मागणीवरुन संस्थानच्या देणगी काऊंटरवर देणगी स्वीकारण्यासाठी EDC (Swiping) मशीन ठेवणे आवश्यक झाले आहे. यानुसार बॉबकार्डस् लिमिटेड, नासिक यांनी संस्थानला अशाप्रकारे देणगी स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत दिनांक ०४.१०.२००६ रोजी प्रस्ताव सादर केला आहे. बॉबकार्डस् लिमिटेड ही बँक ऑफ बडौदा यांची अधिकृत सेवा देणारी कंपनी आहे. बँक ऑफ बडौदा, नासिक येथे संस्थानचे परकीय

चलनाबाबतचे अधिकृत खातेही आहे. बॉबकार्डस् लिमिटेड यांनी संस्थानला पाठविलेल्या प्रस्तावातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे :

०१. सर्व्हीस चार्जेस {१.३०% कंपनीचे + गर्व्हमेंट सर्व्हीस टॅक्स १२.२४% (१.३०% वर)} असे एकूण सर्व्हीस (कमीशन) चार्जेस १.४५%.

०२. बँक ऑफ बडौदा, नासिक येथे संस्थानचे भारतीय चलनासाठी बचत खाते उघडावे लागेल. बॉबकार्डव्दारे होणारे दैनंदिन व्यवहाराची रक्कम दुसऱ्या दिवशी संस्थानच्या बचत खात्यावर जमा करण्यात येईल.

०३. EDC मशीनचे कोणत्याही प्रकारे भाडे आकारले जाणार नाही.

०४. प्रत्येक आठवड्याला झालेल्या व्यवहाराचे पुर्ण स्टेटमेंट संस्थानला नियमित देण्यात येईल.

बॉबकार्ड हे व्हीसा व मास्टर कार्डशी संलग्न असल्याने सर्व प्रकारचे क्रेडीट कार्डस् देणगीसाठी या मशीनवर स्वीकारले जाणार आहेत. क्रेडीट कार्डवर या मशीनव्दारे फक्त संस्थानच्या अधिकृत देणगी काऊंटरवरच देणगी स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात येईल. बॉबकार्डस् लिमिटेड ही बँक ऑफ बडौदाची अधिकृत सेवा देणारी कंपनी असल्याने व होणारे सर्व व्यवहार हे बँक ऑफ बडौदा, नासिक येथे संस्थानच्या खात्यावर दुसऱ्याच दिवशी जमा होणार असल्याने ही सेवा सुरक्षितेच्यादृष्टीने योग्य वाटते.

उपरोक्त आलेल्या प्रस्तावाप्रमाणे बॉबकार्डस् लिमिटेड, नासिक यांची EDC (Swiping) मशीन देणगी काऊंटरवर क्रेडीट कार्डव्दारे श्री साईभक्तांकडून देणगी स्वीकारण्यासाठी सुरु करण्यास, बँक ऑफ बडौदा, नासिक येथे संस्थानचे भारतीय चलनासाठी बचत खाते उघडण्यास, क्रेडीट कार्डव्दारे झालेल्या व्यवहारांवर बॉबकार्डस् लिमिटेड, नासिक यांना एकूण १.४५% सर्व्हीस (कमीशन) चार्जेस देण्यासाठी व त्याप्रमाणे या संबंधीत त्यांच्याशी तीन वर्षाचा करारनामा करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१३. सन २००५-२००६ या वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षकाचा लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.७९६.** लेखापरिक्षण अहवाल अद्याप सादर झालेला नसल्याने सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. तथापि कायद्यानुसार आवश्यक रिटर्नस् योग्य त्या पुर्ततेसह मुदतीत भरण्यास मान्यता देण्यात आली.

**विषय नं.१४. कोपरगांव रेल्वे स्टेशन, येसगाव ता.कोपरगांव येथे साई संस्थानमार्फत भक्तांसाठी निवासस्थळ बांधणे बाबत.**

**निर्णय क्र.७९७.** अ) उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.१.अन्वये श्री क्षेत्र शिर्डी येथे साईबाबांचे दर्शनासाठी मध्यप्रदेश, गुजराथ, आंध्रप्रदेश, व महाराष्ट्र राज्यातील धुळे, जळगांव, नंदुरबार, नाशिक आणि इतर जिल्ह्यातील साईभक्त हे मनमाड-अहमदनगर या महामार्गाने शिर्डीस येतात. तसेच आंध्रप्रदेश येथील साईभक्त हे मनमाड-अहमदनगर या महामार्गाने शिर्डीस येवला, कोपरगांव मार्गे शिर्डी येथे येतात. त्यांना येसगांव मध्यवर्ती ठिकाण असून, येसगांव ते शिर्डी यामधील अंतर २५ कि.मी.चे जवळ आहे. सदर ठिकाणी साईभक्तांच्या विश्रांती व इतर सुविधासाठी भक्तनिवास आवश्यक आहे.

तसेच देशातील व इतर राज्यांतील साईभक्त हे रेल्वेमार्गाने कोपरगाव येथील रेल्वेस्टेशनवर उतरतात व खाजगी साधनाने शिर्डी येथे येतात. तेव्हा कोपरगांव रेल्वेस्टेशन व येसगांव या दोन्ही ठिकाणी साईभक्तांची मोठया प्रमाणात वर्दळ असल्यामुळे त्यांच्या विश्रांतीसाठी व निवासासाठी भक्तनिवास होणे आवश्यक आहे.असे कळविले आहे.

ब) तसेच उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.२.अन्वये, मौजे देर्डे चांदवड व देर्डे-को-हाळे या मार्गे नाशिक व मुंबई, गुजरात व चांदवड या दोन मार्गाच्या साईभक्तांच्या पायी दिंडया गुरूपौर्णिमा,रामनवमी व दसरा अशा मोठया उत्सवाचे वेळेस, तसेच दर गुरूवारी बाबांचे भक्तगण मोठे संख्येने पायी येत असतात व मुक्काम करून दुसऱ्या दिवशी शिर्डीकडे जातात वरील दोन्ही गावातील मंदीरे हे लहान असल्यामुळे साईभक्ताची राहण्याची व्यवस्था ग्रामस्थ करू शकत नाही.

मौजे देर्डे चांदवड ग्रामपंचायतीच्या मालकीची शिर्डी- लासलगाव व शिर्डी- नाशिक या दोन्ही हायवे लगत २ एकर (०.८० आर) जागा असुन तेथील ग्रामस्थ साईभक्तांना राहण्याची सोय करण्याचे दृष्टीने भक्त निवास बांधण्यासाठी विनामुल्य देण्यास तयार आहेत.

मौजे देर्डे चांदवड या गावी साईभक्तांसाठी भक्तनिवास बांधुन दयावे असे विश्वस्तव्यवस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री. कोल्हे सो., यांनी संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे.

तरी मा.उपाध्यक्ष यांचे सुचनेनुसार कोपरगांव रेल्वे स्टेशन, येसगाव तसेच देर्डे चांदवड येथे साईभक्तांकरीता निवासस्थळ-तथा-विश्रांतीस्थान बांधणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन येसगाव तसेच देर्डे चांदवड येथे त्याचप्रमाणे गुहा ता.राहूरी येथेही साईभक्तांकरिता निवासस्थळ-तथा-विश्रांतीस्थान बांधणेकामी प्लॅन व एस्टिमेट तयार करण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. १५. साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) कॅन्टीनकरीता मशिनरी / साहित्य खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.७९८.** साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारत साईभक्तांचे वापरासाठी सन १९९४ पासून आहे. या इमारतीमध्ये सुमारे २९०० ते ३००० साईभक्तांची रहाण्याची व्यवस्था आहे. कॅटीनचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने दुरुस्तीचे तसेच अंतर्गत सुविधा निर्माण करणेकरीता कॅटीन मधील फ्लोरींग, भिंतीवरील टाईल्स, रंगकाम, ॲल्युमिनियम पार्टीशन व दरवाजे दुरुस्तीसह नवीन पार्टीशन, ग्रोईट टॉप काउंटर, फॉल सिलींग, डॅडो, टेबल टॉप इत्यादी सर्व कामांचा समावेश करुन रु. २३,८७,३००/- एस्टिमेटनुसार निविदा मागविण्यात येवून मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०४/२००६ चे सभेत निर्णय क्र.१८९ अन्वये श्री.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपुर यांची रु.२२,५५,३९९/- निविदा मंजुर करण्यात आली आहे. ठेकेदार यांनी मुख्य हॉल फॉलसिलिंगचे , भिर्तीना व्हेट्रीफाईड टाईल्स लावणे, विंडो सिल व ग्रील काम पुर्ण केले आहे. फ्लोरींगचे काम पुर्ण होत आले आहे. रंगकाम प्रगतीपथावर आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०४/०२/२००६ चे निर्णय क्र. २० नुसार किचन कन्सल्टंट श्री.संजिव देशमुख, (किचन सोलुशन, मुंबई) यांनी सुधारीत कॅटीनमध्ये घ्यावयाचे किचन मशिनरी/ साहित्याचे सविस्तर प्लॅन व एस्टिमेट सादर केले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**अ)**

| अ.नं | आयटम | साईज | नग | प्रती नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिंगल बरार रेंज | ३६"x३६"x२४" | ५ | १३,५००.०० | ६७,५००.०० |
| २ | साईड टेबल २ शेल्फ सह | २४"x३६"x३४"+६" | ५ | १६,५००.०० | ५२,५००.०० |
| ३ | डग क्नेडर | २०kg | १ | १,५०,०००.०० | १,५०,०००.०० |
| ४ | वर्क टेबल २ शेल्फ सह | ४५"x२४"x३४"+६" | १ | २३,५००.०० | २३,५००.०० |
| ५ | वॉल कॅबिनेट | ४"५x१२"x२४" | १ | १९,०००.०० | १९,०००.०० |
| ६ | वर्क टेबल २ शेल्फ सह | ६०"x२४"x३४"+६" | ३ | २६,५००.०० | ७९,५००.०० |
| ७ | वॉल कॅबिनेट | ६०"x१२"x२४" | २ | २४,०००.०० | ४८,०००.०० |
| ८ | इडली स्टेंबर | ९० इडली क्षमता | १ | २७,०००.०० | २७,०००.०० |
| ९ | वर्क टेबल सिंक सह | ४०"x२४"x३४"+६" | १ | २४,५००.०० | २४,५००.०० |
| १० | वर्क टेबल २ शेल्फ सह | २४"x२४"x३४"+६" | १ | ११,०००.०० | ११,०००.०० |
| ११ | ढोसा प्लेट | ४८"x२४"x३४"+६" | १ | २५,०००.०० | २५,०००.०० |
| १२ | वर्क टेबल २ शेल्फसह | ८३"x२४"x३४"+६" | १ | ३५,०००.०० | ३५,०००.०० |
| १३ | पिठ ठेवण्याचे भांडे (Flour Bins) | १८"x१८"x३१" | २ | ९,०००.०० | ९,०००.०० |
| १४ | बटाटा व कांदा ठेवण्याचे भांडे (Potato - Onion Bin) | ३६"x१८"x४८" | १ | २४,५००.०० | २४,५००.०० |
| १५ | चपाती प्लेट तवा (Chapati plate puffer) | ६०"x२४"x३४"+६" | १ | ३०,०००.०० | ३०,०००.०० |
| १६ | वर्क टेबल शेल्फसह | ४१"x२४"x३४"+६" | १ | २२,५००.०० | २२,५००.०० |
| १७ | वर्क टेबल शेल्फसह | ५३"x३०"x३४"+६" | १ | २४,५००.०० | २४,५००.०० |
| १८ | वर्क टेबल | ५४"x३०"x३४"+६" | २ | २४,५००.०० | ४९,०००.०० |
| १९ | मसाला ट्रे | ४८"x२४"x१२" | २ | २२,५००.०० | ४५,०००.०० |
| २० | स्प्रे न | | | | |
| २१ | भांडयाची मांडणी (pot rack) ५ shelves | ४२"x२४"x६६" | २ | २३,०००.०० | ४६,०००.०० |
| २२ | वेट ग्राईंडर | ७ kgs क्षमता | ३ | २२,०००.०० | ६६,०००.०० |
| २३ | पोटॅटो पिलर | १० kgs क्षमता | १ | ४७,०००.०० | ४७,०००.०० |
| २४ | पल्व्हराईझर | ५ Hp क्षमता | १ | ४८,०००.०० | ४८,०००.०० |
| २५ | वर्क टेबल २ शेल्फसह | ७५"x२४"x३४"+६" | १ | ३०,५००.०० | ३०,५००.०० |
| २६ | वर्क टेबल सिंकसह | ७१"x२४"x३४"+६" | १ | ३१,५००.०० | ३१,५००.०० |
| २७ | स्प्रे न | | | | |
| २८ | स्प्रे न | | | | |
| २९ | सॉलीड डिश ट्रॉली | २४"x३६"x३४" | ३ | २१,०००.०० | ६३,०००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३० | ३ सिंक प्रि-रिंस युनीट | ६६"x२८"x३४"+६" | १ | ३४,०००.०० | ३४,०००.०० |
| ३१ | ग्लास रॅक शेल्फ | ६६"x१४" | २ | ४,७००.०० | ९,४००.०० |
| ३२ | डिश वॉशर (Hood Type) | Imported | २ | २,८०,०००.०० | २,८०,०००.०० |
| ३३ | स्वच्छ डिश टेबल | ६६"x२८"x३४"+६" | १ | २४,५००.०० | २४,५००.०० |
| ३४ | स्प्रे न | | | | |
| ३५ | साठवण रॅक (५ shelves) | ४८"x२४"x६६" | ५ | २७,५००.०० | १,३७,५००.०० |
| ३६ | Hot Bain Marie | ६०"x३०"x३४" | ३ | ६६,०००.०० | १,९८,०००.०० |
| ३७ | स्प्रे न | | | | |
| ३८ | वजा पट्टी | १०० kgs | १ | ३३०००.०० | ३३०००.०० |
| ३९ | वर्क टेबल २ शेल्फसह | ३६"x२४"x३४"+६" | १ | १६,५००.०० | १६,५००.०० |
| ४० | वर्क टेबल सिंकसह | ४८"x२४"x३४"+६" | १ | २६,५००.०० | २६,५००.०० |
| | | | | एकूण :- | १८,९७,४००.०० |
| ४१ | टॅक्सेस, ट्रांसपोर्ट, इंशुरन्स, पॅकेजींगफॉरवर्डींगए Octrai if any इत्यांदीसह किंमत | | | एकूण :- | २२,००,०००.०० |

याशिवाय त्यांनी एक्झॉस्ट फॅा व फ्रेश एअर सिस्टीम, एल.पी.जी. सिस्टीम इत्यादीचे खालीलप्रमाणे एस्टिमेट सादर केले आहे.

| | | |
|---|---|---|
| एक्झॉस्ट आणि फ्रेश एअर सिस्टिम | :- | ८,००,०००.०० |
| VAT १२.५% | :- | १,००,०००.०० |
| एल.पी.जी.सिस्टिम | :- | १,५०,०००.०० |
| VAT १२.५% | :- | १८,७५०.०० |
| इतर आयटेम फायर एक्स्टींग्युशन,वॉटर बॉयलर व प्युरिफिकेशन एअर कर्टन | | २०,०००.०० |
| **एकूण :-** | | **३२,८८,७५०.००** |
| **अंदाजे :-** | | **३३,००,०००.००** |

५०० रुम (भक्तनिवास) येथील कॅन्टीन ठेकेदारामार्फत चालविण्यात येते. संस्थान मार्फत ज्या मशिनरी ठेकेदार यांना उपलब्ध करुन देण्यात येतात त्या मशिनरी ठेकेदार योग्य प्रकारे वापरत नाही. त्यांचे मेंन्टेनन्स/ देखभाल योग्य प्रकारे ठेवत नाहीत. जे ठेकेदार कॅटीन चालविण्याचा ठेका घेतात त्यांचे स्वतःकडे मशिनरी/ उपकरणे उपलब्ध असतात, त्यामुळे भक्तनिवास कॅन्टीनसाठी आवश्यक तेवढीच उपकरणे खरेदी करणे योग्य राहील असे प्रसादालय प्रमुख यांनी ११/०९/२००६ चे पत्रान्वये कळविले आहे.

किचन कन्सल्टंट श्री.संजिव देशमुख यांनी किचन मशिनरी/ साहित्य खरेदी करणेकामी सादर केलेले एस्टीमेटनुसार रु. ३३,००,०००.०० मात्र खर्च अपेक्षित आहे. किचन कन्सल्टंट यांचे सल्ल्यानुसार कॅटीन ठेकेदारांने कोणेते मशनरी व साहीत्य आणावे याबाबत सल्ला घेता येईल. व आवश्यक मशिारी व साहीत्याचे निविदा श्री देशमुख यांचे सल्ल्याने मागविता येतील, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,साईबाबा भक्तनिवासस्थान येथील कॅटीन कंत्राटी पद्धतीने भाडे तत्वावर चालविण्यास द्यावयाचे असल्याने या कॅटीनसाठी आवश्यक असणारे मशिनरी/साहित्य सबंधित ठेकेदाराने स्वतः आणावे. संस्थानने खरेदी करु नये. तसेच कॅंटीनमधील वायुवीजनसाठी तज्ञांचे सल्ल्याने निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/भक्तनिवासस्थान/विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं. १६.** **मौजे पांढूर्ली ता.सिन्नर येथील बक्षिसपत्राने मिळालेल्या जागेत पालखी थांबा उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.७९९.** **(अ)** मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये, सौ. सिंधुबाई विजय दळवी, राहणार विंचुरी दळवी यांनी त्यांची मौजे पांढुर्ली, तालुका सिन्नर येथील गट नंबर १९ मधील ०० हेक्टर ४९ आर जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना विनामुल्य बक्षीसपत्राने दिनांक ३१ ऑगष्ट, २००६ रोजी दिलेली आहे. याबाबतचे बक्षीसपत्र मा.दुय्यम निबंधक, सिन्नर यांचेसमोर नोंदविण्यात आलेले आहे.

सदर जागेचा ताबा सौ. दळवी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे दिला असून, या जागेची मोजणी बांधकाम विभागाकडील कंत्राटी मोजणीदार यांनी करुन, प्लॉटच्या हद्दीचे सिमांकन केलेले आहे.

**(ब)** मौजे पांढुर्ली, तालुका सिन्नर येथील बक्षीसपत्राने मिळालेल्या ४९ आर जागेत उभारावयाच्या पालखी थांबा वास्तूचा बांधकाम आराखडा व तपशीलवार अंदाजपत्रक मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांनी तयार केलेले आहे. याबाबत मा.अध्यक्षसो. यांचेशी समक्ष चर्चा करणेत आलेली आहे.

मा.अध्यक्षसो. यांनी सुचविलेल्या काही सुधारणांसह सुधारीत बांधकाम आराखडा व रुपये ४१,१७,२८१/- (अक्षरी रुपये एकेचाळीस लाख सतरा हजार दोनशे एक्याऐंशी मात्र) चे अंदाजपत्रक मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांनी सादर केलेले आहे.

**(क)** उपरोक्तप्रमाणे मे. निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपुर यांनी तयार केलेल्या बांधकाम आराखडयाप्रमाणे व अंदाजपत्रकानुसार मौजे पांढुर्ली, तालुका सिन्नर येथील विषयांकित जागी पालखी थांबा वास्तूचे बांधकाम करणेसाठी वर्तमानपत्रात विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करुन, सिलबंद निविदा मागविणेस तसेच सदरील जमीन बिनशेती करणेकामी पुढील कार्यवाही करणेसाठी व याकामी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१७. मौजे शिर्डी ता.राहता येथील सर्व्हे नं.३/२ व स.नं. ३/३ (सि.स.नं.९०९ पैकी) क्षेत्र ००.०२ आर जमिन भूसंपादनासाठी बिनव्याजी म्हणून रक्कम जमा करणेस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.८००. (अ)** श्रीमती फातमाबी बक्षु शेख व श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांची मौजे शिर्डी, तालुका राहाता येथील खाजगी मालकीची स.न्नं. ३/२ व ३/३ क्षेत्र ०० हेक्टर ०२ आर जमीन भू संपादनाचे प्रकरण मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपुर विभाग यांचेमार्फत सुरु आहे.

याकामी, मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८ डिसेंबर, २००५ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्रमांक ७७१ पुढीलप्रमाणे झालेला आहे :

"..... श्रीमती फातमाबी बक्षू शेख यांची शिर्डी येथील स.न्नं. ३/२ क्षेत्र ०-१-५० आर व श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार हेक्टर ०-००-५० चौमी जागा (जमीन भूसंपादनाने प्राप्त करुन घेणेबाबत त्याकामी) म.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस भू संपादन कायदा १८९४ प्रमाणे भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

**(ब)** उपरोक्त निर्णयाप्रमाणे मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना इकडील पत्र जा. क्र. एसएसएस/वशी/बांधकाम/भूसंपादन/५६७५/२००६, दिनांक ०१ मे, २००६अन्वये श्रीमती फातमाबी बक्षु शेख व श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांची खाजगी मालकीची अनुक्रमे स.न्नं. ३/२ व स.न्नं. ३/३ मधील क्षेत्र ०० हेक्टर ०२ आर जमीन भू संपादन करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर, मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर त्यांचेकडील आदेश क्र. भूसं/कार्या/१६अ/४९३/२००६, क्र.भूसं/एसआर/उविअ/५८/२००६ दिनांक ०९ जून, २००६ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ५२ अ नुसार जमीन भूसंपादनाचे सर्व अधिकार प्रदान केलेले आहेत.

**(क)** मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडील पत्र जा.क्र. कावि/भूसं २/१४७६/२००६ दिनांक १९ जून, २००६ अन्वये भूसंपादनाने घ्यावयाच्या जमिनीची संयुक्त मोजणीकामी तालुका भूमी अभिलेख, कोपरगांव यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार सदर प्रकरणी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, कोपरगांव यांनी त्याचेकडील पत्र क्र.भूमापन/राहाता/भूसं/मोरन्नं. १३३/२००६, दिनांक १४ सप्टेंबर, २००६ अन्वये संयुक्त मोजणी अहवाल मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना सादर केलेला आहे.

मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडील पत्र क्रमांक कावि/भूसं/२२२९/२००६ दिनांक १८ सप्टेंबर, २००६ अन्वये असे कळविले आहे की, शासन निर्णय दिनांक १४ जून,२००१ नुसार अंदाजित मोबदला रकमेच्या २/३ रक्कम बिनव्याजी ठेव म्हणून, भूसंपादक संस्थेने जमा करणे आवश्यक आहे. उपरोक्त विषयांकित संपादनाखालील जमिनीची ( दिलासा, कांम्पोनन्ट रक्कम, आस्थापना खर्चासह) सन २००६ या वर्षाचे शिघ्रसिध्द गणक दरानुसार अंदाजित किंमत रुपये १९,४०,१२०/- इतकी येत असुन, या रक्कमेच्या २/३ अंदाजित मोबदला रक्कम रुपये १२,९३,४१३/- (अक्षरी रुपये बारा लाख त्र्यान्नव हजार चारशे तेरा मात्र)ा इतकी रक्कम बिनव्याजी ठेव म्हणून सत्वर त्यांचेकडे जमा करावी. जेणेकरुन भूसंपादन कलम ४ खालील अधिसूचना प्रसिध्द करणे कार्यालयास सोयीस्कर होईल.

**(ड)** उपरोक्त परिच्छेद क मधील विवेचनानुसार, मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर विभाग, श्रीरामपूर यांनी विषयांकित श्रीमती फातमाबी बक्षु शेख व श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार यांची खाजगी मालकीची अनुक्रमे स.नं. ३/२ व स.न्नं. ३/३ मधील एकुण क्षेत्र ०० हेक्टर ०२ आर जमीन भू संपादनाने घेणेकामी, मागणी केलेली अंदाजित मोबदला रक्कमेच्या २/३ इतकी रक्कम रुपये १२,९३,४१३/- (अक्षरी रुपये बारा लाख त्र्यान्नव हजार चारशे तेरा मात्र) बिनव्याजी ठेव म्हणून मा. उपविभागीय

अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे भरणा करणेत आलेली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१८.** **नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांबाबत.**

**निर्णय क्र.८०१.** शिर्डी शहरातील श्री साईबाबा मंदिर सुरक्षा दृष्टीने दि. १७/०९/२००६ रोजी शिर्डी येथे बैठक झाली. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

०१) मा.आ. श्री. जयंतराव ससाणे साहेब, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
०२) मा.आ. श्री.राधाकृष्ण विखे पाटील, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
०३) मा.डॉ. ई.बी.गोंदकर सो., विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
०४) मा.श्री. पाडुंरंग अभंग सो., विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
०५) मा.श्री. अशोक खांबेकर सो., विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
०६) मा.श्री. सुरेश वाबळे सो., विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी
०७) मा.श्री. उमाकांत दांगट, जिल्हाधिकारी, अहमदनगर
०८) मा.श्री. सुनील रामानंद, जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर
०९) मा.श्री. भाऊसाहेब वाकुचौरे साहेब,कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

सदर बैठकीमध्ये मंदीर सुरक्षा दृष्टीने चर्चा झालेली आहे. पोलीस विभागामार्फत शिर्डी शहरातील पिंपळवाडी रस्ता, नगर-मनमाड रस्ता एका भागाची वहातूक बंद केलेली आहे. सदर रस्त्यांना पर्यायी मार्ग म्हणून खालील आस्तित्वातील रुंदीचे रस्ते श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचे मार्फत तातडीने सुरु करावीत असे ठरलेले आहे.

०१) शिर्डी निमगांव शिव रस्ता (नगर- मनमाड रस्ता ते सन ॲण्ड सन कडे जाणारा ) अस्तित्वातील रस्ता लांबी ८०० मीटर रुंदी ३.७५ मीटर
०२) पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता हॉटेल भाग्यलक्ष्मी समोरील रस्ता लांबी ५०० मीटर रुंदी ४.५० मीटर
०३) शिर्डी कनकुरी रस्ता लांबी १००० मीटर रुंदी ७.५० मीटर
०४) शिर्डी रुई रस्ता लांबी ७०० मीटर रुंदी ३.०० मीटर
०५) शिर्डी नविन पिंपळवाडी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे लांबी ६३० मीटर रुंदी १२ मीटर

वरीलप्रमाणे अस्तिवातील रस्त्यांच्या रुंदीप्रमाणे रस्त्यांचे कॉंक्रीटीकरणाची कामे संस्थानमार्फत सुरु करणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी दि.१८/०९/२००६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

उपरोक्त रस्त्यापैंकी शिर्डी - कनकुरी रस्त्याचे कामास यापुर्वीच शासनाने मान्यता दिलेली असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदर रस्त्याचे काम सुरु करण्यात येत आहे. उर्वरीत चार रस्त्यांचे अस्तित्वातील रुंदीप्रमाणे कॉंक्रीटीकरण करणे कामी आर्किटेक्ट मे.निकम पा.श्रीरामपूर यांचेकडून एस्टीमेट मागविण्यात आले आहे. आर्किटेक्ट यांनी याकामी रु. १,५२,८६,०५२.०० मात्रचे इस्टीमेट सादर केले आहे.

सदरचे रस्ते आस्तित्वातील रुंदी नुसार कॉंक्रीटीकरण केल्यास भविष्यात डी.पी.प्लॅन नुसार रस्त्याचे रुंदीकरणाचे काम करणे अवघड होईल. त्यामुळे अस्तित्वातील रस्त्याचे उपलब्ध रुंदीप्रमाणे डांबरीकरण केल्यास भविष्यातील रुंदीकरण, ड्रेनेज सिस्टिम, विद्युतीकरण करणे सोयीचे होईल. त्यामुळे सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे योग्य राहील. शिर्डी-निमगांव शिव रस्ता व शिर्डी-कनकुरी रस्ता वगळता तीन रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी रु. ३३,१३,९९२.०० चे एस्टीमेट आर्किटेक्ट मे. निकम पा. असोशिएटस, श्रीरामपूर यांनी सादर केले आहे

याबाबत मा.अध्यक्ष महोदय व मा.कार्यकारी अधिकारी यांचे समवेत समक्ष झालेल्या चर्चेत नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामासाठी यापुर्वी निविदा मागविण्यात आल्या आहेत. दि. १८/१२/२००६ नि.क्र. ७४० अन्वये झालेले बैठकीत ठेकेदार मे.पॅसो इंजि.ॲण्ड कॉन्ट्रक्टर,कोपरगांव यांची निविदा (निविदा दरापेक्षा ०.०७% कमी) मान्य करण्यात आली आहे. तसेच शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर कामामध्ये निमगावं-शिव रस्त्याच्या कामाकरीता रु.१४,१२,९४९.०० खर्चाचा समावेश आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने जून्या पिंपळवाडी रस्त्याला पर्यायी रस्ता साईभक्तांचे सोयीसाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने सदर रस्त्याचे काम पॅसो इंजिनिअर्स, कोपरगांव यांचेमार्फत त्वरीत सुरु करावे असे ठरले. त्यानुसार सदरचे काम पॅसो इंजिनियर्स यांचेकडून करुन घेता येईल व उर्वरीत शिर्डी - कनकुरी रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर मार्फत करण्यात येत आहे. नवीन पिंपळवाडी रस्त्याचे डांबरीकरण मागील वर्षी संस्थानमार्फत करण्यात आले आहे व कॉंक्रीटीकरणाचे काम एम.एस.आर.डी.सी. यांचेमार्फत प्रस्तावीत आहे. उर्वरीत

अ.क्र. २,४ ची आवश्यकता असल्याने सदर दोन रस्त्यांसाठी कामाच्या निविदा तयार करुन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१९. मध्यवर्ती देणगी कांऊंटर इंटेरिअरबाबत.**

**निर्णय क्र.८०२.** "श्रीसाईभक्तांकडून देणगी स्वीकारण्यासाठी मंदिर परिसरामध्ये विविध ठिकाणी एकूण पाच काऊंटर्स सुरु करण्यात आलेले आहेत. यासर्व काऊंटर्सची जागा लहान असल्याने तेथे साईभक्तांना देणगी देतांना हव्या असलेल्या सोईसुविधा पुरवीता येत नाहीत. शिवाय देणगी स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्यांच्यावर नियत्रंण ठेवणेही अवघड जाते. श्री साईभक्त देणगी देण्यासाठी काऊंटर्सवर येत असल्याने त्यांना संस्थानची संपूर्ण माहिती, संस्थानने हाती घेतलेले नविन प्रकल्प, विविध योजना, भक्तांना पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवासुविधां व आयकरामध्ये मिळत असलेली सुट इ. पुरेपूर माहिती देता येत नाही.शिवाय देणगीदार भक्तांना काऊंटर्सवर आल्यानंतर त्यांना बसण्यासाठी व थंड पाणी यासारखी मुलभूत सेवा परवीणेही सध्या जागेअभावी शक्य होत नाही.

वरीलप्रमाणे देणगी काऊंटर्सवरील अडचणी दूर करण्यासाठी सर्व ठिकाणचे देणगी काउंटर्स एकत्रीत करुन, मंदिर परिसरात मध्यवर्ती ठिकाणी मोठ्या जागेत देणगी स्वीकारण्याची सोय उपलब्ध करुन देणे अत्यंत आवश्यक झाले आहे. अशाप्रकारची जागा सध्या मंदिर परिसरात पुर्वी सुरु असलेली कॅन्टीन प्रसादालय विभागात हलविल्याने तेथील मोकळी झालेली जागा देणगी काऊंटर्ससाठी वापरता येईल. सदर जागा मोठी असल्याने तेथे मंदिर परिसरातील सर्व देणगी काऊंटर्सचे एकत्रीकरण करुन, भक्तांना हव्या असणाऱ्या मुलभूत सेवा व सुविधां सहज पुरवीता येणे शक्य आहे. त्याचप्रमाणे देणगीदार भक्तांच्या सर्व शंकाचे निरासन राहील व देणगी सारखी मोठी रक्कम एका ठिकाणी गोळा होत असल्याने तेथील सुरक्षिततेच्यादृष्टीनेही चांगले उपाय योजता येतील."

त्याचप्रमाणे साईबाबा संस्थान प्रकाशनांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच पुस्तके/फोटो सोबत श्री साईबाबांविषयी नव्याने कॅसेट व ऑडिओ, व्हिडिओ सिडीचीही निर्मिती करुन भक्तांना विक्रिसाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. यातही पुढे वाढच होणार आहे. याप्रमाणे प्रकाशनांचीही दिवसेंदिवस होणारी वाढ लक्षात घेता प्रकाशने विक्रीसाठी अद्यावत सुसज्ज असे सुधारीत बुकस्टॉल असणे आवश्यक आहे. बुकस्टॉलचे वरील प्रदर्शनी भागात भक्तांना विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या प्रकाशनांचे अवलोकन होण्यासाठी वेगवेगळे डिस्प्ले शोकेस असणे आवश्यक आहे. तसेच जवळच पुस्तके ठेवण्यासाठी सबस्टोअरची व्यवस्था असने आवश्यक आहे. अशाप्रकारे सुसज्ज बुकस्टॉल समाधी मंदिर परिसरातील जुन्या कॅन्टीनच्या पश्चिमेकडील अर्ध्या भागात करता येईल.

देणगीदार साईभक्तांना देणगी देणेसाठी पुर्वी कॅन्टीन असलेल्या मध्यवर्ती जागेत मध्यवर्ती देणगी काउंटर उपलब्ध करुन देता येईल. प्रशस्त देणगी काउंटर, प्रतिक्षा कक्ष, स्वागत तथा माहिती काउंटर इत्यादी सोयी-सुविधा इंटेरियर/फर्निचरसह तयार करणेसाठी अंदाजे रु.१२,१७,३७४.०० मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच सर्व सोयीयुक्त असे अद्यावत बुकस्टॉल करणेकामी अंदाजे रु.३,९५,०००.०० मात्र खर्च अपेक्षित आहे. बुकस्टॉल व डोनेशन हॉल इंटेरियर, फर्निचर व ए.सी.सह एकूण रु.१६,१२,३७४.०० मात्र खर्चाचे एस्टीमेट आर्किटेक्ट निकम पाटील श्रीरामपूर यांनी सादर केले असून,त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२०. मुंबई येथील साईनिकेतन इमारत विस्तारीकरणकरणेकामी आर्किटेक्ट फी बाबत.**

**निर्णय क्र.८०३. (अ)**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांची मुंबई येथील कार्यालयाची **"साईनिकेतन"** ही जुनी इमारत पाडून, त्याठिकाणी अद्यायवत अशी नवीन विस्तारी इमारतीचे बांधकम प्रस्तावित आहे. याकामी अंदाजपत्रकासह बांधकाम आराखडा तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०२ ऑक्टोबर, २००५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६१७ अन्वये ऑरगॅनिक्स, मुंबई (आर्किटेक्ट श्री.राहुल पी. आंबेकर) या संस्थेची नेमूणक करण्यात आलेली आहे.

ऑरगॅनिक्स, मुंबई (आर्किटेक्ट श्री.राहुल पी. आंबेकर) या संस्थेने त्यांचे दिनांक ०९ सप्टेंबर, २००६ रोजी ई-मेल पत्राव्दारे नियोजित नविन **" साईनिकेतन "**या इमारतीचे विकसन करणे, इमारतीचे बांधकाम आराखडे तयार करणे, बांधकाम आराखडयांना महानगरपालिकेच्या संबंधीत विभागांची मंजुरी मिळविणे, अंदाजपत्रक तयार करणे, विहीत पध्दतीने निविदा तयार करुन बांधकाम ठेकेदाराची नेमणूक करणेकामी मार्गदर्शन करणे, प्रकल्प सुरु झाल्यापासून संपेपर्यन्त त्यावर नियंत्रण व देखरेख ठेवणे व इतर अनुषंगिक सेवा पुरविणे याकामी प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या ०५ (पाच) टक्के आर्किटेक्ट फी आकारणेत येईल, असे कळविलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे प्रकल्पाच्या एकुण किंमतीच्या ०५ (पाच) टक्के आर्किटेक्ट फी खालीलप्रमाणे वेळोवेळी आकारण्यात येईल असे कळविले आहे :

०१. आर्किटेक्ट नेमणूक करारनामा करतेवेळेस तसेच प्राथमिक जागा

| | | |
|---|---|---|
| | पहाणी व बांधकाम आराखडे सादरीकरण | १० टक्के |
| ०२. | बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक पूर्ण झालेवर | १० टक्के |
| ०३. | बांधकाम आराखडयांना संबंधित विभागांची मंजुरी मिळालेनंतर | १५ टक्के |
| ०४. | बांधकाम ठेकेदाराची नेमणूक व प्रत्यक्ष काम सुरु झालेनंतर | १५ टक्के |
| ०५. | उर्वरित ५० टक्के आर्किटेक्ट फी वेळोवेळी कामाच्या प्रगतीच्या प्रगतीनुसार | |

**(ब)** ऑरगॅनिक्स, मुंबई या संस्थेचे आर्किटेक्ट श्री.राहुल पी. आंबेकर यांचेशी मा.अध्यक्षसाो. व मा.व्यवस्थापन समिती सदस्य मा.श्री.राधाकृष्ण विखे पा. यांनी दिनांक २६ सप्टेबर, २००६ रोजी मुंबई येथे आर्किटेक्ट फी व कामकाजासंबंधी समक्ष चर्चा केली.

या चर्चेनुसार, ऑरगॅनिक्स, मुंबई (आर्किटेक्ट श्री. राहुल पी. आंबेकर) या संस्थेस उपरोक्त प्रकल्पाच्या एकुण किंमतीच्या ०३ (तीन) टक्के आर्किटेक्ट फी देण्याबाबत मान्यता दर्शविलेली आहे. या आर्किटेक्ट फी मध्ये उपरोक्त परिच्छेद अ मध्ये दर्शविलेल्याप्रमाणे सर्व कामांचा समावेश असून, ही आर्किटेक्ट फी अदा करणेसाठी आवश्यक करारनामा करुन वेळोवेळी अदा करावयाची आहे.

तरी ऑरगॅनिक्स,मुंबई (आर्किटेक्ट श्री.राहुल पी.आंबेकर) यांना **"साईनिकेतन"** या इमारतीचे विकसन करणेकामी ०३ (तीन) टक्के आर्किटेक्ट फी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन ऑरगॅनिक्स, मुंबई यांना उपरोक्त प्रकल्पासाठी ०३ (तीन ) टक्के आर्किटेक्ट फी अधिक प्रचलीत दराने सर्व्हीस टॅक्स अदा करणेसाठी मान्यता देणेत आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२१. आरक्षण क्रमांक ८ (सर्व्हे न्नं.६ पैकी) मधील जमीनीचे भूसंपादनापोटी भरण्यात आलेल्या रकमेबाबत**

**निर्णय क्र.८०४.** मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कावि/भूसं२/ २३५२/०६, दिनांक ०३ ऑक्टोबर,२००६ अन्वये आरक्षण क्रमांक ०८ (सर्व्हे नंबर ६ पैकी) क्षेत्र ०० हेक्टर ११ आर ५४ चौमी प्राथमिक शाळा, क्रिडांगण व शैक्षणिक वापराकरीता भूसंपादनापोटी खालीलप्रमाणे रकमेची मागणी केलेली आहे :

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | जमीन मालकांना नुकसानभरपाई देय रक्कम | रुपये | ४२,२४,७५९/- |
| (ब) | ०३ टक्के आस्थापना खर्चाची रक्कम | रुपये | ०१,२६,७४३/- |
| | एकुण | रुपये | ४३,५१,५०२/- |

तरी, उपरोक्त अ व ब मिळून रक्कम रुपये ४३,५१,५०२/- (अक्षरी रुपये त्रेचाळीस हजार एकावन्न हजार पांचशे दोन मात्र ) स्वतंत्ररित्या दोन डिमांड ड्राफ्टव्दारे मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडेस भरणेकामी कळविलेले आहे.

उपरोक्त **अ** प्रमाणे नुकसान भरपाईपोटी रक्कम रुपये ४२,२४,७५९/- मात्र व **ब** प्रमाणे ३ टक्के आस्थापना खर्चाची रक्कम रुपये ०१,२६,७४३/- मात्रचे, दोन स्वतंत्र डिमांड ड्राफ्टव्दारे मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर या नांवाने भरणेत आलेले असून, त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होत, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२२. मुंबई ते शिर्डी मार्गावरील पालखी थांबा वास्तू उभारणेकामी देणगी स्वीकारणेबाबत.**

**निर्णय क्र.८०५. (अ)**श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनार्थ मुंबई व मुंबई परिसरातून मोठया प्रमाणावर श्री साईभक्त पदयात्रेने पालख्या घेऊन येत असतात. या मुंबई व मुंबई परिसरातून येणारे पदयात्रींसाठी मुंबई - शिर्डी मार्गावर पदयात्रींसाठी सर्वसोयींनी युक्त असे विश्रांतीचे स्थान असावे या हेतूने अंदाजे प्रत्येकी ३० किलोमीटरचे अंतरावर संस्थानच्या वतीने पालखी थांबा वास्तू उभारण्याचे नियोजन आहे.

त्यास अनुसरुन,

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | सायाळे | ०२. | वावी | ०३. | सिन्नर |
| ०४. | पांढुर्ली | ०५. | घोटी | ०६. | पाडळी |
| ०७. | लतीफवाडी | ०८. | पेंढरघोळ | ०९. | वाहुली |

या ठिकाणी अथवा उपरोक्त गांवाच्या आसपास उपलब्ध होणारे जमिनीत / जागेत पालखी थांबा वास्तू उभारणेत येणार आहे.

**(ब)** उपरोक्त गांवापैकी, मा.व्यवस्थापन समितीच्या विविध निर्णयांन्वये,

०१. मौजे सिन्नर येथील सिन्नर औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित या संस्थेचा मौजे मुसळगांव शिवारातील ३६०० चौरस मीटरचा प्लॉट दिर्घ मुदतीचे भाडेपट्टयाने घेण्यात आला आहे.

०२. मौजे पांढुर्ली येथील सौ. सिंधुबाई विजय दळवी यांची गट नंबर १९ मधील ४९ आर जमीन बक्षीसपत्राने मिळालेली असून, त्याबाबतचे बक्षीसपत्र करणेत आलेले आहे.

उपरोक्त दोन्ही जागांवर, मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार पालखी थांबा वास्तूचे बांधकाम करणेकामी बांधकाम आराखडा व अंदाजे रक्कम रुपये ४० लाख मात्रपर्यन्तचे खर्चाचे तपशीलवार अंदाजपत्रक मे. निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेले आहेत. त्यानुसार उपरोक्त दोन्ही जागांवर पालखी बांधा वास्तूचे बांधकाम करणेसाठी रितसर वर्तमानपत्रातून जाहिरात देऊन, विहीत पध्दतीने सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत.

**(क)** पालखी थांबा वास्तू उभारणेचे बांधकामासाठी येणारा सर्व खर्च साईभक्त देणगी म्हणून देण्यास तयार असतील तर त्यांचे इच्छेनुसार उभारण्यात येणारे पालखी थांबा वास्तूमध्ये आतील बाजूस योग्य ठिकाणी त्यांचे नांवाचा नामफलक (ग्रेनाईट नेमप्लेट) अथवा त्यांचे इच्छेप्रमाणे स्मृती नामफलक (स्मृतीप्रित्यर्थ ग्रेनाईट नेमप्लेट) लावण्यात येईल. अशी योजना साईभक्तांचे पुढे सादर केल्यास, देणगीदार पालखी थांबा वास्तू उभारणीचा सर्व खर्च देतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणाऱ्या एकूण खर्चाच्या किमान ५०% रक्कम देणाऱ्या देणगीचाही स्विकार करण्यात यावा असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२३.** **शिर्डी शिंगणापूर रस्त्याचे सुधारणा करणेकरीता संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.८०६.** शिर्डी व शिंगणापूर या प्रसिध्द तिर्थक्षेत्राचे ठिकाणी दररोज राज्यातून व परराज्यातून भाविक मोठ्या प्रमाणात येतात. प्रस्तावित शनिशिंगणापूर रस्त्यामूळे शिंगणापूर व शिर्डी ही देवस्थाने जवळच्या मार्गाने जोडली जाणार आहेत. तिर्थक्षेत्र जोडण्याचे काम राज्य शासन व केंद्रशासनातर्फे हाती घेण्यात येत आहेत. सदर कामासाठी अंदाजित रक्कम रुपये १८.१० कोटी खर्चाचे ३०% निधी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यास व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.५.२००५ चे सभेत निर्णय क्र.२१९ अन्वये तत्वतः मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रधान सचिव, न्याय व विधी, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी जा.न्नं. ७१५१ दिनांक ८.७.२००५ रोजीचे पत्रान्वये सादर करण्यात आलेला होता. दरम्यान सदर रस्त्याचे सुधारित एस्टिमेट २८.११ कोटी मात्र इतके रकमेचे होत आहे. करिता याकामी संस्थानकडून रुपये १० कोटी इतका निधी उपलब्ध करुन मिळणेस कार्यकारी अभियंता,जागतिक बँक प्रकल्प, अहमदनगर यांनी विनंती केली आहे. सदरचे प्रस्तावास व्यवस्थापन समितीचे सभेत दिनांक ४.३.२००६ चे सभेत मान्यता दिली आहे. त्यानुसार न्याय विधी विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

पहिल्या प्रस्तावानुसार विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्र.सासवि २००५/६०६/११८/का.१६ दिनांक २८ जून २००६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामासाठी एकूण १८ कोटी १० लक्ष खर्च अपेक्षित आहे. संस्थानने प्रस्ताविल्याप्रमाणे सदर खर्चाच्या ३०% यानुसार रुपये ५ कोटी ४३ लाख इतका निधी संस्थानाने संबधितांना उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. सदर निधी ज्या कामाकरीता मंजूर करण्यात आलेला आहे त्याच प्रयोजनार्थ वापरला जाईल याची दक्षता व पर्यवेक्षण कार्यकारी अधिकारी यांनी करावे.

सदर निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांच्या सन २००६-२००७ चे विश्वस्त निधीतून खर्च टाकण्यात यावा व त्याचा तपशिल वर्षाच्या वार्षिक अहवालात देण्यात यावा. उपरोक्त नमूद कामे हे विहित मूदतीत पूर्ण होतील हे पहाण्यात यावे. तसेच याबाबत प्रगती अहवाल अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ अहमदनगर यांचेकडून प्राप्त करुन शासनास पाठविण्यात यावा असे शासन निर्णयानुसार कळविण्यात आले आहे.

तरी वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेला निधी अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे अदा करणेस मान्यता देणेबाबचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी कोपरगाव रेल्वेस्टेशन येथे रेल्वेने साईभक्त मोठ्या प्रमाणात येत असतात. साईबाबा तपोभूमी चौक ते रेल्वे स्टेशन पर्यंतचा रस्ता खराब झाला आहे. त्यामुळे शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना तसेच स्थानिक नागरिकांनाही वाहतुकीसाठी त्रास होत आहे. करीता सदर रस्त्याचे काम संस्थान निधीतुन घेण्यात यावे याबाबत चर्चा झाली. साईभक्तांसाठी कोपरगाव येथील साईबाबा तपोभूमी चौफुली ते कोपरगाव रेल्वेस्टेशन रस्त्याची सुधारणा करणेकामी तत्वतः मान्यता देणेत आली. अधिनियमातील २१ (२) मधील तरतूदीनुसार प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. कामी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२४.** **पुणतांबा ते शिर्डी रस्ता विकसित करणे बाबत.**

**निर्णय क्र.८०७.** मा.आ.श्री. राधाकृष्ण विखे पा., विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांचेकडील मा.अध्यक्षसो., श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अग्रेषित केलेल्या दिनांक ०९ ऑक्टोबर, २००६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे :

श्री क्षेत्र पुणतांबा येथे श्री चांगदेव महाराजांची समाधी असून, श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणारे बहुतांशी भक्त श्री क्षेत्र पुणतांबा येथे श्री चांगदेव महाराजांचे पुरातन समाधीचे दर्शनार्थ भेट देत असतात. या भाविकांमध्ये दक्षिण भारतातील भक्तांची संख्या प्रामुख्याने मोठी आहे.

शिर्डी - पुणतांबा हे दोन ही तीर्थक्षेत्र एकमेकांना पक्क्या रस्त्याने जोडलेले आहेत. मात्र हा रस्ता अत्यंत अरुंद असल्याने गर्दीच्या वेळेस वाहतुकीची कोंडी होऊन वाहतूक ठप्प होते. या करीता सदर रस्त्याचे रुंदीकरण व सी.डी.वर्कचे काम करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच रेल्वे येण्या-जाण्याच्या वेळेमध्ये दोन्ही बाजूने गाडयांची मोठी रांग लागून भाविकांचा बराच वेळ वाया जातो. हे सर्व टाळण्याकरीता कोपरगांव-श्रीरामपूर रस्त्यावर उड्डाण पुल होणे अत्यंत गरजेचे आहे.

पुणतांबा - शिर्डी रस्त्याचे रुंदीकरण व पुणतांबा येथील उड्डाण पुलाकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेली असून,त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी - पुणतांबा ही दोन तीर्थक्षेत्रे जोडणाऱ्या अंदाजे १८ किमी रस्त्याचे रुंदीकरण करुन मजबुतीकरण व डांबरीकरण करणेस तसेच पुणतांबा येथे कोपरगांव-श्रीरामपुर रस्त्यावरील रेल्वे क्रॉसिंगजवळ उड्डाणपुल उभारणेकामी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेस तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था अधिनियम २००४ मधील कलम नं २१(२)मधील तरतुदी नुसार महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२५. श्री साईबाबा रुग्णालयात इ.एन.टी.शस्त्रक्रिया गृहासाठी हत्यारे/उपकरणे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.८०८.** श्रीसाईबाबा रुग्णालयात इ.एन.टी. विभाग कार्यान्वित करणेत आलेला आहे. सदरचे विभागासाठी दोन डॉक्टर डॉ. भौरखेडे व डॉ. टंडन यांची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांनी सदर विभागासाठी लागणाऱ्या हत्यारे / उपकरणे इत्यादींची मागणी केलेली आहे. त्यासाठी अंदाजे रु. ४५,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित असून, सदर खरेदीकामी विहित पध्दतीने कोटेशन मागवून / जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, यावर सविस्तर चर्चा होऊन श्रीसाईनाथ रुग्णालयात असलेले इ.एन.टी.शस्त्रक्रियागृह श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये हलविण्यात यावे, असें ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**विषय नं.२६. संस्थान कर्मचाऱ्यांना जादा वैद्यकिय बिलाचा परतावा देणे बाबत.**

**निर्णय क्र.८०९.** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा. गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

| अ.न. | कर्मचा-याचे नांव | रुग्णालयाचे नांव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पुंजाहरी लक्ष्मण नळे | श्री.साईनाथ रुग्णालय,शिरडी K.E.M. हॉस्पिटल पुणे व निरामय हॉस्पिटल,पुणे व लाईफलाईन हॉस्पिटल, नाशिक | २९३१८.०० | २९१८५.०० |
| २ | श्रीमती पुष्पलता प्रभाकर भैलुमे | श्री.साईनाथ रुग्णालय,शिरडी | ११६९.०० | ११६९.०० |
| ३ | श्री. आण्णसाहेब गोवर्धन कुदळे | श्री.साईनाथ रुग्णालय,शिरडी | २८०.०० | २८०.०० |
| ४ | श्री. गुरुप्रसाद अरुण कापरे | श्री.साईनाथ रुग्णालय,शिरडी | २०७५.०० | २०७५.०० |
| ५ | श्री. लोहकरे कृष्णदास गोपीनाथ | श्री.साईनाथ रुग्णालय,शिरडी | ३८२१.०० | ३८२१.०० |
| ६ | श्री. बकरे सतीष गंगाधर | श्री.साईनाथ रुग्णालय,शिरडी | ९४२.०० | ९०८.०० |
| ७ | सौ कल्पना रघुनाथ मुसमाडे | श्री.साईनाथ रुग्णालय,शिरडी | १०३५.०० | १०३५.०० |
| ८ | श्री. रामनाथ लक्ष्मण वाकचौरे | श्री.साईबाबा रुग्णालय,शिरडी | १८७.०० | १८७.०० |
| ९ | श्री राजाराम भटू सावळे | डॉ.अकलाडे रुग्णालय, साक्री | ३०५६३.००<br>ॲडव्हान्स-<br>**देय रक्कम-** | २५९७८.५५<br>-१५०००.००<br>**१०९७८.५५** |
| १० | श्री. अशोक त्रिंबक वारुळे | लाईफ लाइन हॉस्पिटल,नशिक | १६५४४.०० | १६५४४.०० |
| ११ | डॉ. प्रफुल्ल पोरवाल | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी | ५८६२.०० | ५८६२.०० |
| १२ | श्री. अनिल त्रिंबकराव पोफळे | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी | ९१२.०० | ९१२.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | श्री. एस. ए. बाबर | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी | ३२१२.०० | ३०९९.०० |

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका)

**विषय नं.२७. सेंट्रल गॅस पाईपलाईन कामाचे मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांचे बीलाबाबत.**

**निर्णय क्र.८१०.** नविन श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयात सेंट्रल ऑक्सीजन, नायट्रस ऑक्साईड, सक्शन व कॉम्प्रेसड् एअरच्या पाईप लाईन व कंट्रोल पॅनलचे कामाबाबत मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांना मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १३/०३/२००५ निर्णय क्र. ९५ (सी) अन्वये इकडील जा.क्र. २८३४ दि. १५/०३/२००५ अन्वये एकुण रु. १३,९२,४१७/- (अक्षरी रु. तेरा लाख ब्यान्नव हजार चारशे सतरा मात्र) इतक्या रक्कमेचे परिशिष्ट ‘अ’ व परिशिष्ट ‘ब’ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कामाबाबत कार्यादेश देण्यात आला होता. सदर कामाबाबत निविदा मागवितेवेळी श्री साईनाथ रुग्णालयात असलेली पाईपलाईन, कॉम्प्रेसर व सक्शन पंप नविन रुग्णालयात स्थलांतरीत करण्याचे ठरले होते.

सदरचे काम मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांना वरील कार्यादेश मिळाल्यानंतर एकुण ०४ आठवडयांचा कालावधीत पुर्ण करावयाचे होते. परंतु दि. २७/०४/२००५ पर्यंत मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांनी सदरचे कामाची सुरुवात केलेली नव्हती. त्यामुळे त्यांना इकडील पत्र क्र. ४२५२ दि. २७/०४/२००५ अन्वये सदरचे काम त्वरीत सुरु करण्याविषयी कळविण्यात आले होते. त्यानंतर दोन आठवडयानंतर मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांनी सदरचे काम सुरू केले होते.

परंतु श्री साईनाथ रुग्णालय हे २०० रुम धर्मशाळा येथेच सुरु ठेवायचे व नविन इमारतीत सुपरस्पेशालिटी रुग्णालय सुरु करावयाचे असे ठरल्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयात असलेली पाईपलाईन, कॉम्प्रेसर व सक्शन पंप हे साईनाथ रुग्णालयामध्ये ठेवावे लागणार होते. त्यामुळे मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांचेकडून सदरचे वाढीव मटेरीयलसाठी दर मागविण्यात आले होते. त्यांनी त्यांचे पत्र क्र. AE/०५/०१ दि. ०२/०९/२००५ अन्वये वाढीव पाईपलाईन व कंट्रोल सिस्टीमसाठी आवश्यक असणाऱ्या कॉम्प्रेसर, व्हॅक्युम पंप, कंट्रोल पॅनलचे रु. ४,५२,८३०/- इतक्या रक्कमेचे कोटेशन पाठविले होते. त्यास दि. १८/०९/२००५ च्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ५५२ अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्याप्रमाणे मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांना इकडील पत्र क्र. १०६४० दि. २७/०९/२००५ अन्वये ऑक्सीजन पाईपलाईनच्या वाढीव मटेरीयल बाबत आदेश देण्यात आला होता.

सदरचे काम सुरु असताना मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांना सदरचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्याविषयी इकडील पत्र क्र. ११९०५ दि. १९/१०/२००५ अन्वये कळविण्यात आले होते. सदरचे काम मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांनी दि. २९/०६/२००६ रोजी पुर्ण केले आहे. एकुण सर्व काम पुर्ण करण्यास मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांचे अंदाजे ५४ आठवडयांचा कालावधी लागलेला आहे. सदर काम सुरु असताना मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी साहेब व तत्कालीन वरीष्ठ प्रशासक डॉ. टाकळकर साहेब यांनी मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांना वरील कार्यादेशा व्यतिरीक्त वाढीव पाईपलाईन गॅस आऊटलेटचे काम करण्यास सांगितले होते.

त्याप्रमाणे कंपनीने वरील सर्व काम पुर्ण करुन सदरचे कामाचे बील त्यांचे पत्र क्र. AE/०१/०२ दि. १५/०१/२००६ अन्वये खालीलप्रमाणे दिले आहे-

| अ.नं. | बील क्र. | तपशिल | कार्यादेशाची रककम | कंपनीने सदर केलेल्या कामाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १. | AE/०१/०२ | इकडील कार्यादेश क्र. २८३४ दि. १५/०३/२००५ अन्वये परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’ प्रमाणे | १३९२४१७.०० | २७५१६८७.७५ |
| | | इकडील वाढीव मटेरीयलबाबत आदेश क्र. १०६४०/२००५ दि २७/०९/२००५ अन्वये काम | ४५२८३०.०० | |
| | | | १८४५२४७.०० | २७५१६८७.७५ |

यावरुन असे दिसते की, एकुण रु. ९,०६,४४०.७५ इतक्या रक्कमेचे वाढीव काम झालेले आहे.

मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांनी त्यांचे काम पुर्ण झाल्याचा रिपोर्ट त्यांचे दि. २९/०६/२००६ चे पत्रान्वये सादर केला आहे.

मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांनी केलेल्या कामाची पाहणी संस्थानचे विदयुत विभागाने करुन त्यांचे दि. ०४/०८/२००६ चे पत्रान्वये मा. वैद्यकिय संचालक यांना अहवाल सादर केला आहे. त्यावर मा. वैद्यकिय संचालक यांनी दिलेल्या शेऱ्यानुसार कंपनीस सदर कामात असलेल्या त्रुटीची पुर्तता करणेविषयी इकडील पत्र क्र. १११२१/०६ दि. १९/०८/२००६ अन्वये कळविण्यात आले आहे.

मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांनी इकडील वरील पत्रानुसार सर्व त्रुटींची पुर्तता करीत आहेत परंतु सध्या सदरचे सिस्टीममधील ऑटोमेटीक ऑक्सीजन कंट्रोल पॅनल व इमर्जन्सी ऑक्सीजन मॅनीफोल्ड यांचे वारंवार ब्रेक डाऊन होत आहेत. त्यासाठी कंपनीशी संपर्क साधून सदर पॅनल व

मॅनीफोल्डचे दुरुस्ती करुन घेण्यात येत आहे. वरील पॅनल व मॅनीफोल्ड वगळता मेडीकल गॅस पाईप लाईन व नायट्रस, कॉम्प्रेस्ड एअर, सेंट्रल सक्शन इत्यादी व्यवस्थित काम देत आहेत.

आतापर्यंत मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांना संस्थानने सदर काम सुरु झालेपासून एकुण रु. ११,६६,५८३/- इतकी रक्कम आगाऊ दिलेली आहे. तसेच सदर काम करीत असताना श्री साईनाथ रुग्णालयात मे. आयओएल, मुंबई यांनी केलेल्या मेडीकल गॅस पाईप लाईनच्या कामातील उरलेले काही कॉपर पाईप मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांना तातडीने आवश्यकता असल्यामुळे देण्यात आले होते. सध्याच्या मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांनी सादर केलेल्या सदर प्रकारच्या पाईपच्या बीलावरुन घेतलेल्या दरानुसार त्यांची अंदाजे किंमत रु. २३३२/- इतकी आहे. ती मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांच्या बीलातून वसुल करावयाची आहे.

मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांनी केलेल्या एकुण कामाचे बील क्र. AE/०१/०२ दि. १५/०७/२००६ अन्वये रु. २७,५१,६८७.७५ चे बील सादर केलेले आहे. सदर रक्कमेतून संस्थानने वेळोवेळी दिलेला अॅडव्हान्स रु. ११,६६,५८३/- व संस्थानच्या ताब्यातील वापरलेल्या पाईपची अंदाजे किंमत रु. २३३२/- इतकी वजा जाता मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांना निव्वळ देय रक्कम रु. १५,८२,७७२.७५ इतकी आहे.

मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांनी निविदा सोबत अनामत रक्कम रु. १५,४७१/- संस्थानकडे जमा आहे. तर त्यांचे बीलाचे रक्कमेनुसार ५% सुरक्षा रक्कम रु. १,३७,५८४.३९ इतकी होते. म्हणजे ५% सुरक्षा रक्कम मधून रु. १५,४७१/- वजा जाता रु. १,२२,०७७.३९ इतकी वसुल करावयाची आहे. दोन वर्षाचे वॉरंटी कालावधीत सिस्टीमला काही अडचणी आल्या तर त्यांचे सुरक्षा रक्कमेतून सदरची दुरुस्तीची रक्कम वसुल करता येईल. एकुण देय रक्कम रु. १५,८२,७७२.७५ मधून रु. १,२२,०७७.३९ वजा जाता रु. १४,६०,६७९५.३६ इतकी निव्वळ देय रक्कम होत आहे.

वरीलप्रमाणे कंट्रोल पॅनल व मॅनीफोल्ड यांचे वारंवार होणारे ब्रेकडाऊन पाहता मे. अलमेड इक्वीपमेंट्स, मुंबई यांना एकुण देय रक्कम रु. १५,८२,७७२.७५ देण्याऐवजी एकुण बीलाच्या ५ टक्के सुरक्षा रक्कम (अनामत रक्कम वजा जाता) अनामत ठेवून बाकी रक्कम रु. १४,६०,६९५.३६ इतकी अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केंला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२८. आय.टी.आय विभाग छपाई खर्चा बाबत**

**निर्णय क्र.८११.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.६.२००६ चे सभेतील निर्णय क्र.३६५ नुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सर्व व्यवसायाच्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी आवश्यक असणारी स्टेशनरी छपाईस व येणारे रुक्कम रुपये ६२,८७५.०० पर्यन्तचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार जा.न्नं. ९३४० दिनांक १२.७.२००६ अन्वये दरपत्रके मागविणेत येऊन दरपत्रकातील न्युनतम दराने खालील छपाईधारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.अविराज पॅकवेल,कोपरगांव | ११८६६/४.९.२००६ | ३८,०००.०० |
| ०२ | मे.टेके प्रिंटर्स,अहमदनगर | ११८६७/४.९.२००६ | २५,३३५.०० |
| ०३ | मे.समर्थ ऑफसेट,साकुरी | ११८६८/४.९.२००६ | २३,७१२.०० |
| | | एकूण | ८७,०४७.०० |

उपरोक्तप्रमाणे स्टेशनरी छपाईकामी एकूण रुपये ८७,०४७.०० इतका खर्च आला आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.६.२००६ चे सभेतील निर्णय क्र.३६५ नुसार रुपये ६२,८७५.०० इतके खचार्स मंजूरी मिळालेली आहे म्हणजेच मंजूर रकमेपेक्षा रुपये २६,०४७.०० जादा खर्च आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधीक्षक खरेदी)

**विषय नं.२९. डॉ.एम.विमला शर्मा व्दारा तेलगू भाषेतून रुपांतरीत केलेले ले.कर्नल मु.ब.निंबाळकर लिखित श्री साईचे सत्यचरित्र प्रकाशित करणे बाबत.**

**निर्णय क्र.८१२.** डॉ.एम.विमला शर्मा, हैद्राबाद यांनी त्यांचेकडील दि.२५.०८.२००६ चे पत्राद्वारे ले.कर्नल मु.ब.निंबाळकर लिखीत श्री साईंचे सत्यचरित्राचे तेलगू भाषेतून रुंपातरीत करुन तेलगू रुपांतरीत श्री साईंचे सत्यचरित्र संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत प्रस्तुत केले आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्रासोबत डॉ.एम.विमला शर्मा, हैद्राबाद यांनी त्यांचेद्वारा तेलगुतून रुपांतरीत केलेले श्री साईंचे सत्यचरित्र बाबत डॉ. रामा राजू, हैद्राबाद ह्या तेलगू भाषिक तज्ज्ञाचे शिफारस पत्र सादर केले आहे.उपरोक्त शिफारस पत्रात डॉ रामा राजू यांनी डॉ.एम.विमला शर्मा द्वारा रुपांतरीत तेलगू भाषेतील श्री साईंचे सत्यचरित्र प्रकाशित केल्यास सदरचे पुस्तक तेलगू भाषिक भक्तांसाठी उपयुक्त ठरणार असून, ते तेलगू भाषिक आंध्रप्रदेशात खुपच प्रसिद्धिस पावेल असा विश्वास प्रकट केला आहे.

डॉ.एम.विमला शर्मा, हैद्राबाद यांनी त्यांचेकडील दि.०२.०९.२००६ चे पत्राअन्वये त्याचेद्वारा तेलगू भाषेतून रुपांतरीत केलेले श्री साईचे सत्यचरित्र ह्या पुस्तकाचे लेखनाचे सर्व हक्क त्यांनी संस्थानला प्रदान करण्याची तयारी दर्शविली आहे.

डॉ.एम.विमला शर्मा, हैद्राबाद यांनी त्यांचेद्वारा तेलगू भाषिक रुपांतराच्या संगणकीय प्रती सी.डी. सह दाखल केल्या आहेत.

तरी डॉ.एम.विमला शर्मा, हैद्राबाद यांचेद्वारा ले.कर्नल मु.ब. निंबाळकर लिखीत मराठी पुस्तकाचे तेलगू भाषेतील रुपांतराचे पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३०.** **सुमोना बागची कृत रुपांतरीत बंगाली भाषेतून रुपांतरीत श्री साई सगुणोपासना आरती पुस्तक प्रकाशित करणे बाबत.**

**निर्णय क्र.८१३.** श्रीमती सुमोना बागची नवीदिल्ली यांनी दि.१९.०८.२००६ चे फॅक्स पत्राद्वारा श्री साईनाथ सगुणोपासना ह्या श्री साईबाबांचे आरती पुस्तकाचे बंगाली भाषेत रुपांतरीत केले असून, रुपांतरीत बंगाली आरती पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत प्रस्तुत केले आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्रात सुमोना बागची नवीदिल्ली ह्या बंगाली साईभक्त असून, त्यांनी श्री साईनाथ सगुणोपासना आरती पुस्तकाचे बंगाली भाषेत केलेले रुपांतर संस्थानद्वारा प्रकाशित केल्यास त्याचा बंगाली भाषिक भक्तांसाठी चांगला उपयोग होईल असे कळविले आहे. सदरचे रुपांतरीत पुस्तक हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित झरीनद्वारा श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना हे इंग्रजी भाषिक पुस्तक तसेच श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना हे कल्पना भाकुनीद्वारा हिन्दी अनुवादीत पुस्तकात नमुद केलेप्रमाणे आरतीतील प्रत्येक ओव्यांचे त्या खाली त्या त्या ओव्यांचा अर्थासहित सुमोना बागची यांनी बंगाली भाषेत हस्तलिखीत केले असल्याचे नमुद केले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा प्रकाशित श्री साईनाथ सगुणोपासना मराठी तसेच श्री साईनाथ सगुणोपासना झरीनाद्वारा इंग्रजी भाषिक व कल्पना भाकुनी द्वारा हिंदीतील अनुवादीत ओव्यांचे अर्थासहीत पुस्तके संस्थानद्वारा भक्तांना विक्रीसाठी उपलब्ध आहेत. श्रीमती कल्पना भाकुनी द्वारा श्री साईनाथ सगुणोपासना, हिंदी भाषेतून पुस्तक उपलब्ध असल्याने हिंदी राष्ट्रभाषा असल्याने त्याचा सर्व प्रांतिय भाषिक भक्तांना चांगला उपयोग होत आहे. त्यामुळे सुमोना बागचीद्वारा बंगाली अनुवादीत श्री साईनाथ सगुणोपासना हे पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणे उचित होणार नाही.

सुमोना बागची, नवीदिल्ली यांचे द्वारा बंगाली भाषेत रुपांतरीत केलेले साईसतचरित बंगाली श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा प्रकाशित करण्यात येऊन ते बंगाली भाषिक साईभक्तांसाठी विक्रीस उपलब्ध आहे.सदरचे बंगाली श्री साईसतचरिताचा खप बाबत मासिक सरासरी ७५ ते ८० नग इतकाच आहे.

सुमोना बागची, नवीदिल्ली यांनी श्री साई सगुणोपासना या आरतीचे बंगाली भाषेत रुपांतरीत करण्याचे काम पूर्ण केले असून, ते सदरचे बंगाली भाषेतील रुपांतरीत पुस्तक श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत प्रकाशित करण्याचे ठरलेस ते उपरोक्त पुस्तकाची डी.टी.पी./सी.डी. उपलब्ध करुन देणार असल्याचे कळविले आहे.

श्रीमती सुमोना बागची, नवीदिल्ली यांनी त्यांचेकडील दि०२.०९.२००६ चे फॅक्स पत्राअन्वये त्यांचेद्वारा बंगाली भाषेतील रुपांतरीत श्री साई सगुणोपासना पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत प्रकाशनाचे सर्व हक्क ते संस्थानला बहाल करणेबाबतची तयारी दर्शविली आहे.

तरी श्रीमती सुमोना बागची, नवीदिल्ली यांचेद्वारा बंगाली भाषेतून रुपांतरीत केलेले श्री साई सगुणोपासना पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३१.** **श्री साईसच्चरित मराठी पोथीची सुपर डिलक्स आवृत्ती भक्तांना उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.८१४.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित कै.गोविंद रघुनाथ दाभोलकर कृत श्री साई सच्चरित मराठी पोथी अद्यावत स्वरुपात प्रकाशित केलेस त्याचा साईभक्तांसाठी पारायण करणेचे हेतूने चांगला उपयोग होईल. यासाठी सर्वसामान्य साईभक्तांसाठी चांगल्या स्वरुपात साधे श्री साईसच्चरीत मराठी पोथी तसेच सुपर डिलक्स स्वरुपात उत्कृष्ट दर्जाचे पोथी छपाई करुन साईभक्तांना उपलब्ध करुन दिल्यास सदर पोथीचा उपयोग साईभक्त हे दैनंदिन अध्यायनासाठी करुन ती चांगल्या स्वरुपात कायम दिर्घकाळ टिकणेसाठी देवघरात जतन करुन ठेवण्यासाठी सदर अद्यावत पोथींचा चांगला उपयोग होईल. यासाठी कै.गोविंद रघुनाथ दाभोलकर कृत श्री साई सच्चरित मराठी पोथी अद्यावत स्वरुपात प्रकाशित करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेसाठी याबाबत मे. कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई

यांनी त्यांचेकडील दि.०७.०९.२००६ चे पत्राद्वारे खालील तीन प्रकारामध्ये श्री साई सच्चरित मराठी पोथी चे नमुने तयार करुन घेण्यात आले आहेत.

१) कै.गोविंद रघुनाथ दाभोलकर कृत श्री साई सच्चरित मराठी पोथी सर्वसामान्य स्वरुपात.

२) कै.गोविंद रघुनाथ दाभोलकर कृत श्री साई सच्चरित मराठी पोथी साध्या स्वरुपात.

३) कै.गोविंद रघुनाथ दाभोलकर कृत श्री साई सच्चरित मराठी पोथी गोल्डन कलरमध्ये

उपरोक्त पैकी अ.नं. २ व ३ छपाई करणेकामी त्यांनी खालील प्रमाणे दर देवू केले आहे.

| | तपशिल | छपाई दर २००० नगांसाठी<br>रुपये पैसे | छपाई दर ५००० नगांसाठी<br>रुपये पैसे |
|---|---|---|---|
| अ | आर्डनरी चरित (पुस्तक) | १०५.०० | ९५.०० |
| ब | सुपर डिलक्स चरित (पुस्तक) | १६०.०० | १४५.०० |

कै.गोविंद रघुनाथ दाभोलकर कृत श्री साई सच्चरित मराठी पोथी छपाई कामाच्या फोटोंच्या पॉझीटिव्हज् आतिल मजकूराच्या ट्रेसिंग प्रेसधारकास देवून छपाईचे काम करुन घेता येईल.

तरी उपरोक्त "ब" प्रमाणे श्री साई सच्चरित मराठी पोथीची सुपर डिलक्स आवृत्ती भक्तांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्रत्येक साईभक्ताचे घरात हा ग्रंथ असणे आवश्यक आहे. यासाठी सुरवातीस

२००० नग तयार करुन घेता येतील. यासाठी सुपर डिलक्स चरित (पुस्तक) चे २००० प्रती छपाईसाठी प्रती नग दर रु.१६०/- प्रमाणे छपाई करुन घेतल्यास रु.३,२०,०००/- मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३२. संस्थान प्रकाशित दैनंदिनी-२००७ चे प्रचारार्थ जाहिरात छपाईबाबत**

**निर्णय क्र.८१५.** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०९.२००६ चे सभेतील विषय नं.२७ निर्णय ६८१ नुसार दैनंदिनी विक्रीबाबत भक्तांना माहिती होणेसाठी पुण्यतिथीचा उत्सवाचा उदी प्रसाद पाठवितांना भक्तांना प्रसादाबरोबर चिठ्ठी पाठवून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत दैनंदिनी विक्रीस ठेवण्यात आली असलेबाबत भक्तांना कळविण्यात यावे असे ठरलेनुसार याकामी तातडीने जाहिरात पत्रिका छपाई करुन घेणे गरजेचे असल्याने सभासद संख्या १,०७८१० यात पुढील सभासद वाढ लक्षात घेता एकूण १,१०,००० अवाहन पत्रिका छापून घेणेकामी कोटेशन्स बोलाविण्यात येवून दाखल झालेले कोटेशन्स दि.३०.०९.२००६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात त्यांचे समक्ष उघडण्यात येवून त्याचा तुलनात्मक दराचा तक्ता खालील दर्शविल्या तपशिलाप्रमाणे.

| अ.नं. | प्रेसचे नांव | श्री साईबाबा दैनंदिनी २००७ चे प्रचारार्थ जाहिरात पत्रिका छपाई दर |
|---|---|---|
| | नवीन छपाई संख्या | १,१०,००० प्रती |
| ०१ | मे.निट प्रिंटस्, अहमदनगर | ०.२४ |
| ०२ | मे.डिजिटल प्रिंट सिस्टीम ॲन्ड सोल्युशन प्रा.लि., अहमदनगर | ०.२६ |
| ०३ | सुपर प्रिंटस्, अहमदनगर | ०.३० |

उपरोक्तप्रमाणे कोटेशन्स सादर कर्त्यांपैकी अ.नं. १ मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर यांचा जाहिरात पत्रिका छपाई प्रती नग दर रुपये ०.२४ पैसे (चौविस पैसे) या प्रमाणे निम्नतम दर असल्याने त्यांना दैनंदिनी २००७ चे प्रचारार्थ जाहिरात पत्रिका छपाईचे काम जा.नं.एसएसएस /वशी/प्रकाशने/ १३६६८/ २००६ दि.०४/१०/२००६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला आहे. तरी सदर १,१०,००० अवाहन पत्रिका छपाईकामी प्रती नग दर रु. ०.२४ पैसे प्रमाणे एकूण रुपये २६,४००/- (अक्षरी रुपये सव्विस हजार, चारशे) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३३. मा.श्री म.द.जोशी व्दारा संकलित "श्री साईबाबांचे प्रमुख भक्त " या संकलित ग्रथाचे संस्थानतर्फे प्रकाशन करणे बाबत**

**निर्णय क्र.८१६.** मा.श्री मधुकर दत्तात्रय जोशी, माजी विश्वस्त - श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांनी दि.१८.०६.२००६ चे पत्राअन्वये**"श्री साईबाबांचे प्रमुख भक्त"** या संकलित ग्रंथाचे संस्थानतर्फे प्रकाशन करणेबाबत प्रस्तुत केले आहे. उपरोक्त ग्रंथ हा साईबाबांचे वेळचे समकालीन खालील प्रमुख भक्तांचे चरित्रावर आधारित संग्रहीत असल्याचे नमुद केले आहे.

१) म्हाळसापती २) "शामा माधवराव देशपांडे" ३) राधाकृष्णमाई ४) नानासाहेब चांदोरकर ५) संतकवि श्रीदासगणू महाराज ६) काकासाहेब दिक्षीत ७) आण्णासाहेब दाभोळकर (हेमाडपंत) ८) कृ.ज. भिष्म

वरील प्रमाणे श्री साईबाबांचे समकालीन प्रमुख भक्तांची माहिती ही संस्थानद्वारा प्रकाशित श्री साईलीलेत पूर्वप्रकाशित झालेल्या कै. ना.वा.गुणाजी, बेळगाव यांचे लेखनातील 'साईसच्चरित' या पोथीचे आधारावर त्याचे संकलन एकत्र केले असल्याचे कळविले आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्राद्वारे मा.श्री मधुकर दत्तात्रय जोशी, माजी विश्वस्त - श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांनी " श्री साईबाबांचे प्रमुख भक्त" हे संकलनात्मक लेख ग्रंथ रुपाने स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्याचे इ.स.१९८८ - ८९ साली संस्थान विश्वस्तानी ठरविले होते ते संकलन १९८९ च्या विजयादशमी ( बाबांच्या समाधीवर) दिवशी त्यावेळचे संस्थानचे अध्यक्ष मा. श्री. मोहनराव पाटील (आय.ए.एस) यांचे हस्ते पुजा करुन प्रकाशन करण्याचे मान्य झाले होते. सदर ग्रंथाच्या तीन प्रती झेरॉक्स केल्या होत्या असे कळविले आहे. सदर ग्रंथाबाबत त्यांनी त्यांचे पत्रात खालील प्रमाणे मुद्दे नमुद केले आहे.

१) हे संकलन एकत्र करण्याचे सर्व काम मी स्वतः व त्या वेळचे विश्वस्त मा.श्री दर्प साहेब व मा.श्री बी.बा.खेर यांनी मिळून केले होते. त्याचे संपादकीय मी स्वतः लिहीले होते.

२) हे सर्व संकलन एकत्रीज जुळवणी करुन त्याची योग्य ती क्रमवारी लावून ते प्रकाशनार्थ करण्याचे सर्व काम आपल्या संस्थानचे प्रशासकीय अधिकारी मा.श्री सुभाष जगताप (बाबा) यांनी कष्टपूर्वक केले होते. त्यामुळे त्याची उत्तम अशी जुळणी तयार झाली.

३) त्याची जुळणी प्रत माझ्या संग्रही आजही आहे. हे सारे श्रेय मा.श्री जगताप यांचे आहे. हे विधीत करण्यास मला संकोच वाटत नाही.

४) हे प्रकाशन का झाले नाही ! का खोळंबले ! इत्यादी गोष्टींचा उहापोह आता करणे निरर्थक आहे.

५) " श्रद्धा " ही यामागे पूर्ण झाली होती. " सबुरी" "श्रीं" च्या हाती असते. याचीच ही अनुभूती.

६) आपण सर्वांनी या संकलनाला आवश्य प्रसिद्धी द्यावी एवढी नम्र विनंती मी करतो.

तरी वरील तपशिलानुसार मा.श्री मधुकर दत्तात्रय जोशी यांनी संपादीत केलेला "श्री साईबाबांचे प्रमुख भक्त" या संकलित ग्रंथाचे प्रकाशन करण्याचे झाल्यास सदर ग्रंथाचे डी.टी.पी. चे काम करणारे चांगल्या अशा प्रेसधारकावर काम सोपविता येईल. त्यानुसार सदर ग्रंथाची डी.टी.पी., टाईप सेटींग, सी.डी. तयार करावी लागणार आहे. त्याकामी अंदाजे रु.१२,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी मा.श्री मधुकर दत्तात्रय जोशी यांचे द्वारा संपादीत केलेला "श्री साईबाबांचे प्रमुख भक्त" हा ग्रंथ संस्थानद्वारा प्रकाशित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३४.** **धरणातून थेट पाईपलाईनव्दारे पाणी आणणेकामी सर्व्हे करुन डी.पी.आर तयार करणेस मान्यता मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.८१७.** मा.अध्यक्ष महोदय यांच्या तोंडी मंजुरीने L&T कंपनीचे प्रतिनीधी श्री भास्कर गाडे, कंन्स्ट्रक्शन मॅनेजर हे शिर्डी येथे आले होते व त्यांनी या ठिकाणी आल्यानंतर निळवडे धरण, मुळा धरण व दारणा धरणांचा स्वतः जावून सर्व्हे केला होता. सदर सर्व्हेचा अभ्यास करून त्यांनी दि. १६/०९/२००६ रोजी फॅक्स करून पुढील प्रमाणे माहिती कळविली आहे.

**०१. निळवंडे धरण -** सदर निळवंडे धरणाचे काम हे सध्या चालू असून त्यास पूर्ण होण्यासाठी साधारणः ०२ वर्षे लागतील. शिर्डी पासून निळवंडे पर्यंत जी पाईपलाईन टाकावयाची आहे त्याचा मार्ग हा अतिशय अवघड व बिकट आहे.

**०२. मुळा धरण -** मुळा धरणांवर सध्या पाटबंधारे विभागाचा अधिक प्रमाणात भार असून सध्या या धरणांतून अहमदनगर शहराकरीता व अहमदनगर एम.आय.डी.सी. करीता पाण्याचा वापर केला आहे. मुळा धरणांवर अवलंबून असणा-यांना उन्हाळयात पाण्याच्या दुष्काळात सामोरे जावे लागते. तेव्हा आपणास त्यांच्याकडून पाण्यासाठी अवलंबून राहणे अशक्यच वाटते. सध्या या धरणांतून शिर्डीसाठी पाणी मिळण्याची शक्यता फारच कमी आहे.

**०३. दारणा धरणासंबंधी -** दारणा धरणांतून संस्थानला पुर्णपणे पाणी मिळण्याची शक्यता आहे. पाण्यासाठी त्यांच्यावर अवलंबून राहण्यासारखी परिस्थिती देखील येथे आहे. पाणीपुरवठा करण्यासाठी धरणांवर जी स्कीम राबवयाची आहे त्यासाठी लागणारी मुबलक जमीन ही तेथील विश्रामगृहाच्या बंगल्याच्या बाजूला उपलब्ध आहे. दारणा धरण हे हायवे पासून अगदीच जवळच्या अंतरावर आहे. व आपणस जी पाईपलाईन करावयाची आहे तीचा जास्तीत जास्त भाग हा रस्त्याच्या बाजूने येत असल्याने पाईपलाईन करणे सोयीस्कर ठरेल.

L&T कंपनीने प्रत्यक्ष पाहणी करून डी.पी.आर. तयार करणेसाठी **रूपये ४२ लाख मात्र** (सर्व्हिस टॅक्स वेगळा) खर्च कळविलेला आहे. तसेच पुढील काम त्यांना दिल्यास ते डी.पी.आर. तयार करण्याचा रू. ४२ लाख मात्रचा खर्च घेणार नाहीत. तसे त्यांनी लेखी कळविले आहे.

वरील सर्व बाबींचा अभ्यास केल्यानंतर पाण्याचा मुबलक साठा, स्कीमकरीता आवश्यक असणारी जमिनीची उपलब्ध जागा ही दारणा धरणांवर उपलब्ध असल्याने दारणा धरणांवरून पाईपलाईन करणे हे अत्यंत सोयीस्कर ठरेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत याबाबत सविस्तर माहिती देणेकामी L&T कंपनीचे प्रतिनीधी श्री भास्कर गाडे, कंन्स्ट्रक्शन मॅनेजर हे उपस्थित होते. त्यांनी याबाबत सविस्तर माहिती सभेस दिली.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन, दारणा धरण व निळवंडे धरण या दोन्ही धरणाचा सर्व्हे करुन दारणा धरणातून पाणी आणल्यास किती अंतर येते व निळवंडे धरणातून पाणी आणल्यास किती अंतर येते. कोणत्या धरणातून पाणी आणल्यास संस्थानसाठी उपयुक्त होईल याबाबत सर्व्हे करुन खर्चासह सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.३५. सिक्युरिटी सिस्टीमबाबत मुंबई येथे झालेल्या सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.८१८.** दि. २६ सप्टेंबर २००६ रोजी मा. श्री. शंकरन मुख्य सचिव यांनी मुंबई येथे श्री साईमंदिर व मंदिर परिसर सुरक्षिततेच्या संदर्भात मिटींग घेतली होती. मिटींग करिता खालील अधिकारी उपस्थीत होते.

०१. मा. श्री. शंकरन, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
०२. मा. श्री. पसरिचा, पोलिस महासंचालक
०३. मा. श्री. संजय दयाळ, अतिरिक्त पोलिस महासंचालक
०४. मा. श्री. ससाणे साो., चेअरमन
०५. मा. श्री. विखे साो., विश्वस्त
०६. मा. श्री. दांगट साो., जिल्हाधिकारी
०७. मा. श्री. रामानंद साो., पोलिस अधिक्षक, अ. नगर
०८. मा. वाकचौरे साो., कार्यकारी अधिकारी
०९. श्री. गोसावी, मुख्यधिकारी नगरपंचायत, शिर्डी
१०. श्री. रामराव ढिकले, संरक्षण अधिकारी

**मिटींगमध्ये साईमंदिर व मंदिर परिसर सुरक्षितता, वाहतुक व्यवस्था या बाबत खालील विषयांवर सविस्तर चर्चा झाली.**

०१) श्री साई मंदिर सुरक्षितते करिता तादीरन सिक्युरिटी सिस्टीम कार्यान्वीत करणे बाबत चर्चा झाली. तादीरन कंपनीचे प्रतिनीधी श्री. वाघमारे यांनी सिक्युरिटी सिस्टीम बाबत प्रात्यक्षीक दाखवून सिस्टीम बाबत माहिती दिली. सदर सिस्टीम उपयुक्त असुन विश्वस्त व्यवस्थेने ति कार्यान्वीत करणे बाबत कार्यवाही करावी.

०२) नगर मनमाड रोड बायपास करणे बाबत तात्काळ कार्यवाही करावी.

०३) श्री साईमंदिरालगत नगर मनमाड रोडचे बाजुला श्री. शिवाजी गोंदकर यांचे जागेत पार्कींग व व्यापारी संकुलाचे बांधकामा बाबत चर्चा झाली.

०४) शिर्डी मधील अंतर्गत रस्त्यांची कामे तात्काळ करण्यात यावी.

०५) मंदिर व मंदिर परिसर सुरक्षिततेकरिता प्रशिक्षीत अधुनिक शस्त्रासह अधिकारी व कर्मचाऱ्यांची पोलिस विभागाकडुन नेमणुक करण्यात यावी. त्यांच्या वारंवार बदल्या करण्यात येऊ नये.

०६) पोलिस कर्मचारी व संस्थान मधिल सुरक्षा कर्मचारी यांच्यात समन्वय ठेवून मंदिर सुरक्षितते करिता उपाययोजना कराव्यात.

०७) मंदिराच्या दक्षिणेकडील भिंतीचे बाहेरील बाजुने शक्य असल्यास स्वतंत्र मजबुत भिंत उभारुन दक्षिणेकडुन समाधी मंदिराचे व कंपाऊंड भिंतीचे संरक्षण करणे संदर्भात विचार करावा.

०८) मंदिराचे कंपाऊंडच्या चारही बाजुने असलेले रस्ते वाहनांच्या वाहतुकीकरिता बंद करण्यात यावेत.

०९) मंदिर परिसरातील कंपाऊंड करिता कास्ट आयर्न ऐवजी सर्व बाजुने मजबुत भिंतीचे कंपाऊंड करावे.

वरीलप्रमाणे इतिवृत्ताची नोंद घेण्यात आली. तसेच सिक्यूरिटी सिस्टमबाबत चर्चा होऊन, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन,सिक्यूरिटी सिस्टमकामी टेंडर्स मागणी करण्यात यावेत, असें ठरले.

(कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**विषय नं.३६. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता खरेदी करावयाचे संगणकाबाबत**

**निर्णय क्र.८१९.** उपरोक्त विषयास अनुसरुन विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थानच्या आय.टी.आय करीता नवीन ३० संगणक खरेदी करणे बाबत मान्यतेसाठी व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.७.२००६ चे सभेमध्ये निर्णय क्र.४३३ अन्वये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अहमदनगर, संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालय, कोपरगांव व प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय,लोणी यांचेकडे खरेदी

केलेल्या संगणकाची माहिती घेऊन फेर प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना झाल्या आहेत त्यानुसार माहिती घेतली असता ती खालीलप्रमाणे-

अ)अहमदनगर जिल्हा सहकारी बँक येथे संगणक खरेदी प्रक्रिया सुरु आहे. याकामी त्यांनी निविदा काढलेली असून संगणक कंपनी या शिर्षकाखाली MNC Branded/ Indian Branded असा उल्लेख आहे.

ब) संजिवनी अभियांत्रिकी महाविद्यालय, कोपरगांव येथून माहिती घेतली असता त्यांचेकडे बहुतांश संगणक Zenith या कंपनीचे खरेदी केलेले आहेत. इतर Technical Specification हे आज लेटेस्ट बाजारात उपलब्ध असणारे द्यावेत असे त्यांनी सांगितले.

क) प्रवरा ग्रामिण अभियांत्रिकी महाविद्यालय,लोणी येथून माहिती घेतली असता त्यांच्याकडे बहतंश संगणक H.C.L या कंपनीचे खरेदी केलेले आहेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानने यापूर्वी ज्या कंपनीचे संगणक खरेदी केलेले आहे त्याच कंपनीचे संगणक निविदा मागवून खरेदी करण्यात यावेत असे ठरले. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**विषय नं.३७. संगणक सर्व्हर रुम व दुरध्वनी यंत्रणा कक्षामध्ये वॉलमाऊंटेड वातानुकूल यंत्रणा बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.८२०. (अ)**श्री साईबाबा संस्थानचे कार्यालयीन संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संस्थान मधील विविध कार्यालये, रुग्णालये, काऊंटर्स इ. एकमेकांशी जोडण्यासाठी संगणकीय जाळ्यांची उभारणी करण्यात आलेली आहे. संगणकीय जाळ्यांतर्गत साधारणत: १२५/१५० संगणके सर्व्हरव्दारे एकमेकांशी जोडण्यात आले आहेत. सर्व्हरच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये स्वतंत्र रुम तयार करण्यात आलेली आहे. या रुममध्ये चार मेन सर्व्हर, एक आयएसएम सर्व्हर व एक ट्रेन्डमायक्रो ॲन्टीव्हायरस सॉफ्टवेअरचा सर्व्हर असे एकूण सहा सर्व्हर ठेवण्यात आले आहेत. हे सर्व सर्व्हर्स सतत २४ तास कार्यान्वीत असल्याने, त्यामधून उष्णता निर्माण होते. त्यामुळे सर्व्हर रुममधील तपमानात वाढ होते. रुममधील तपमानाचे संतुलन राहणेसाठी सध्या एक वॉल माऊंटेड ए.सी. बसविण्यात आलेला आहे. परंतु, सदर रुममध्ये सर्व्हरची संख्या वाढल्याने व ते सतत २४ तास कार्यान्वीत असल्याने, त्यामधून जादा उष्णता निर्माण होऊन रुम मधील तपमानाचे संतुलन रहात नाही. शिवाय एका ए.सी. वर जास्त लोड आल्यामुळे तो वारंवार बंद पडत आहे. सर्व्हर रुम मधील ए.सी. बंद पडणे सर्व्हरच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने धोकादायक आहे. यासाठी सर्व्हर रुममध्ये आणखी एक वॉल माऊंटेड ए. सी. बसवून तेथील तपमानात संतुलन ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

**(ब)** दूरध्वनी यंत्रणा कक्षामध्ये सिमेन्स कंपनीची डिजीटल तंत्रज्ञानावर आधारित आत्याधुनिक अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. दूरध्वनी यंत्रणा कक्षामध्ये या यंत्रणेचे डिजीटल कार्डबोर्ड, यंत्रणा नियंत्रीत करण्यासाठी स्वतंत्र संगणक व त्यावरील संगणक प्रणाली, त्याचप्रमाणे इनकमींग व आऊटगोईंग कॉल दळणवळणासाठी तीन ऑपरेटर कन्सोल इ. यंत्रणा ठेवण्यात आलेली आहे. सध्या या महत्वाच्या कक्षामध्ये Voltas कंपनीचा एक ए. सी. बसविण्यात आला आहे. हा ए. सी. सन-१९९८ पासून कार्यान्वीत असल्याने, तो वारंवार बंद पडत आहे. बंद पडलेला ए. सी. सतत दुरुस्त करणे शिवाय दुरुस्तीस लागणाऱ्या वेळेमध्ये ए. सी. अभावी येथील यंत्रणा वाढलेल्या तापमानामुळे गरम होते. यंत्रणेचे कार्ड डिजीटल असल्याने, ते वाढलेले तपमान सहन करु शकत नाही. त्यामुळे संपूर्ण अंतर्गत दूरध्वनी यंत्रणाच बंद पडण्याचा धोका निर्माण होतो. याबाबत विद्युत विभागाचे एसी तंत्रज्ञांशी चर्चा केली असता, त्यांनी सध्या वापरात असलेला ए. सी. जुना झालेला आहे. तो बदलून तेथे एक वॉल माऊंटेड ए. सी. बसविणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

उपरोक्त दोन्ही ठिकाणी Voltas कंपनीचे वॉल माऊंटेड दोन टनी दोन ए. सी. बसविण्यासाठी साधारणपणे प्रत्येकी रुपये ३५,०००/- प्रमाणे अंदाजे रुपये ७०,०००/- पर्यंतचा खर्च अपेक्षीत असून, पुढील कार्यवाही विद्युत विभागामार्फत करुन घेता येईल.

उपरोक्त परिच्छेद **अ** आणि **ब** मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हर रुममध्ये एक व दूरध्वनी यंत्रणा कक्षामध्ये एक असे दोन वॉल माऊंटेड Voltas कंपनीचे दोन टनी ए. सी. खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये ७०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**विषय नं.३८. सन २००७ वर्षासाठी धर्मशाळा येथील शौचालय, स्नानगृह व गादी चादर कंत्राटाबाबत.**

**निर्णय क्र.८२१.** श्री साईबाबा धर्मशाळा इमारतीत वास्तव्यास राहणाऱ्या साईभक्तांना गादी चादर,बेडशिट,रग,व उशी(कव्हरसह) पुरविणे व शौचालय व स्नानगृह PAY & USE पध्दतीने चालविणेकरीता दिनांक १.१.२००६ ते दिनांक ३१.१२.२००६ या १२ महिन्याचे कालावधीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सेवाबाबतचे दर (गादी रुपये ५/-,चादर रुपये ३/- शौचालय व स्नानगृह गरम पाणीसह रुपये ३/-) संस्थानमार्फत निश्चित करुन निविदाधारकांकडून निविदा मागवून निविदाधारक संस्थानला किती

मासिक परवाना फी देणार व त्यासाठीची डिपॉझिट रक्कम निश्चित करुन भक्तांना सेवा पुरविण्याचे काम मंजूर निविदाधारकांस दिलेले आहे. त्यास अनुसरुन नेमलेल्या कंत्राटदार खालीलप्रमाणे सेवा पुरवित आहेत त्यांचा कालावधी व देत असलेली मासिक परवाना फी व सेवा याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं | कंत्राटदाराचे नांव | पुरविण्यात येणाऱ्या सेवा | कराराचा कालावधी | अनामत रक्कम | सध्या प्रतिमहा संस्थानला जमा होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्री भाऊसाहेब विश्वनाथ भोसले,शिर्डी | गादी,चादर,बेडशिट,रग व उशी(कव्हरसह)पुरविणे | दि.०१.०१.२००६ ते दि. ३१.१२.२००६ | २५,०००.०० | रु.३७,५००.०० |
| ०२. | साईराज कॉन्ट्रॅक्टर,शिर्डी | शौचालय व स्नानगृह गरम पाणीसह सुविधा पुरविणे | दि.०१.०१.२००६ ते दि. ३१.१२.२००६ | २५,०००.०० | रु.३७,०००.०० |

उपरोक्त दोन्ही कंत्राटदारांची मुदत दिनांक ३१.१२.२००६ अखेर संपत आहे. तरी दिनांक १.१.२००७ पासून पुढील १२ महिन्याचे कंत्राटदाराची नेमणूक करणेस वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,धर्मशाळा येथे गादी,चादर,बेडशिट,रग व उशी(कव्हरसह) व शौचालय व स्नानगृह गरम पाणीसह सुविधा दिनांक ०१.०१.२००७ पासुन पुढील १२ महिन्यांसाठी पुरविणेस कंत्राटदाराची नेमणूक करणेकामी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-धर्मशाळा विभागप्रमुख)

**विषय नं.३९. श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील खोल्यांकरिता बेडशीट,उशीकव्हर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.८२२.** साईबाबा भक्तनिवासस्थानकडील खोल्यांकरीता बेडशीट व उशीकव्हर करीता कापड खरेदी करुन माहे जानेवारी-२००४ मध्ये बेडशीट व उशीकव्हर प्रत्येकी ६००० नग शिवुन तयार करण्यात आलेले होते. सदरचे बेडशीट हे फाटण्यास व जिर्ण होणेस आले आहेत. त्यातील काही फिकट रंगाचे होत आहेत. दि. ०६/०८/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.२७ निर्णय क्र.४१५ चादर, बेडशीट, गादया या तीन वर्षापर्यंत वापरण्यात याव्यात असे ठरलेले आहे.

सध्या वापरात असलेले बेडशीट, उशीकव्हर हे वापरण्यास जवळ-जवळ २ ३/४ (पावने तीन) वर्षे झालेले आहेत. सदरचे बेडशीट, उशीकवहर हे लॉण्ड्रीतील केमिकल्स/डिटर्जंट यांचे वापरामुळे तसेच साईबाबा भक्तनिवासस्थानकडील खोल्या या सरासरी ८०% क्षमतेने भरलेल्या असल्यामुळे त्याचा पुरेपुर कायमस्वरुपी वापर झाल्याने तसेच त्यास माहे डिसेंबर-२००६ पर्यंत ३ वर्षे पुर्ण होतील याकरीता नविन बेडशीट, उशीकव्हर यांची आवश्यकता आहे. त्याचा तपशिल व त्यासाठी अंदाजे येणारा अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशील | साईज | आवश्यक नग | दर प्रति नग | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १. | बेडशीट (प्रिंटेड),<br>बॉम्बे डाईंग, प्रकाश कॉटन मिल व इतर नामांकीत कंपनीचे | ५४"x९०" | ८००० | १५० | १२,००,००० |
| २. | उशीकव्हर (प्रिंटेड),<br>बॉम्बे डाईंग, प्रकाश कॉटन मिल व इतर नामांकीत कंपनीचे | १८"x२४" | ८००० | ४० | ३,२०,००० |
| | एकुण रुपये | | | | १५,२०,००० |

वरीलप्रमाणे बेडशीट, उशीकव्हर पुरवठाधारकांकडुन तयार नमुने व दर मागवुन खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १५,२०,०००.००चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच साईनिवास अतिथीगृहातील बेडशिट व उशीकव्हर खराब झालेले आहेत तेही नव्याने खरेदी करण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-भक्तनिवास्थान विभागप्रमुख)

**विषय नं.४०. श्रीसाईबाबांच्या मंदीराच्या गाभाऱ्यातील श्रींच्या मूर्तीच्या दक्षिण व उत्तर बाजूच्या भिंतीवर चांदीचे नक्षीकाम पत्रा बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.८२३.** श्री साईबाबांच्या समाधी मंदीरात गाभा-यात श्रींचे मूर्तीचे पाठीमागील भिंतीवर सन १९९९ मध्ये चांदीचा नक्षीकाम केलेला पत्रा लावलेला आहे . याकामी एकूण १४३ किलो चांदी वापरण्यात आली आहे. सदर चांदीकामाचे डिझाईन श्रीमती हेमा राजेशिर्के, मुंबई यांनी केलेले आहे. श्रीमती हेमा राजेशिर्के ह्या म्युरल डिझाईनर आहेत.

साईभक्त श्री सुरेश वाधवा, काँक्रीट बिल्डर्स वाशी ( नवी मुंबई) यांनी श्री साईबाबांच्या समाधी मंदीरात गाभा-यात श्रींचे मूर्तीचे पाठीमागील डिझाईन प्रमाणेच, दक्षिण व उत्तर बाजूचे भिंतीवर चांदीकाम पत्रा देणगी दाखल करुन देण्याची इच्छा प्रदर्शित केलेली आहे. याकामी लागणारी चांदी व मजूरी देणगी दाखल देण्यास श्री सुरेश वाधवा हे तयार आहेत. तरी सदर चांदीकाम करणेकामी श्री वाधवा यांना परवानगी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मंदिर विभागप्रमुख)

**विषय नं.४१. श्री.संत आसाराम बापू सत्संग कार्यक्रमाबाबत.**

**निर्णय क्र.८२४.** प.पू.संत श्री आसारामजी बापू प्रेरीत योग वेदांत सेवा समिती व साधक परिवार, राहाता (शिर्डी) यांनी दि.२९/१२/२००५ चे पत्रान्वये प.पू.संत श्री आसाराम बापू यांचा सत्संग कार्यक्रम शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या माध्यमातुन आयोजित करावा अशी विनंती केली होती. ३-४ दिवसाचे कार्यक्रमाकरीता त्यांनी खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे दिलेला होता.

| अ.नं. | तपशील | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था | रु, ०५,००,०००.०० |
| ०२. | साऊंड व लाइटींग | रु. ०१,००,०००.०० |
| ०३. | पोष्टर्स व प्रचार | रु. ०१,००,०००.०० |
| ०४. | भोजन व्यवस्था | रु. ०२,००,०००.०० |
| ०५. | निवास व्यवस्था | रु. ०२,००,०००.०० |
| ०६. | ट्रान्स्पोर्ट व ट्रॅव्हलींग | रु. ०२,००,०००.०० |
| ०७. | इतर खर्च | रु. ०२,००,०००.०० |
| | एकूण अपेक्षीत खर्च | **रु. १५,००,०००.००** |

असे एकूण १५ लाख रुपये खर्चात ४-५ लाख रु. ते स्वतः देण्यास तयार असल्याचे ही नमुद केले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०२/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८४ अन्वये सदरचे प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेली आहे. .

आता प.पू.संत श्री आसारामजी बापू प्रेरीत योग वेदांत सेवा समिती व साधक परिवार, राहाता (शिर्डी) यांनी आपले दि.२४/०६/२००६ रोजीचे पत्रान्वये शिर्डी हे एक आंतरराष्ट्रीय किर्तीचे तीर्थस्थान असल्यामुळे येथील सत्संगाचा कार्यक्रम हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा व्हावा असे प.पू.संत श्री आसारामजी बापूंची इच्छा असल्याचे कळविले आहे. अशाप्रकारचा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ७ ते ११ दिवसीय कार्यक्रमाकरीता अंदाजे रु. ४० लाख खर्च अपेक्षित आहे, तसेच संपुर्ण सत्संग सोहळा श्री साई संस्थानचे माध्यमातुन आयोजित करावा, असेही कळविले आहे.

समितीचे पत्रामध्ये रु. ४० लाख खर्चाचा तपशील दिलेला नाही. व्यवस्थापन समितीने या सुधारीत प्रस्तावास मान्यता दिलेस. सत्संगाची तारीख, कार्यक्रमाचे नियोजन याबाबत संबंधितांशी चर्चा करुन कार्यक्रमाचे नियोजनाबाबत कार्यवाही सुरु करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.४२. शिधा सामुग्री मिळणेबाबत अ)श्री रामप्रसाद दगडू मगर, समस्त गावकरी मंडळी, गोगलगांव ब) श्री ज्ञानदेव रु राहाणे श्यामा श्याम सत्संग समिती कोपरगांव क) श्री पोपट भागवत वाणी, सरपंच ग्रामपंचायत कार्यालय,नांदूर्खी व श्री सुरेश द. ओझा,अध्यक्ष, श्रीगणेश देवस्थान ट्रस्ट, गणेशखिंड,वांगी ता.श्रीरामपूर यांचे अर्जाबाबत**

**निर्णय क्र.८२५. अ)** खाली दर्शविलेल्या ग्रामस्थांनी मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री रामप्रसाद दगडू मगर, समस्त गांवकरी मंडळी, गोगलगांव, ता. राहाता, जिल्हा-अहमदनगर | मौजे गोगलगांव येथे एक गांव एक गणपती अंतर्गत अखंड हरिनाम सप्ताह, दि.३०/०८ ते दि.०५/०९/०६ अखेर होणार असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. रु.१५,०००/- | रु.१५,०००/-पर्यंत शिधा द्यावा , असे मा. आमदार यांचे आर.ओ. यांची शिफारस |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

श्री रामप्रसाद दगडू मगर, समस्त गांवकरी मंडळी, गोगलगांव, ता. राहाता, जिल्हा-अहमदनगर यांनी पहिल्यांदाच शिधास्वरुपाची मदत मागण्यात आलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२) (ण) (अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

सद्या मा.व्यवस्थापन समितीची सभा नसलेने मा.अध्यक्ष व मा.आमदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील, विश्वस्त यांचे शिफारसीनुसार शिधा देण्यात आलेला आहे.

तरी श्री रामप्रसाद दगडू मगर, समस्त गांवकरी मंडळी, गोगलगांव, ता. राहाता, जिल्हा-अहमदनगर मौजे गोगलगांव येथे एक गांव एक गणपती अंतर्गत अखंड हरिनाम सप्ताह, दि.३०/०८ ते दि.०५/०९/०६ अखेर होणार असून महाप्रसादासाठी रु. १५,०००/- मात्र रकमेपर्यंतची शिधास्वरुपातील मदत देण्यात आली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**ब)** श्री ज्ञानदेव रुं. रहाणे, श्यामा श्याम सत्संग समिती, कोपरगांव, जिल्हा-अहमदनगर मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थाा विश्वस्त व्यवस्था, शिर्डी याना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| 01. | श्री ज्ञानदेव रुं. रहाणे, श्यामा श्याम सत्संग समिती, कोपरगांव, जिल्हा-अहमदनगर | दि.24/09 ते दि.13/10/06 अखेर आंतराष्ट्रीय कीर्तीचे कृष्णवंदे जगद्गुरु प.पू.स्वामी प्रियाशरणजी, वृंदावा यांचे अभुतपूर्ण आध्यात्मिक सत्संग व प्रवचन कार्यक्रम होणार असून महाप्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी रु. 35,000/- पर्यंत मदत मिळणेबाबत पत्र. | श्री.अशोक खांबेकर, विश्वस्त, यांचे रु.25,000/- पर्यंत शिधा देणेबाबत शिफारसपत्र. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

श्री ज्ञानदेव रुं. रहाणे, श्यामा श्याम सत्संग समिती, कोपरगांव, जिल्हा-अहमदनगर यांनी शिधा मिळणेबाबत पहिल्यांदाच मागणी केलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅट इा एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

त्यानुसार सद्या संस्थाामार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

तरी श्री ज्ञानदेव रुं. रहाणे, श्यामा श्याम सत्संग समिती, कोपरगांव, जिल्हा-अहमदनगर यांना दि.२४/०९ ते दि.१३/१०/०६ अखेर आंतराष्ट्रीय कीर्तीचे कृष्णवंदे जगद्गुरु प.पू.स्वामी प्रियाशरणजी, वृंदावा यांचे अभुतपूर्ण आध्यात्मिक सत्संग व प्रवचन कार्यक्रम होणार असून रु.२५,०००/-मात्र रकमेपर्यंतची महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत देण्यात आली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**क)** खालील ग्रामपंचयतीने मा.अध्यक्ष महोदय व मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री पोपट भागवत वाणी, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुर्खी (खु) , ता. राहाता , जिल्हा-अहमदनगर | मौजे नांदुर्खी (खु.) येथे अखंड हरिनाम सप्ताह, दि.२९/०८ ते दि.०५/०९/०६ अखेर होणार असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. रु.१५,०००/- | रु.१५,०००/-पर्यंत शिधा द्यावा , असे मा. आमदार यांचे आर.ओ. यांची शिफारस |
| ०२. | श्री सुरेश दे ओझा, अध्यक्ष, श्री गणेश देवस्थान ट्रस्ट, गणेशखिंड, वांगी, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर | श्री क्षेत्र गणेशखिंड (वांगी) येथे अखंड हरिनाम सप्ताह, दि.२७/०८ ते दि.०६/०९/०६ अखेर होणार असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. रु.२५,०००/- | मा.अध्यक्षसाो. यांची शिफारस. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

श्री पो.भा.वाणी ,सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुर्खी (खुर्द), ता. राहाता व अध्यक्ष, श्री गणेश देवस्थान ट्रस्ट, गणेशखिंड (वांगी) ता.श्रीरामपूर, जिल्हा-अहमदनगर यांना यापुर्वीही शिधास्वरुपाची मदत देण्यात आलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे.

त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

सद्या मा.व्यवस्थापन समितीची सभा नसलेने मा.अध्यक्ष व मा.आमदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील, विश्वस्त यांचे शिफारसीनुसार शिधा देण्यात आलेला आहे.

तरी श्री पोपट भागवत वाणी, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, नांदुर्खी (खु), ता. राहाता , व श्री सुरेश दे ओझा, अध्यक्ष, श्री गणेश देवस्थान ट्रस्ट, गणेशखिंड(वांगी), ता.श्रीरामपूर जिल्हा-अहमदनगर यांचे अनुक्रमे मौजे नांदुर्खी (खु) व गणेशखिंड (वांगी) येथे अखंड हरिनाम सप्ताह, दि.२९/०८ ते दि.०५/०९/०६ व दि.२७/०८ ते दि.०६/०९/२००६ अखेर अनुक्रमे होणार असून महाप्रसादासाठी रु. १५,०००/- व रु. २५,०००/- मात्र रकमेपर्यंतची शिधास्वरुपात मदत देण्यात आली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त "अ" "ब" व "क" यांना वस्तूरुपाने देण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.४३. भक्तनिवास बांधकामासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत प्रभू रामचंद्र सार्वजनिक मंडळ,अकलूज यांचे पत्राबाबत**

**निर्णय क्र.८२६.** उपरोक्त विषयास अनुसरुन, मा.श्री प्रतापसिंह मोहिते पाटील,विधानसभा सदस्य, अकलूज यांनी त्यांचे पत्रान्वये " प्रभु श्रीरामचंद्र सार्वजनिक मंडळ अकलूज यांनी मौजे अकलूज येथे प्रभू श्रीरामचंद्र मंदिरचे भक्तनिवास (यात्रीनिवास) बांधकामासाठी रु.७५लाख निधी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

ट्रस्टच्या दि.०७/०८/२००६ चे पत्रामध्ये बांधकामाबरोबर खालील सामाजिक कामे करणेचा उद्देश असल्याचे कळविले आहे.

१) भक्तनिवास बांधकाम व धार्मिक कार्यक्रम हॉल बांधणे, २) मोफत अन्नदान सुरु करणे,
३) मोफत आरोग्य सेवा सुरु करणे , ४) ध्यान मंदिर बांधणे, ५) वाचनालय सुरु करणे,
६) समाज जागृती, समाज प्रबोधन, संस्कार वर्ग सुरु करणे, ७) नियमीतपणे विविध धार्मिक उत्सवाचे आयोजन करणे,

मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष यांनी दि.१३/०८/२००६ चे पत्रान्वये सदरचे प्रस्तावास शासनाचे मत घेऊन सदर विषय मिटींगपूढे ठेवावा अशी विनंती केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (दोन) "छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे. " मात्र अद्यापपर्यंत छाननी समितीचे गठन झालेले नसल्यामुळे यापूर्वी आर्थिक मदत मागणीसाठी आलेले अर्ज दप्तरी ठेवण्यात आलेले आहेत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, छाननी समितीचे गठण लवकरच प्रस्तावित असल्याने, सदरहू विषय छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**विषय नं.४४. शिर्डी नगरपंचायत,शिर्डी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर (पथकर)बाबत.**

**निर्णय क्र.८२७.** श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी शिरडी येथे दररोज हजारोंच्या संख्येने भक्त येत असतात. त्यातील बरेचशे साईभक्त स्वतःचे खाजगी वाहनाने प्रवास करतात. मात्र शिरडी येथे प्रवेश करण्यापूर्वी शहरातील दोन्ही बाजूस असलेल्या नाक्यांवर नगरपंचायती मार्फत भक्तांची वाहने थांबवून त्यांचेकडून स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर (पथकर) वसूल केला जातो. मात्र साईबाबा संस्थानकडूनच अशा प्रकारचा कर वसुल केला जातो. असा साईभक्तांचा गैरसमज होतो. त्यामुळे भक्तांच्या भावना दुखावतात.

उपरोक्त बाबी विचारांत घेऊन शिरडी येथे साईबाबांच्या भक्तांची वाहने थांबवून त्यांचेकडून पथकर वसूल करण्यांत येऊ नये, अशी विनंती नगरपंचायतीकडे संस्थानचे पत्र क्रमांक एसएसएस/वशी/०२/१३२१०/२००४ दिनांक ३१/१२/२००४ चे पत्राने करण्यात आली आहे. याबाबत शिरडी नगर पंचायत यांनी दिनांक ११/०७/२००५ चे पत्राने टोल नाक्यापासून प्रती वर्षे मिळणा-या रक्कमे एवढी रक्कम त्यांना मिळावी, सन २००४-२००५ साली रुपये ४५,६१,९९०/- एवढी रक्कम त्यांना मिळाली, तेवढी रक्कम त्यांना प्रतिवर्षी मिळावी व प्रतिवर्षी त्यांत २० % वाढ करण्यात यावी, ५ वर्षाची आगाऊ रक्कम भरावी अशा आशयाचे पत्र इकडेस पाठविले आहे. संस्थानकडून निश्चित धोरण त्यांना कळविल्यास मंजूरीसाठी शासनांस त्यांनाही प्रस्ताव पाठविता येईल असेही त्यांनी कळविले आहे. सदर प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०८/२००५ व दिनांक १८/०९/२००५ चे सभेत विषय क्रमांक ५० निर्णय क्रमांक ४३८ झालेला आहे, शिरडी नगरपंचायतीस निव्वळ येणारे उत्पन्न

हिशोबी धरून त्याबाबतची माहिती प्राप्त करून घेऊन त्या आधारे निव्वळ येणारे उत्पन्नाचे अनुसंघाने अनुदान ठरवावे लागेल. असा प्रस्ताव दिनांक १८/०९/२००५ चे सभेत मांडण्यात आला होता. त्याबाबत सविस्तर चर्चा होऊन विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर बंद करणेसाठी नगरपंचायत शिरडी यांना द्यावयाचे अशंदानाबाबत प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी शिरडी नगरपंचायत यांना द्यावयाचे रक्कमेबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व स्थानिक विश्वस्त यांचे संमतीने याबाबत अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले आहे. सदर ठरावाची प्रत सोबत आहे.

उपरोक्त ठरावांस अनुसरून दिनांक ०१/१०/२००५ रोजीचे सल्लागार परिषद सभेत सदरचा विषय सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास खालील प्रमाणे तत्वता मान्यता देण्यात आली आहे.

शिरडी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांकडून शिरडी नगरपंचायत यांनी विशेष स्वच्छता व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर आकारू नये, याकरिता शिरडी नगरपंचायत यांनी मागणी केलेली रक्कम प्रतीवर्षी रुपये ३९,६१,९९०/- पुर्णाकिंत रक्कम रुपये - ४०,००,०००/- ( अक्षरी रुपये - चाळीस लाख मात्र ) प्रती तीन महिन्यास रुपये १०,००,०००/- ( अक्षरी रुपये -दहा लाख मात्र) याप्रमाणे आगाऊ रक्कम शिरडी नगर पंचायतीस देण्यात यावी, असे मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी सांगितले. सर्वानुमते त्यास मान्यता देण्यांत आली. सदरहू विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निणर्यार्थ सादर करावा, त्यानंतर याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी. शासनाचे मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत येईल असे ठरले. यांस दिनांक ०५/११/२००५ च्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रंमाक ६५१ (६) अन्वये मान्यता देण्यांत आली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी अधिनियम - २००४ चे कलम २१ (२)(सी ) चा विचार करता नगरपंचायत शिरडीस अनुदान देणेबाबत शासनाची पूर्व परवानगी घेणे जरुरीचे आहे. व त्याप्रमाणे संस्थानने जा. क्रंमाक १३०५४ दिनांक ०९/११/२००५ ने शासनाची परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. अद्याप सदर परवानगी प्राप्त होणेवर आहे.

मात्र नगरपंचायत शिरडी यांना दरम्यानचे काळात खालील प्रमाणे रक्कम अदाई केलेली आहे.

१) रु. १०,००,०००/- नोव्हेंबर २००५, डिसेंबर २००५, जानेवारी २००६ दि. १०/०३/२००६ रोजी.

२) रु.१०,००,०००/- फेब्रुवारी, मार्च, एप्रिल २००६ चे दि. २७ /०६ /२००६ रोजी.

सदरची रक्कम मा. व्य.मंडळाचे ठरावास अनुसरुन व शासनाकडून प्राप्त होणारे मान्यतेचे अटीस आधिन राहून देण्यात आलेली आहे. शासनाकडून अद्याप प्रकरणी रक्कम अदाईसाठी मंजूरी प्राप्त झालेली नाही. मात्र नगरपंचायतीने आता मे, जुन, जुलै २००६ चे विशेष स्वच्छता कर / आरोग्य कर अनुदानाची रक्कम रु. १०,००,०००/- ( अक्षरी रुपये - दहा लाख मात्र ) मिळणेस दिनांक १९/०८/२००६ चे पत्राने विनंती केलेली आहे. संस्थानने विधी व न्याय विभाग यांचेकडे रक्कम अदाईचे प्रकरणी मंजूरी मागीतलेली आहे. सदर परवानगी अद्याप प्राप्त झालेली नाही. सदर परवानगी प्राप्त झ ाालेस रक्कम अदाईस अडचण येणार नाही. नगरपंचायत यांनीही त्यांचे मंत्रालय स्थरावरील खात्यांकडून रक्कम स्विकृती बाबत काही खुलासा आलेला नाही. अशा परिस्थीतीत नगरपंचायत शिर्डी यांनी मागणी प्रमाणे पथकराची विशेष स्वच्छता कर आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर माहे मे, जुन, जुलै २००६ चे रु. १०,००,०००/- ( अक्षरी रुपये - दहा लाख मात्र ) त्यांना शासन मान्यता आल्यानंतर अदा करणे उचीत राहील पुढील विचारार्थ सादर मात्र नगरपंचायत शिर्डी यांना मागणी प्रमाणे रक्कम देणे ठरल्याचा विचार झालेस शासन निर्णयाचे आधिन राहून रक्कम अदाईची अट टाकूनच माहे मे , जून , जुलै २००६ ची रक्कम रु. १०,००,०००/- ( अक्षरी रुपये - दहा लाख मात्र ) आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णयाचे आधिन राहून नगर पंचायत शिरडीस माहे मे-जून-जुलै,२००६ ची रक्कम रुपये १०,००,०००.०० (अक्षरी रुपये दहा लाख मात्र) आदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.४५.** **श्री जगदिश दशवाणी व इतर विरुध्द प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग या रिट पिटीशनचे वकील फी बाबत.**

**निर्णय क्र.८२८.** १) उपरोक्त रिट पिटीशनचे संदर्भात मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/१२/२००४ रोजीचे सभेत आयत्या वेळचा विषय नं १० निर्णय क्रं१८१ मंजूर झालेला आहे. रिट पिटीशनवरील मुद्यावर चर्चा होऊन प्रस्तुत प्रकरणी मा. श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष व मा. कार्यकारी अधिकारी यानी विचार विनिमय करून संस्थानचे वतीने वकीलाची नियुक्ती करावी. तसेच या प्रकरणी वकीलांचे सल्याप्रमाणे कार्यकारी अधिकारी यांनी सर्व कागदपत्र (ॲफिडेव्हिट) स्वाक्षरी करून द्यावेत अशा आशयाचा प्रस्तुतचा ठराव झालेला आहे. प्रस्तुत प्रकरणी सर्व मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांकरीता वकील देणे ॲफीडेव्हीट दाखल करणे, दाव्यासंबंधी माहिती गोळा करणे इत्यादी बाबींसाठी जो खर्च

येईल तो श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी कार्यालयाकडून करता येईल असेही प्रस्तुतचे ठरावांत निर्णय झालेला आहे. मात्र त्याबाबत मा.प्रधान सचिव विधी व न्यायखाते मुंबई यांचेकडून मार्गदर्शन मागविणेत आले होते.

**२)** उपरोक्त ठरावांस अनुसरून श्री. प्रमोद एन. पाटील यांचेकडे मा. कार्यकारी अधिकारी यांचे वकीलपत्र सुपूर्त करणेत आले आहे. त्याचप्रमाणे विश्वस्तांचे वकील पत्रही सुपूर्त करणेत आले आहे. (विश्वस्त मा. श्री डॉ.ए.भा.गोंदकर सो. व विश्वस्त मा. श्री अशोकराव खांबेकर सो यांनी ॲडव्होकेट, श्री. सावंत सो यांचेकडे वकीलपत्र सुपूर्त केलेले आहे व त्यांचेमार्फत ॲफिडेव्हिट दाखल केलेले आहे. )

३) ॲड श्री. प्रमोद पाटील यांना उपरोक्त विषयांकित केस संदर्भात दरम्यानचे काळात आलेले वकील फी बील रुपये ५०,०००/- ( अक्षरी रुपये पन्नास हजार ) इतकी रक्कम दिनांक ०५/०४/२००५ रोजी रुपये २५,०००/- + रुपये २५,००० /- दि ०७/०५/२००५ रोजी संस्थानने अदा केलेली आहे. मा. प्रधान सचिव , विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी नुकतीच यांस दि. ११/०७/२००६ चे पत्राने मान्यता दिलेली आहे.

४)श्री प्रमोद पाटील यांचे समवेत प्रकरणी चर्चा झाली आहे. तसेच इतर कामकाजही झालेले आहे. श्री. प्रमोद पाटील यांनी प्रस्तुत प्रकरणी आता दिनांक ०३/०८/२००६ रोजीचे पत्राने आणखी रक्कम रुपये १,२५,०००/- मात्र वकील फी मिळणेस विनंती केली आहे त्यांनी सदर केस प्रकरणी ॲफिडेव्हिट सादर करणे, तारखेस सुनावणी साठी हजर रहाणे, चर्चा कौन्सिल फीस, व्यावसायिक फीस याबाबीचा उल्लेख केला आहे.

५) नव्याने नियुक्त झालेले कमेटीने संस्थानचा कारभार पहाणेस सुरुवात केली आहे सदर कमेटी ही महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेली आहे. त्यांची नियुक्ती संस्थानवर झाली म्हणूनच त्यांना प्रस्तुत रिट पिटीशनला तोंड द्यावे लागत आहे. श्री. ॲड. प्रमोद पाटील काम पहात आहेत. मा. प्रधान सचिव यांचे समोरील कामकाज देखील प्रमोद एन.पाटील यांचे मार्फत चालू आहे.

**श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिरडी ॲक्ट २००४ सेक्शन ४ खालील प्रमाणे आहे.**

" Subject to the other provisions of this Act, the Committee shall be a body corporate by the name aforesaid ,having perpetual succession and a common seal with power to acquire, hold and dispose of property both movable and immovable, and to contract and shall by said name sue and be sued. "

**अधिनियम २३ खालील प्रमाणे आहे.**

" Section २३ : In all suits and other legal proceedings by or against the Sansthan Trust or the Committee, the pleadings shall be signed and verified by the Executive Officer and all processes in such suits and proceedings shall be issued to, or served on, the Executive Officer."

६) श्री. प्रमोद एन. पाटील यांची यापूर्वी प्रस्तुत केसचे कामी रुपये ५०,०००/- अदा केले आहेत व त्यास शासनाची मान्यता आहे. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांकरीता वकील देणे, ॲफीडेव्हील दाखल करणे , दाव्यासंबंधी कागदपत्र माहिती गोळा करणे इत्यादी बाबींसाठी जो खर्च येईल तो संस्थानचे कार्यालयाकडून करणेबाबतचे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. २७/१२/२००४ चे ठरावांस अनुसरुन शासनाचे मार्गदर्शन मागविणेत आले होते. शासन स्तरावर श्री पाटील यांना ठरविणेत आलेली वकील फी (रु. ५०,०००/- ) अदा करणेस कार्यात्तर मंजूरी प्राप्त झालेली आहे. आता श्री प्रमोद पाटील यांचेकडून आणखी रु. १,२५,०००/- वकील फी बाबत मागणी आहे.

७) उपरोक्त सर्व बाबींचा विचार होऊन श्री. प्रमोद एन.पाटील ॲडव्होकेट, मुंबई यांना त्यांचे बिलाची रक्कम रुपये १,२५,०००/- आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.४६. महाबळेश्वर मधोत्पादक सोसायटी, महाबळेश्वर यांना देण्यात आलेल्या गाळयास मुदतवाढ देणे बाबत.**

**निर्णय क्र.८२९.** १) संस्थानने नवीन भक्तनिवासस्थान ( ५०० रुम ) परिसरातील १ गाळा साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने अकरा महिने मुदतीचे कालावधी करिता लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर महाबळेश्वर मधउत्पादक सोसायटीस वापरांसाठी दिलेले आहेत.

| अ.नं | इमारतीचे नांव | गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्त - निवासस्थान | महाबळेश्वर मधोत्पादक सह सोसायटी लिमिटेड | दरमहा रुपये १५००/- | त्यांनी उत्पादित केलेल्या मध, | ०४-११-२००५ ते |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | गाळा क्रमांक ०४ | महाबळेश्वर | | वस्तूंचे विक्री करणे कामी | ०३-१०-२००६ |

उपरोक्त प्रमाणे महाबळेश्वर मधोत्पादक सह सोसायटी लिमिटेड,महाबळेश्वर ( मधुसागर ) यांची दिनांक ०३-१०-२००६ रोजी मुदत संपत असल्याने पुढील ११ महिने कालावधी करिता मुदतवाढ मिळणेबाबतचे त्यांचे पत्र इकडील कार्यालयास दिनांक ०५/०६/२००६ रोजी प्राप्त झाले असून त्यात त्यांनी "०३/१०/२००६ अखेर मुदत संपत असल्याने सदर नवीन भक्तनिवास गाळा नं ४ ची अकरा महिने मुदतवाढ मिळावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

यापूर्वीही त्यांना १) दिनांक ०४/०२/२००३ ते दिनांक ०३/०१/२००४ अखेर

२) दिनांक ०४/०१/२००४ ते दिनांक ०३/१२/२००४ अखेर

३) दिनांक ०४/१२/२००४ ते दिनांक ०३/११/२००५ अखेर या कालावधी करिता प्रस्तुतचा गाळा चालविणेस देण्यात आला होता व लिव्ह ॲन्ड लायसेन्स कालावधी संपलेनंतर दि०४/११/२००५ ते ०३/१०/२००६ पावेतो नव्याने पुढील कालावधीसाठी गाळा चालविणेस दिलेला आहे.याबाबतचा विचार करता " लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर गाळयास दिनांक ०४/१०/२००६ पासून पुढे ११ महिने मुदतवाढ लायसन्स फी मर्जीतर रुपये १८००/- मात्र व विद्युत आकार वेगळा आकारून लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर गाळयास ११ महिन्यासाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.४७. प्रसादालय परिसरात एस.टी.तिकीट बुकींगसाठी जागा उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.८३०.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी यांचे मंदिर विस्तारीकरणाचे काम झालेनंतर साईभक्तांना प्रवासाकामी चांगली सोई व सुविधा मिळावे म्हणून मंदिर परिसरात असलेले गाळेपैकी रेल्वे विभाग यांना रेल्वे तिकीट बुकींग कामी सध्या त्यांना वापरास गाळा देण्यात आलेला आहे. एस.टी महामंडळ यांना ही सदरचे ठिकाणी एस.टी. चे तिकीट बुकींग कामी १ गाळा दिलेला आहे भक्तांचे सुविधांसाठी सदर गाळा उपयोगात आहे करिता मासिक लायसेन्स फी रुपये ४००/- आकरणेत आलेली आहे.

मंदिर परिसरातील सुरक्षितेच्या दृष्टीने दिनांक २५/०७/२००६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी ,श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी व प्रशासकीय अधिकारी यांचेसमवेत आपले शिरडी एस.टी.डेपो (शिरडी बसस्थानक) कार्यालयाचे प्रतिनिधी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार मंदिर परिसरातील सुरक्षितता विचारात घेऊन त्यांना मंदिर परिसरातील एस.टी. तिकीट बुकींग कामी दिलेला गाळा तातडीने खाली करुन सदरचा गाळा तात्काळ संस्थानचे ताब्यात देण्यात यावा. व संस्थानने नुकतेच मंदिर परिसराच्या बाजूस साईनाथ छाया इमारत बांधलेली असून सदर ठिकाणी मंदिर परिसरात असलेले एस.टी. महामंडळाचे काऊंटर सदर इमारतीत हलविता येईल. असे त्यांना दि २७/०७/२००६ रोजीचे पत्राने कळविण्यात आलेले होते.

तदनुसार मा. अध्यक्ष महोदय यांचे नांवे श्री.जे.एम. उदमल्ले, विभाग नियत्रंक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अहमदनगर विभाग यांचे दिनांक ३१/०७/२००६ रोजीचे पत्र पाठवून लाडू प्रसाद विक्री स्टॉलच्या बाजूला जो मोकळा बुथ आहे तेथे रा. प. महामंडळास आरक्षण साठी बुथ देण्यात यावा सहकार्य अपेक्षित अशी विनंती केली आहे.

तसेच डेपो मॅनेजर एस.टी. कोपरगांव विभाग यांनी दिनांक २८/०७/२००६ रोजीचे पत्राने संस्थान परिसरातील एस.टी.ॲडव्हान्स बुकींग काऊंटर बाबत इकडील कार्यालयास कळविले असून त्यात त्यांनी राज्य परिवहन महामंडळास श्री साईबाबा संस्थान शिर्डी परिसरात प्रवाशांकरिता ॲडव्हान्स बुकींग कांऊटर दिलेले आहे. सुरक्षितेच्या कारणामुळे सदर बुकींग काऊंटर आपण अन्य ठिकाणी हलविण्याचे कळविले आहे. आपणांस विनंती करण्यात येते की, कृपया साईभक्तांच्या सोईसाठी बुकींग काऊंटर संस्थानच्या साईप्रसाद परिसरात देण्यात यावे. यामुळे साईभक्त प्रवाशांची व एसटीची देखील सोय होईल. असे त्यांनी म्हटलेले आहे.

साईप्रसाद परिसरात एस.टी. ॲडव्हान्स तिकीट बुकींग कामी काऊंटर दयावयाचे झाल्यास याकामी चौकशी व निवासस्थान विभाग यांचा सुध्दा अहवालकामी पत्र दिलेले आहे.

यापूर्वी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना मंदीर परिसरात १ गाळा दिलेला होता. आता दि. १४/०८/२००६ रोजी एस.टी. चे तिकीट बुकींग ॲडव्हान्स कामी तूर्त साईनाथ छाया इमारतीतील गाळा वापरांस दिलेला आहे. परंतु सदर जागेऐवजी साईप्रसाद मधील गाळा किंवा बुथसाठी जागा सोयीचे होईल.असे त्यांचे म्हणणे आहे. तरी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ॲडव्हान्स तिकीट बुकींग कामी साईप्रसाद परिसरात एक गाळा किंवा बुथसाठी १० X १० किंवा त्यापेक्षा लहान क्षेत्राची जागा ११ महिने करिता लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर मासिक भाडे व विद्युत बील वेगळे आकारुन देता येईल याकामी त्यांना मासिक परवाना फी रुपये ५०० पावेतो (विद्युत बील मिटर रिडींग

प्रमाणे) वेगळे आकारता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.४८. श्रीसाई संस्थान नोकरांची पतपेढी लि.शिर्डी यांचे मार्फत चालविण्यात येणारे स्वागतकक्ष येथील क्लोकरुमला मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.८३१.** नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिम बाजूस असलेले संस्थान मालकीचे सर्व्हे नं ११४ मधील पोलीस स्टेशनचे वापरांतील इमारतीचे नव्याने नुतानीकरण करणेत आले असून जुने पोलीस स्टेशन ऐवजी दिनांक २१/१०/२००४ पासून तिथे साईभक्तांचे सोयीसाठी स्वागतकक्ष सुरु करणेत आले आहे. पोलीस स्टेशनची पर्यायी व्यवस्थेत बदल करणेत आला असून आता प्रस्तुतचे ठिकाणी पोलीस स्टेशन नाही.

श्रीसाईबाबांचे दर्शन घेवून लगेच पुढील प्रवास ज्या साईभक्तांना करावयाचा असतो अशा साईभक्तांचे सामान ठेवणेची व्यवस्था नुतनीकरण केलेल्या उपरोक्त स्वागत कक्षाचे जागेत करणेत आलेली असून सदरचा व्यवसाय चालविणेस श्रीसाई संस्थान एमप्लाईज क्रेडीट को. ऑप. सोसायटी लि. शिरडी यांना दिनांक २२/०९/२००५ रोजी पासून पुढील ११ महिने कालावधी करिता म्हणजे दिनांक २१/०८/२००६ अखेर मासिक परवाना फी रक्कम रुपये ३३०/- प्रती महा व मिटर रिडींगप्रमाणे लाईटबिल वेगळे आकारुन चालविणेस इतर व्यवसायप्रमाणेच लिव्ह ॲंड लायसेन्सी परवानगी देणेत आलेली आहे. उपरोक्त कालावधीचा करारनामा मुदतीत मा. दुय्यम निंबधक कार्यालय, राहाता येथे कार्यालयात करण्यात आलेला आहे.

आता सदरचे व्यवसाय/गाळयांची मुदत दिनांक २१/०८/२००६ रोजी संपत असल्याने पुढील मुदतीत चालविणेसाठी श्रीसाई संस्थान एमप्लाईज क्रेडीट को. ऑप. सोसायटी लि. शिरडी यांनी दिनांक १६/०९/२००६ रोजीचे पत्राने मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे. त्यात त्यांनी "श्रीसाई संस्थान एमप्लाईज क्रेडीट को. ऑप. सोसायटी लि. शिरडी ही नोंदणीकृत सहकारी संस्था असून संस्थान कर्मचाऱ्यांचीच संस्था आहे. संस्था आपले संस्थान मान्यतेने श्रीसाईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी अनेक व्यवसाय चालवित आहे. संस्था एस.टी.स्टॅण्ड समोरील आपले संस्थानचे स्वागतकक्ष इमारतीत (माहिती व सुविधा केंद्र) श्रीसाईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी क्लोकरूम हा व्यवसाय चालवित असून सदर व्यवसायाची मुदत दिनांक २१/०९/२००६ रोजी पूर्ण होत आहे. तरी श्रीसाईभक्तांच्या सेवेसाठी व सोईसाठी सदर व्यवसाय संस्थेस पुढील पाच वर्षाकरिता चालविण्यास मुदत वाढ मिळावी अशी विनंती केली आहे "

श्रीसाई संस्थान एमप्लाईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि. शिरडी यांना एस.टी.स्टॅड समोरील देण्यात आलेल्या क्लोकरुमची मुदत दिनांक २१/०८/२००६ रोजी संपलेली आहे. याबाबतचा विचार करता तसेच पतपेढीकडून अशा सुविधा भक्तांना पुरविल्या जातात या बाबी विचारात घेऊन सदर मुदत दिनांक २२/०८/२००६ पासून ११ महिने दिनांक २१/०७/२००७ अखेर मुदतीचे कालावधीकरिता मागील मासिक परवाना फी रुपये ३३०/- मध्ये १०% वाढ करुन व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारून सदरचे क्लोकरुम चालविणेस मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.४९. प्रसादालय परिसरात वारणा दूध संघास स्टॉलकामी जागा देणेबाबत.**

**निर्णय क्र.८३२.** सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.५०. गुरुकृपा सेल्स यांचे भक्तनिवासस्थान येथील साईगंगा मिनरल वॉटरचे गाळयाचे भाड्याबाबत.**

**निर्णय क्र.८३३.** सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.५१. माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ चे अंतर्गत माहिती मिळणेकामी आलेल्या अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.८३४.** माहीतीचा अधिकार अधिनियम २००५ नियम क्रं.२ मध्ये केंद्र सरकारने किंवा संघराज्य क्षेत्र प्रशासनाने किंवा राज्य शासनाने स्थापन केलेल्या,घटित केलेल्या, त्याची मालकी असलेल्या,त्याचे नियंत्रण असलेल्या किंवा त्याने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे तरतूद केलेल्या निधीदवारे भरीव वित्तपूरवठा मिळालेल्या शासकीय प्राधिकरणाच्या संबंधात १) केंद्र सरकार २) राज्य शासन असा आहे अशी तरतूद आहे.

सन २००४ च्या महाराष्ट अधिनियम क्रं १४ नुसार, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये शिर्डी,जिल्हा अहमदनगर येथील श्री शिर्डी साईबाबा संस्थानची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्यात आलेली आहे. सबब त्यानुसार संस्थानवर महाराष्ट शासनाचे नियंत्रण आहे.

माहीतीचा अधिकार अधिनियम २००५ संदर्भात मा. व्यवस्थापन समितीच्या दि.०१/०४/२००६ चे सभेत निर्णय क्रं.२५३ खालीलप्रमाणे झालेला आहे.

" संस्थान विषयक विविध बाबीवर माहिती मिळणेबाबत जनतेकडून पत्रव्यवहार होत आहे व चालू आहे. सदरची माहिती माहितीचा अधिकार या कायद्यानुसार देणे क्रमप्राप्त आहे. सदरहू माहिती

देणे अगोदर सर्व कायदेशीर बाबी तपासून पहाणेकामी संस्थान वकीलाचा सल्ला घेऊनच पुढील कार्यवाही करण्यात यावी. "

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे माहीतीचा अधिकार अधिनियमांतर्गत माहीती मिळणेकामी एकूण १२ अर्ज आलेले आहेत. त्यात प्रामुख्याने संस्थानची चल-अचल मालमत्ता, संस्थानने इतर संस्थांना/व्यक्तींना दिलेल्या देणग्या वगैरेबाबत माहीती मागवलेली आहे. अर्जदारांच्या मागणीबाबतचा तपशिलवार तक्ता आजचे सभेत सदस्याना माहितीसाठी सादर करणेत आला होता.

सदर अधिनियमांतर्गत कामकाजासाठी शासनाने स्वतंत्र यंत्रणा निर्माण केलेली आहे. माहीती पुरविण्याचे कामकाज अत्यंत क्लिष्ट,वेळखाऊ तसेच कायदेशीर बाबी पडताळून पाहणे वगैरे स्वरुपाचे असल्याने संस्थानमध्येही याकामी स्वतंत्र सेलची आवश्यकता आहे. त्यासाठी खालील प्रमाणे नवीन पदे निर्माण करणे गरजेचे आहे.

| अ.नं | पदनाम | पदाची पात्रता | पदसंख्या | वेतनश्रेणी | जबाबदारी / कर्तव्य |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सहा.माहीती अधिकारी | विधी पदवीधर कायदेशीर कामाचा ५ वर्षांचा अनुभव. | ०१ | रु.५५००/- ते रु.९०००/- | आलेले अर्ज संबंधीत विभागाकडे पाठवून माहीती संकलित करणे, ॲडव्होकेट यांचा सल्ला घेणे, संबंधितांशी पत्र व्यवहार करणे, मा. व्यवस्थापन समिती समोर ठेवून मंजूरी घेणे, माहीतीचे संदर्भात पाठपुरावा करण्यासाठी येणारे दूरध्वनी घेणे व समक्ष येणा-यांशी चर्चा करणे. |
| ०२. | लिपिक/कॉम्प्युटर ऑपरेटर | पदवीधर, एमएससीआयटी कार्यालयीन कामाचा अनुभव. | ०१ | रु.३०५०/- ते रु.४५९०/- | रजिस्टर ठेवणे,या संदर्भातील सर्व कार्यालयीन कामकाज. |
| ०३. | शिपाई | | ०१ | रु.२५५०/- ते रु.३२००/- | वर्ग ४ चे कार्यालयीन कामकाज. |

सबंधित अधिनियमाच्या नियमाच्या विनीमयाच्या अधिन राहून संबंधित अर्जदारांना माहिती पुरविणेबाबत तसेच प्रस्तावित केलेले पदे निर्माण करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे प्रस्तावित केलेप्रमाणे पदे निर्माण करणेस मान्यता देण्यात आली, तत्पूर्वी माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ चे अंतर्गत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी चा समावेश होतो किंवा कसे याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी,माहितीचा अधिकार)

**विषय नं. ५२. मा.अध्यक्ष, छाननी समिती यांचे नियुक्तीबाबत.**

**निर्णय क्र.८३५.** "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,अधिनियम-४ चे कलम न्नं.२१ (२) पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेश तरतूदी केल्यानंतर आणि विश्वस्तव्यवस्थेच्या निधित, शिल्लक राहीली असल्यास,अशा शिल्लक रक्कमेचा,विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या ३० टक्केपेक्षा अधिक नसेल येवढा भाग,समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

**(एक)** राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने एखादया नोंदणीकृत सार्वजनीक विश्वस्तव्यवस्था,किंवा नोंदणीकृत सोसायटी यांचेकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था,सार्वजनीक वाचनालय, रुग्णालय,दवाखाना,निराश्रीत अथवा शारीरीक दृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करुन घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधीत असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनीक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतीक संघटनेची स्थापना व देखभाल करुन घेण्यासाठी : किंवा

**(दोन)** स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी :

परंतु,राज्य शासन या पोट - कलमाच्या प्रयोजनार्थ,मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व मान्यतेने नियुक्त केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशाच्या अध्यक्षतेखाली , असा अध्यक्ष आणि समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेले दोन सदस्य अशा एकूण तीन सदस्यांची मिळून बनलेली एक छाननी समिती स्थापन करील : आणि या छाननी समितीचा कालावधी समितीच्या कालावधीबरोबरच संपेल :

त्यास अनुसरुन महा.प्रबंधक उच्च न्यायालय मुंबई यांचे पत्र क्र.ए-१२१५/२००५ दि.१५/१२/२००५ अन्वये मा.उच्च न्यायालयाने निवृत्त न्यायमुर्ती श्री ए.एस.भाटे यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्या छाननी समितीच्या अध्यक्ष पदाकरीता शिफारस केलेली आहे, असे महाराष्ट्र शासन जा.क्र. सासवि-२००५/९११/(१२७)/सोळा,विधी व न्याय विभाग मंत्रालय (मुंबई) ३२ यांनी त्यांचे दि. १६/०१/२००६ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. सदर पत्रात नमूद केलेल्या मानधन, भत्ते तसेच पदाच्या अटी व शर्ती व कार्यकक्षा याबाबत व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन योग्य तो प्रस्ताव शासन मान्यतेकरीता पाठविण्यात यावा, असे कार्यासन अधिकारी विधी व न्याय विभाग मंत्रालय यांनी कळविले आहे.

मा.महाप्रबंधक यांनी त्यांचे पत्रात सदरचे कामासाठी संबंधीत समितीचे मा.अध्यक्ष श्री भाटे यांना दरमहा मानधन रु.१०,०००/- व कामाच्या दिवशी प्रतिदिनी रु.५००/- दैनिकभत्ता तसेच प्रवास भत्त्यापोटी दरमहा रु.४०००/- देण्यात यावे असे आदेशीत करण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त पत्रानुसार मा. न्यायमूर्ती श्री एस.एस.भाटे (सेवानिवृत्त ) यांना द्यावयाचे मानधन, भत्ते, पदांच्या अटी शर्ती व कार्यकक्षा ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे दिनांक०४.०३.२००६ चे सभेत सादर करण्यात आला होता.

याबाबत व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय क्र. १५९ अनुसार उपरोक्तबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेशी चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा, असें ठरलें आहे.

तरी मा.न्यायमुर्ती श्री एस.एस.भाटे (सेवानिवृत्त) यांचे नेमणूकीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, महा.प्रबंधक उच्च न्यायालय मुंबई यांचे आदेशात नमूद केल्याप्रमाणे दरमहा मानधन रुपये १०,०००/- व कामाच्या दिवशी प्रती दिन रुपये ५००/- दैनिक भत्ता तसेच प्रवास भत्त्यापोटी दरमहा रुपये ४,०००/- देण्यात येऊन, मा. न्यायमूर्ती श्री एस.एस.भाटे (सेवानिवृत्त) यांची अध्यक्ष, छाननी समिती म्हणून नेमणूक करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-सभाकामकाज विभाग)

**विषय नं.५३. डॉ.के.एन.टिंगरे,वैद्यकीय संचालक यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.८३६.** डॉ.के.एन.टिगंरे,यांची जा.नं.एसएसएस /वशी-०१/५९२५/२००६दि.०३/०५/२००६ अन्वये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे "वैद्यकीय संचालक (मेडीकल डायरेक्टर) " या पदावर प्रतिमहा रु.३५,०००/-(अक्षरी पस्तीस हजार) मात्र एकत्रीत मानधनावर प्रथमतः एक वर्षे कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०३/०५/२००६ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०७/२००६ रोजीचे सभेतील विषय नं.०२ निर्णय क्र.४१८(२३), "डॉ.के.एन.टिंगरे (न्युरो सर्जन) यांची श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये वैद्यकीय संचालक या पदावर नियुक्ती होवून ते दि.०३/०५/२००६ पासून सदर पदावर कार्यरत आहे.न्युरो सर्जनची सेवा फक्त नाशिक,नगर व पुणे येथेच उपलब्ध आहे.मेंदूच्या रुग्णांसाठी व अपघातग्रस्त रुग्णांचे सोईसाठी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये डॉ.टिंगरे यांना न्युरो सर्जरी करण्यासाठी आवश्यक साहित्य,हत्यारे,कोटेशन मागवून खरेदी करण्यात यावी.तसेच त्यांच्या न्युरो सर्जरीची सेवा इतर सुपरस्पेशालिटी सेवेप्रमाणे मानून नियमाप्रमाणे शेअर आदा करण्यात यावा." असा निर्णय झालेला आहे.

आता,डॉ.टिंगरे यांनी दि.०२/०९/२००६ रोजी अर्ज सादर करुन त्यात," मी वैद्यकीय संचालक या पदावर दि.०३/०५/२००६ पासून कार्यरत आहे तसेच मी एक न्युरो सर्जन आहे.आपल्या १०० कि.मी.परिसरात न्युरो सर्जन नसल्यामुळे ती पण सेवा मी संस्थानला मोफत देत आहे.सुरवातीच्या काळात अनंत अडचणीस सामोरे जाऊन सध्या इस्पीतळात ८०-१०० अंतरुग्ण म्हणून उपचार घेत असतात व जवळपास ५०-६० लाख रुपयांचा भरणा उत्पन्न म्हणून संस्थानकडे केलेला आहे.वैद्यकीय संचालक व न्युरोसर्जन ही दोन्ही पदे मी सांभाळत असल्यामुळे व तसेच रुग्ण हाच माझ्या आयुष्यातील केंद्रबिंदु असल्यामुळे एका पदाकडे लक्ष कमी होणे शक्य आहे.मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी वैद्यकीय संचालकांच्या कामाबद्दल पूर्ण समाधान व्यक्त केलेले नाही.त्यामुळे १०० कि.मी.परिसरात न्युरोसर्जन नसल्यामुळे व दैनंदिन श्री साईबाबा रुग्णालयात अपघातग्रस्त रुग्णांची संख्या वाढत असल्यामुळे मला वैद्यकीय संचालक ऐवजी न्युरो सर्जन पद बदलून देऊन अपघातग्रस्त रुग्णांची सेवा करण्याची संधी द्यावी." अशी विनंती केलेली आहे.

डॉ.के.एन.टिंगरे,वैद्यकीय संचालक यांचे अर्जातील विनंतीचा विचार करावयाचा झाल्यास, डॉ.टिंगरे यांची न्युरो सर्जन या पदावर आहे त्याच मानधनावर नेमणूक करुन त्यांचा वैद्यकीय संचालक या पदाचा कार्यभार (नव्याने नेमणूक होऊन सदर पदावर उमेदवार हजर होईपर्यंत ) सध्या उपवैद्यकीय संचालक या पदावर कार्यरत असलेले डॉ.आर.पी.पाटील यांचेकडे देणेबाबत अथवा दि.२३/०४/२००६ रोजी वैद्यकीय संचालक पदाचे समक्ष मुलाखतीसाठी हजर असलेल्या पैकी एका पात्र उमेदवारांची

नियुक्तीसाठी निवड करणे, किंवा वैद्यकीय संचालक या पदासाठी वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन समक्ष मुलाखती द्वारे सदर पदावर नियुक्ती करता येईल.

तरी,डॉ.टिंगरे यांची न्युरो सर्जन या पदावर आहे त्याच मानधनावर नेमणूक करुन त्यांचा वैद्यकीय संचालक या पदाचा कार्यभार (नव्याने नेमणूक होऊन सदर पदावर उमेदवार हजर होईपर्यंत) सध्या उपवैद्यकीय संचालक या पदावर कार्यरत असलेले डॉ.आर.पी.पाटील यांचेकडे देणेबाबत अथवा दि.२३/०४/२००६ रोजी वैद्यकीय संचालक पदाचे समक्ष मुलाखतीसाठी हजर असलेल्या पैकी एका पात्र उमेदवारांची नियुक्तीसाठी निवड करणे, किंवा वैद्यकीय संचालक या पदासाठी वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन समक्ष मुलाखती द्वारे सदर पदावर नियुक्ती करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत डॉ.टिंगरे उपस्थित होते, त्यांचेशी चर्चा करुन सभेने त्यांना पर्यायी व्यवस्था होईपर्यन्त सध्या वैद्यकीय संचालक या पदाचे काम करणेस सांगितले.तसेच वैद्यकीय संचालक व श्री साईबाबा हॉस्पिटलकडील इतर रिक्त पदांवर नेमणूक होणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.५४. सर्वश्री विनोद शेज्वळ व सतिष थोरात, वर्ग-४ चे कर्मचारी यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणे बाबत.**

**निर्णय क्र.८३७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५५. श्री लक्ष्मण सदाशिव चव्हाण,अधिक्षक, प्रत्यक्ष काम मुख्य रोखपाल यांना संस्थान सेवेत कायम करणे बाबत**

**निर्णय क्र.८३८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५६. कनिष्ठ अभियंता,स्थापत्य या पदावर नेमणूक होणे बाबत श्री गणेश रत्नाकर कोराटे यांचे अर्जा बाबत**

**निर्णय क्र.८३९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५७. श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये आयुर्वेद विभागत पंचकर्म तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची नव्याने दोन पदे भरणे बाबत**

**निर्णय क्र.८४०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५८. श्री वैभव पंडित,ज्यु.बायोमेडिकल इंजिनिअर,साईबाबा हॉस्पिटल यांचे मुदतवाढीबाबत**

**निर्णय क्र.८४१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५९. श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडील मेडिकल/पॅरॉमेडिकल अधिकारी/कर्मचारी यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.८४२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६०. श्री.प्रशांत गजाबा पारखे वर्ग-४ कर्मचारी यांनी ४।। वर्ष शैक्षणिक कामासाठी मागणी केलेल्या विनावेतन दीर्घ रजेबाबत.**

**निर्णय क्र.८४३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६१. व्यायामशाळा प्रशिक्षक भरती करणे बाबत.**

**निर्णय क्र.८४४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६२. श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडे नेमणूक करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी/आर.एम.ओ. नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८४५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६३. श्री.स्वप्नील गायकवाड व श्री.गंगाधर जाधव कंत्राटी ज्यूनिअर इंजिनिअर यांचे निश्चित मासिक वेतनाबाबत.**

**निर्णय क्र.८४६.** मा. उपाध्यक्ष सो. यांनी दि. ११.०९.२००६ रोजी पत्र देऊन त्यात सर्वश्री स्वप्नील बाबासाहेब गायकवाड, मधूकर परशराम गव्हाणे, गिरिष एकनाथ चोळके, अजय शिवराम पांडे व व गंगाधर शंकर जाधव हे पाच ज्यु. इंजिनियर्स आपल्या संस्थानमध्ये बांधकाम विभागाकडे ठेकेदारामार्फत कार्यरत आहेत.

त्यांच्या मासिक निश्चित वेतनाबाबतचा विषय दि. ०४.०२.२००६ रोजी तसेच दि. १९.०८.२००६ रोजीच्या मिटींगपुढे ठराव क्र. ९६ अन्वये ठेवण्यात आला होता. मात्र त्यावर अपेक्षीत निर्णय झाला नाही.

तेव्हा या सर्व ओव्हरसियर यांच्या बरोबरच स्वप्नील बाबासाहेब गायकवाड व गंगाधर शंकर जाधव यांचाही विचार व्हावा अशा प्रकारे टिपणी तयार करुन मिटींगपुढे ठेवावी, असे आदेश दिले आहेत.

सर्वश्री अजय शिवराम पांडे व इतर ४ कंत्राटी सेवेत असलेल्या कनिष्ठ अभियंते यांनी दि. १४.०१.२००६ रोजी अर्ज करुन त्यात आम्हाला संस्थान सेवेत समाविष्ठ करुन मासिक निश्चित वेतन मिळावे अशी विनंती केली होती.

सदर अर्जावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०२.२००६ रोजीचे सभेत निर्णय क्र.९० संमत झाला होता. सदर निर्णय कायम करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०३.२००६ चे सभेत ठेवला असता त्यावर चर्चा होऊन तो निर्णय क्र.१०५ (०५) नुसार तहकूब करण्यात आला.

याकामी श्री. पांडे व इतर चार कंत्राटी कनिष्ठ अभियंते यांनी दि.२९.०६.२००६ रोजी विनंती अर्ज केला त्या अर्जावर मा.उपाध्यक्ष सो॥. यांनी सदरचा विषय दि.०६.०७.२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर करण्यात यावा, असे अभिप्राय दिले होते. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि. १९.०८.२००६ रोजीचे सभेमध्ये सदरचा विषय मान्यतेसाठी फेर सादर करण्यात आला त्यावेळी सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. ६२६ अन्वये पाच वर्ष किंवा त्याहून अधिक काळ संस्थानमध्ये कंत्राटी सेव झालेल्या सर्वश्री अजय शिवराम पांडे, गिरिष एकनाथ चोळके, मधूकर परशराम गव्हाणे (बांधकाम) व प्रसादालय विभागामध्ये कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले श्री. अमृत गंगाधर जगताप, मेन्टनन्स इंजिनिअर यांना दरमहा रु.७०००/- एकत्रीत निश्चित मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक देण्यात यावी, असा पारित झालेला आहे.

श्री. स्वप्नील गायकवाड यांची संस्थानमधील कंत्राटी सेवा ही अर्जाचे तारखेस सहा महिने इतकी झालेली आहे व श्री. गंगाधर शंकर जाधव यांची संस्थानमधील कंत्राटी सेवा ही अर्जाचे तारखेस दिड वर्षे इतकी झालेली आहे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये व्दारावती इमारत, प्रसादालय इमारत व वर्ग-४ चे कर्मचारी निवासस्थाने मुंबई ते शिर्डी येथे विविध ठिकाणी पालखी थांबे बांधकाम,रस्ते संस्थान इमारतीचे दुरुस्ती देखभाल इत्यादी मोठ्या प्रमाणावर बांधकामे चालू आहेत. तसेच प्रस्तावित विविध रस्त्यांचे बांधकाम, साईआश्रम साईविश्राम, साईउद्यान (बगीचा) इत्यादी मोठ्या प्रकल्पांचे कामे प्रस्तावित आहेत. या कामासाठी आवश्यक तांत्रीक मनुष्यबळ कमी असल्याने सर्वश्री स्वप्नील गायकवाड व गंगाधर शंकर जाधव यांना दरमहा रुपये ७,०००/- एकत्रित निश्चित मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.६४. श्री साईनाथ हॉस्पिटलकडील डॉक्टरांना श्री साईबाबा हॉस्पिटलकडील डॉक्टरांप्रमाणे वेतन देणे बाबत.**

**निर्णय क्र.८४७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करणे आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१. श्री साईबाबा दैनंदिनी २००७ छपाईकामी कागदाचे दरात झालेल्या वाढी बाबत**

**निर्णय क्र.८४८.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०९.२००६ रोजीचे सभेतील विषय नं.२७ निर्णय क्र.६८१ नुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी २००७ छपाईकामी महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना जा.नं.एसएसएस /वशी/प्रकाशने/१३२३८/२००६ दि.२५.०९.२००६ अन्वये श्री साईबाबा दैनंदिनी ५०,००० नग प्रती नग छपाई रुपये रु.४९.०० प्रमाणे छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांनी त्यांचेकडील दि.०९.१०.२००६ रोजी छपाई आदेशानुसार कागदाचे नमुने असलेल्या डाय-या सादर केल्या आहेत. सदरचे नमुने दि.०९.१०.२००६ रोजी मा. अध्यक्ष साहेब, मा. उपाध्यक्ष साहेब व मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी पाहून बल्लारपूर कंपनीच्या कागदाची डमी डायरी मान्य केली आहे. तथापी महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांनी त्यांचे दि.०९.१०.२००६ रोजी प्रकाशने विभागात दाखल केलेले श्री साईबाबा दैनंदिनीच्या कागदाचे दरात झालेल्या वाढीबाबतचे पत्रात छपाई आदेशानुसार मंजूरी दिलेल्या या बल्लारपूर कंपनीच्या कागदाच्या डमीसाठी प्रमुख बल्लारपूर कंपनीकडून दि.०३ ऑक्टोबर व ५ ऑक्टोबरच्या मुद्रणालयास प्राप्त झालेल्या फॅक्सनुसार सदर नमुन्याच्या कागदाच्या टनामागे रु.७५०/- वाहतूक चार्जेस वाढविल्यामुळे नाईलाजास्तव रु.०.५५ पैसे प्रती नग डायरी मागे वाढ मागणी केली आहे. व या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करणेस विनंती केली आहे.

यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०९.२००६ रोजीचे सभेतील विषय नं.२७ निर्णय क्रमांक ६८१ नुसार ५०,००० दैनंदिनी छपाई कामी जा.नं.एसएसएस /वशी/प्रकाशने/ १३२३८/२००६ दि.२५.०९.२००६ अन्वये श्री साईबाबा दैनंदिनी प्रती नग छपाई दर रु.४९.०० प्रमाणे दैनंदिनी छपाई कामाचा पुवठा आदेश संबंधीत छपाईधारक महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना देण्यात आला आहे. तथापी छपाई आदेशानुसार महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांनी दैनंदिनीसाठी कागदाच्या दर वाढीबाबतचे पत्र दि.०९.१०.२००६ रोजी मा. उपाध्यक्ष साहेब यांचेकडे सादर केले असता, मा. उपाध्यक्ष साहेब यांनी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समवेत महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे चे सरव्यवस्थापक व सहाय्यक सरव्यवस्थापक यांचेशी समक्ष चर्चा केली असता, यात प्रती नग दैनंदिनी मागे रु.०.५० पैसे प्रमाणे वाढ करुन दैनंदिनीची छपाई संख्या ५०,००० नगात अधिक ३०,००० दैनंदिनी नगांची छपाई याप्रमाणे एकूण दैनंदिनी ८०,००० नगांची छपाई करण्यात यावी असे सुचित केले आहे. या तपशिलास अनुसरुन दैनंदिनी छपाईकामी खालील प्रमाणे येणारा खर्च अपेक्षित आहे.

अ) दैनंदिनी छपाई आदेश जा.नं.एसएसएस /वशी/प्रकाशने/ १३२३८/२००६ दि.२५.०९.२००६ अन्वये श्री साईबाबा दैनंदिनी प्रती नग छपाई दर रु.४९.०० या दरात रु.०.५० पैसे या वाढीव दराने रुपये २५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

ब) वाढीव दैनंदिनी नग ३०,००० छपाईकामी महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांचे दरवाढीचे पत्रानुसार प्रती नग दर रु.४९.५० पैसे प्रमाणे एकूण रुपये १४,८५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील "अ" प्रमाणे छपाई आदेशानुसार ५०,००० नग दैनंदिनी छपाईकामी प्रती नग वाढीव दर रुपये ०.५० पैसे प्रमाणे एकूण रुपये २५,०००/- मात्र चे वाढीव खर्चास व "ब" यात दर्शविलेप्रमाणे छपाई आदेशाव्यतिरिक्त वाढीव दैनंदिनी नग ३०,००० छपाईकामी संबंधीत प्रेसधारकाची कागदाची दरवाढ लक्षात घेता दैनंदिनी प्रती नग छपाई दर रु.४९.५० पैसे प्रमाणे येणा-या रुपये १४,८५,०००/- मात्रचा खर्च याप्रमाणे "अ" व "ब" दोन्ही मिळून एकूण रुपये १५,१०,०००/- (अक्षरी रुपये पंधरा लाख, दहा हजार) मात्रचे अपेक्षित खर्चास तसेच यास अनुसरुन दैनंदिनी -२००७ संबंधीत छपाई धारक महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना दैनंदिनी २००७ चा एकूण छपाई नग ८०,००० प्रती नग छपाई दर रु.४९.५० पैसे याप्रमाणे फेर छपाई आदेश देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२. एस.राधास्वामी फौंडेशन सिकंदराबाद यांची दिप्ती हाऊस,सिकंदराबाद येथील दुसऱ्या मजल्यावरील ३००० चौ.फुट जागा घेणे बाबत,**

**निर्णय क्र.८४९.** एस.राधास्वामी फौडेंशन, रजिष्टर्ड कार्यालय ९-१-३८, दिप्ती हाऊस, वायएमसीए कॉम्प्लेक्स, एस.पी.रोड, सिकंदराबाद यांनी सदर इमारतीमधील दुसऱ्या माळयावर ३००० चौरस फुट जागा संस्थानला देणेबाबत दिनांक १२ ऑक्टोबर, २००६ रोजी प्रस्ताव दिलेला आहे.

उपरोक्त जागेची पाहणी, मा.श्री.सुरेशराव गो. वाबळे पा. (विश्वस्त), मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर (विश्वस्त),श्री. बी.आर.वाक्चौरे, कार्यकारी अधिकारी व श्री. आर.बी.आहेर, वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २००६ रोजी समक्ष पाहणी केलेली आहे. सदरची जागा साईभक्तांसाठी संस्थानचे माहिती केंद्र व इतर सुविधा उपलब्ध करुन देणेकामी उपयोगी आहे.

कार्यकारी विश्वस्त, एस.राधास्वामी फौडेंशन, सिकंदराबाद यांनी चर्चेत विनामुल्य भाडेपट्टयाने देण्याचे मान्य केलेले आहे.

खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती आहे :

सिकंदराबाद येथील एस.राधास्वामी फौडेंशन यांची वायएमसीए कॉम्प्लेक्स मधील दिप्ती हाऊसच्या दुसऱ्या मजल्यावरील ३००० चौरस फुट जागा विनामुल्य भाडेपट्टयाने घेणेबाबत मान्यता असावी, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर साधकबाधक चर्चा होऊन, एस.राधास्वामी फौंडेशन यांनी देऊ केलेली जागा ही वायएमसीए व दिप्ती बिल्डर्स यांची आहे. या जागेबाबत एस.राधास्वामी फौंडेशन व दिप्ती बिल्डर्स यांचेत भाडेपट्टा करारनामा झालेला आहे. त्यानुसार एस.राधास्वामी फौडेंशन हे उपरोक्त जागा संस्थानला विनामुल्य भाडेपट्टयाने देणार आहेत, ती स्वीकारण्यात यावी व याकामी करावयाचे करारनामा इत्यादीसाठी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त जागा ताब्यात मिळालेनंतर या ठिकाणी माहिती केंद्राचे कर्मचाऱ्यांसाठी निवासव्यवस्था व साईभक्तांसाठी प्रासंगिक निवासव्यवस्था करणेसाठी या जागेत आवश्यक असे फर्निचर व इतर निवासी सुविधा निर्माण करणेकामी सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे यथावकाश सादर करावा. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३. एस.राधास्वामी फौंडेशन,सिकंदराबाद यांची जागा विनामोबदला भाडेपट्टयाने घेणे बाबत**

**निर्णय क्र.८५०. (अ)** मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०३ जून, २००६ रोजी झालेल्या सभेत एस.राधास्वामी फौडेंशन, सिकंदराबाद यांनी देऊ केलेल्या जागेबाबत (सिकंदराबाद येथील एस.पी. रोडवर असलेल्या दिप्ती हाऊस, वायएमसीए कॉम्प्लेक्समधील मागील बाजूची म्युनिसिपल घर क्रमांक २५/ ९-१-३८/अ/२५ मधील १९० चौरस फुट जागा) निर्णय क्रमांक ३३५ खालीलप्रमाणे झालेला आहे :

" सिकंदराबाद येथील देणगी मिळणारे जागेबाबत योग्य ती कायदेशीर पुर्तता करुन जागा ताब्यात घेणेबाबत कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. "

उपरोक्त निर्णयाप्रमाणे संस्थानचे वकील श्री. एस.एम.वाघ यांना भाडेपट्टयाचा मसुदा करुन देणेबाबत दिनांक २९ सप्टेंबर,२००६ रोजी पत्र दिलेले आहे. त्यांचेकडून भाडेपट्टयाचा मसुदा मिळताच पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

तसेच, उपरोक्त जागेची पाहणी, मा.श्री.सुरेशराव गो. वाबळे पा. (विश्वस्त), मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर (विश्वस्त),श्री. बी.आर.वाक्चौरे, कार्यकारी अधिकारी व श्री. आर.बी.आहेर, वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २००६ रोजी समक्ष पाहणी केलेली आहे. सदरची जागा साईभक्तांसाठी संस्थानचे माहिती केंद्रासाठी उपयोगी आहे. एस.राधास्वामी फाउंडेशन ,सिंकदराबाद

यांनी दिनांक ०१/०४/२००५ रोजीचे मे.दिप्ती बिल्डर्स, सिकंदराबाद यांचे समवेत त्यांच्या झालेल्या करारनाम्यानुसार देवु केले आहे.

याबाबत दिनांक १२ ऑक्टोबर, २००६ रोजी एस.राधास्वामी फौडेंशन, सिकंदराबाद व कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मध्ये समझोत्याचा करारनामा झालेला आहे.

तरी खालीलबाबतीत निर्णय होणेस विनंती आहे :

सदर समझोता करारास मंजूरी मिळावी.

सदर समझोता करारास अनुसरुन संस्थानचे वकीलाकडून विनामोबदला भाडेपट्टयाचा मसुदा तयार करुन घेऊन भाडेपट्टा करारनामा करणेस तसेच भाडेपट्टा करारनामा नोंदविणेकामी येणारे मुद्रांक व नोंदणी शुल्क व इतर योग्य तो सर्व खर्च संस्थानमार्फत करणेस मान्यता असावी.

असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर साधकबाधक चर्चा होऊन, एस.राधास्वामी फौंडेशन यांनी देऊ केलेली जागा ही वायएमसीए व दिप्ती बिल्डर्स यांची आहे. या जागेबाबत एस.राधास्वामी फौंडेशन व दिप्ती बिल्डर्स यांचेत भाडेपट्टा करारनामा झालेला आहे. त्यानुसार एस.राधास्वामी फौडेंशन हे उपरोक्त जागा संस्थानला विनामुल्य भाडेपट्टयाने देणार आहेत, ती स्वीकारण्यात यावी व याकामी करावयाचे करारनामा इत्यादीसाठी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त जागा ताब्यात मिळालेनंतर या ठिकाणी माहिती केंद्र सुरु करणेसाठी आवश्यक असे फर्निचर व इतर सुविधा निर्माण करणेसाठी सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे यथावकाश सादर करावा. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४. कोपरगांव नगर परिषद कोपरगांव शहरातील मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे काम श्री साईबाबा संस्थानचे निधीतून करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.८५१. (अ)** कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांचे दिनांक २० ऑक्टोबर,२००५ रोजीचे प्रस्तावानुसार, कोपरगांव शहरातील मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे खडीकरण व डांबरीकरण संस्थानाच्या निधीतून करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ नोव्हेंबर,२००५ सभेतील निर्णय क्रमांक ७२९ नुसार तत्वतः मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन विधी व न्याय विभागाकडे संदर्भ क्रमांक जा.क्र.एसएसएसटी/वशी/बांधकाम/१४७३४/२००५, दि.१७ डिसें.,०५ व जा.क्र.एसएसएसटी/वशी/ बांधकाम /६२३/२००६, दि.१६ जाने.,०६ नुसार कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांना निधी उपलब्ध करुन देणेबाबतच्या मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता.

यांस अनुसरुन, विधी व न्याय विभागाकडूनशासन निर्णय क्रमांक सासंवि २००५/११३८/(२)/का.सोळा, दि.१३ एप्रिल,२००६ नुसार कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांना मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे दुरुस्तीकरीता होणारा खर्च रक्कम रुपये १,१२,४९,५१०/- (अक्षरी रुपये एक कोटी बारा लाख एकोणपन्नास हजार पांचशे दहा मात्र ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था निधीतून करणेस व सदर रक्कम कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांना अदा करण्यास एक विशेष बाब म्हणून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

**(ब)** उपरोक्तप्रमाणे शासन निर्णयाचे मान्यतेनुसार, कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांना मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे दुरुस्तीकरीता उपलब्ध करुन द्यावयाचा निधी, कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांचेकडे वर्ग करणेबाबत मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५ मे,२००६ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता.

उपरोक्तप्रमाणे निधी वर्ग करणेबाबतच्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत सविस्तर चर्चा करणेत आली. कोपरगांव शहरातील मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम मोठया स्वरुपाचे असून, या कामासाठी कोपरगांव नगरपरिषदेकडे पुरेसे सक्षम मनुष्यबळ व यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे सदर मार्गाचे काम वेगाने व दर्जेदार होणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेणे उचित होईल. त्यासाठी वरीलप्रमाणे निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडे वर्ग करणेसाठी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असा निर्णय घेण्यांत आलेला आहे.

**(क)** विधी व न्याय विभागाकडून शासन निर्णय क्रमांक सासंवि २००५/११३८/(२)/का.१६, दिनांक १३ एप्रिल, २००६ नुसार सदर मार्गाचे कामासाठी निधी वर्ग करणेबाबत मान्यता मिळालेली आहे. याच मान्यतेस अधिन राहून, मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, कोपरगांव शहरातील मध्यवर्ती कावडी व

गंगाजल मार्गाचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचे माध्यमातून करुन घेणेस व याकामी येणारा खर्च अंदाजे रक्कम रुपये १,१२,४९,५१०/- (अक्षरी रुपये एक कोटी बारा लाख एकोणपन्नास हजार पांचशे दहा मात्र ) चा निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडे वर्ग करणेस मान्यता मिळणेसाठी इकडील जा.क्र.७६६५ दि.१२/०६/२००६ रोजीचे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग यांचेकडे पुर्नःप्रस्तावित करण्यांत आले होते. तसेच मा.अध्यक्षसाो. यांनी दि.०२/०७/२००६ रोजी दिलेल्या सुचनांनुसार, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना रस्त्याचे एस्टिमेट तयार करणे, निविदा मागविणे इत्यादी कार्यवाही सुरु करणेस व दरम्यान संस्थानकडून निधी वर्ग करण्यात येत आहे याबाबतचे पत्र दिनांक ११ जुलै, २००६ रोजी मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना देणेत आलेले आहे.

**(ड)** त्यानंतर शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००५/११३८/(२)-का.सोळा, दि.२८ ऑगष्ट,०६ अन्वये शासनाने संस्थानने उपरोक्त निधी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे वर्ग करणेचा विनंती प्रस्ताव अमान्य केलेला आहे. तद्नंतर, या शासन निर्णयाचा फेरविचार करावा म्हणून मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे स्वाक्षरीने मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १२ सप्टेंबर, २००६ रोजी विनंती पत्र देण्यात आलेले आहे.

**<u>सद्य:स्थिती.</u>**

**(१)** अध्यक्ष, कोपरगांव नगरपरिषद यांनी त्यांचे दिनांक २२ सप्टेंबर, २००६ रोजीचे पत्रान्वये, कोपरगांव शहरातील गंगाजल कावडी मार्गाचे कामासाठीचा निधी शासन निर्णयानुसार कोपरगांव नगरपरिषद यांचेकडे वर्ग करावा, अशी विनंती केली आहे. तसेच यापत्रात त्यांनी पुढीलप्रमाणे इशारा दिला आहे :

"आपण सदर कामाकरीता निधी नगरपरिषदेकडे त्वरीत वर्ग करावा अन्यथा तीव्र आंदोलन सुरु करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आंदोलनामध्ये काही गैरप्रकार झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील."

**(२)** मा. प्रधान सचिव व वरिष्ठ विधी सल्लागार, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे त्यांचेकडील संदर्भ क्रमांक ०८ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे :

०१. दिनांक १३ एप्रिल, २००६ च्या शासन निर्णयानुसार विशेष बाब म्हणून शासन मान्यता दिल्यानंतरही विषयांकित कामकाजाकरीता निधी उपलब्ध करुन न देता आपण शासनास पत्रव्यवहार केला. त्यावरही शासनाने दिनांक २८ ऑगष्ट, २००६ च्या पत्रान्वये आपणांस निदेश दिले होते. तथापि सदर आदेश आपल्याकडून पाळले न गेल्याचे अध्यक्ष, कोपरगांव नगरपरिषद यांच्या ( दिनांक २२ सप्टेंबर, २००६चे ) पत्रावरुन दिसून येते.

०२. शासन निर्णय दिनांक १३ एप्रिल, २००६ नुसार देण्यात आलेल्या आदेशाचे पालन तात्काळ करण्यात यावे व उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करण्यास लागलेल्या विलंबाबाबत शासनास खुलासा सादर करावा.

**(३)** मा.व्यवस्थापन समितीने दिनांक १५ मे, २००६ रोजीचे सभेत साधकबाधक चर्चा करुन, कोपरगांव शहरातील मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम मोठया स्वरुपाचे असून, या कामासाठी कोपरगांव नगरपरिषदेकडे पुरेसे सक्षम मनुष्यबळ व यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे सदर मार्गाचे काम वेगाने व दर्जेदार होणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेणे उचित होईल. त्यासाठी वरीलप्रमाणे निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडे वर्ग करणेसाठी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असा निर्णय घेतला होता व त्यानुसारच विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पुर्नःप्रस्तावित करण्यात आलेले होते. शासनाने दिनांक २८ ऑगष्ट,२००६ रोजीचे पत्रान्वये सदरील विनंती अमान्य करणेत येत असलेबाबत कळविलेले आहे. त्यानंतर मा.अध्यक्षसाो. यांचे सुचनेनुसार व स्वाक्षरीने मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १२ सप्टेंबर, २००६ रोजी उपरोक्त निर्णयाचा फेरविचार करणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

**(४)** आता, मा.प्रधान सचिव व वरिष्ठ विधी अधिकारी यांनी दिनांक ११ ऑक्टोबर, २००६ रोजीचे पत्रान्वये दिनांक १३ एप्रिल, २००६ रोजीचे शासन आदेशाचे पालन तात्काळ करणेबाबत व आदेशाच्या अंमलबजावणी लागलेल्या विलंबाबाबत शासनास खुलासा करणेबाबत कळविलेले आहे.

तरी उपरोक्त विषयांकित मार्गाचे कामांबाबत शासनाने मंजूर केलेला निधी कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांचेकडे वर्ग करणेत यावा किंवा कसे तसेच आदेशाच्या अंमलबजावणी लागलेल्या विलंबाबाबत शासनास परिच्छेद क्रमांक ०३ मध्ये उध्दृत केल्याप्रमाणे खुलासा कळविण्यात यावा किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कोपरगांव नगर परिषद कोपरगांव शहरातील मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे काम वेगाने व दर्जेदार होणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करुन घेण्यात यावे. त्यासाठीचा निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेकडे वर्ग करणेसाठी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. तसेच, आदेशाच्या अंमलबजावणीस लागलेल्या विलंबाबाबत शासनास उपरोक्त परिच्छेद क्र. ३ मध्ये उध्दृत केल्याप्रमाणे खुलासा कळविणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५. श्रीसाईबाबा समाधी मंदीरास व मंदीर परिसरास फुलांची सजावट करणेबाबत.**

**निर्णय क्र.८५२.** दिपावली सणानिमित्त श्री साईबाबाच्या मंदिरात लक्ष्मीपुजा हा कार्यक्रम दरवर्षी करण्यात येतो. त्यासाठी समाधी मंदिर,गुरुस्थान,चावडी व व्दारकामाई या सर्व ठिकाणी दर्शनी बाजूने फुलांची सजावट करावयाची आहे. त्यात फुलांची तोरणे,बास्केट,बुके इ.वापरुन करण्यात येणार आहे. या सजावटीसाठी जरबेरा,ॲस्टर,कार्नेशा,झेंडू ,शेवती इत्यादी जातीची फुले वापरण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने खालील प्रमाणे सजावट करावयाची आहे.

०१. समाधी मंदिर :समाधी मंदिरातील आतील सर्व व्दारांना तारेणे लावणे व मुर्तीच्या बाजूने फुलांची सजावट करणे.

०२ व्दारकामाईः व्दारकामाई समोरील बाजूने तोरणे लावण्यात येतील.व्दारकामाईतील आतील फोटो व शीळेवरील फोटोसाठी फुलांच्या माळा सोडवयाच्या आहे व व्दारकामाईतील आतील दरवाजास तोरण व फुलांची बुके
लावण्यात येणार आहे.

०३ गुरुस्थानः गुरुस्थानच्या चारही बाजूने तोरणे लावणे व आतील फोटोजवळील बाजूने फुलांची बुर्के लावण्यात येणार आहे.

०४ चावडीः चावडीच्या समोरील बाजूने तोरण लावणे पीलरसाठी फुलांचे बुके व "श्रींचे" फोटोसाठी फुलाच्या माळा लाववयाच्या आहे.

तसेच मंदिर परिसरातील चारही महाव्दारांना व शनी मंदिर,गणपती मंदिर व महादेव मंदिर यांच्या दरवाजांना तोरणे लावून सजावट करावयाची आहे. याकामी सजावट करणारे कुशल कारागीरांकडून कोटेशन मागविण्यात आलेली आहेत.त्यात

| अ.क्र | दुकानचे नाव | कामाची रक्कम |
|---|---|---|
| ०१ | व्दारकामाई प्लॉवर,शिर्डी | रु. ७५,०००.०० |
| ०२ | विरभद्र फुल भांडार,राहाता | रु.०१,०१,०००.०० |
| ०३ | श्री जयनारायण पुष्पकला भांडार,अहमदागर | रु. ९५,०००.०० |

उपरोक्त कोटेशन पैकी अ.न.०१ यांचे दर सर्वात कमी असल्याने सजावट करावयाचे काम व्दारकामाई प्लॉवर,शिर्डी [श्री.राजू पांडूरंग उईके, शिर्डी ] यांच्या कडून करुन घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बगीचा विभाग प्रमुख/मंदिर विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६. मोफत चप्पल स्टॅण्डसाठी लोखंडी मांडण्या (रॅक) व कुपन्स छपाईबाबत**

**निर्णय क्र.८५३.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत विनामोबदला चप्पल स्टॅंण्ड चालविण्याचे ठरलेले असून यासाठी मंदिर परिसरात भक्त येण्यापूर्वी चारही गेटवर मोफत चप्पल स्टॅंण्डची व्यवस्था करण्यात आलेली आहे. भक्तांचे चप्पल बूट सुरक्षित रहावे म्हणून लोखंडी मांडण्या (रॅक) खरेदी करण्यात याव्यात. सदरील रॅक ह्या ६.५ फुट उंच, ३ फुट रुंद व १८ इंच खोलीच्या तसेच रॅकचा पत्रा हा १८ ते २० गेजपर्यन्त असणे आवश्यक आहे. सदरील रॅकची बाजारात चौकशी केली असता अंदाजे रुपये २५०० ते ३०००/- प्रती नग असा आहे.त्यानुसार ४० नग रॅक खरेदी करणेस अंदाजे रुपये १,२०,०००.०० खर्च अपेक्षित आहे.

श्री साईभक्तांना चप्पल तसेच बूट ठेवण्यासाठी प्लॅस्टिक पिशव्यांचा (सिमेंट गोणी) वापर होत असून त्यावर पेंटरकडून नंबर टाकून त्या पिशवीवर नंबर छपील पावतीवर टाकण्यात येईल. तसेच नंबर असलेली पावती भक्तांस देणेत येऊन तोच नंबर काऊंटर पावतीवर टाकण्यात येऊन संस्थानकडे रेकॉर्डसाठी ठेवता येईल. भक्त दर्शन करुनप आलेवर ती पावती भक्तांना पुन्हा स्टॉलवर संस्थानकडे जमा केल्यानंतर सदर भक्तास चप्पल ठेवलेली पिशवी परत करता येईल. त्यासाठी तूर्त १० X२० से.मी.च्या २५० पानी बूके असलेल्या पावत्या छपाई कराव्या लागतील. सध्या ५००० बुके छपाई करणे प्रती बुक रुपये २५/- प्रमाणे अंदाजे रुपये १,२५,०००/- अपेक्षित आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे ४० नग रॅक व ५००० नग कुपनबुके छपाई करणेस येणारे अंदाजे रक्कम रुपये २,४५,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, चप्पल स्टॅण्डसाठी ४० नग लोखंडी मांडण्या (रॅक) कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,२०,०००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच कुपन बुके न छपाई करता भक्तांना बिल्ले देण्यात यावे असे ठरले. याकरीता बिल्ले तयार करुन घेण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/संरक्षण विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७. नवीन प्रसादालय प्रकल्पाचे इलेक्ट्रीकल कामाचे टेंडर बोलविणे बाबत**

**निर्णय क्र.८५४.** दिनांक ०४-०३-२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषयांकित कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी नविन प्रसादालय प्रकल्पाचे इमारतीचे आर्किटेक्ट मे.शक्ति परमार ॲड असोशिएटस, ३०७, राम निमि बिल्डींग, ८, मंडलीक रोड, कोलाबा कॉजवे, मुंबई - ४०० ०३९ यांचेकडून आलेल्या या इमारतीच्या इलेक्ट्रिकलच्या कामाच्या संबंधित इस्टिमेटची तांत्रिक पडताळणी सा.बां विद्युत विभाग यांचेकडून करून घेऊन सदर कामासाठी सा.बा.विद्युत विभाग यांची तांत्रिक मान्यता प्राप्त करण्यात यावी व त्यानुसार निविदा मागविणेत याव्यात असे ठरले आहे. त्यानुसार इलेक्ट्रिकलच्या कामाचे अंदाजपत्रकासाठी तांत्रिक मान्यतेबाबत सा.बा.विद्युत विभागाकडे आवश्यक पुर्तता करण्यात आलेली असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

या इलेक्ट्रीफिकेशन कामाचे इस्टिमेट हे अनुक्रमे (१)मा.कार्यकारी अभियंता, सा.बा.विद्युत विभाग, नाशिक , यानंतर (२). मा. अधिक्षक अभियंता (विद्युत), सा.बा. विद्युत विभाग, औरंगाबाद व शेवटी (३). मा. मुख्य अभियंता, सा.बा. विद्युत विभाग, मुंबई यांचेकडून पडताळणी करुन घेणेची पद्धत असल्याने प्रथम हे इस्टिमेट मा. कार्यकारी अभियंता, सा.बा.विद्युत विभाग, नाशिक यांचेकडे मान्यतेसाठी व पडताळणीसाठी सादर करण्यात आले.

मा. कार्यकारी अभियंता, सा.बा.विद्युत विभाग, नाशिक यांनी इस्टिमेटमधील वेळोवेळी सुचविलेल्यात्रूटी दुरुस्त करुन देण्यात आल्यानंतर मा. कार्यकारी अभियंता, सा.बा.विद्युत विभाग, - नाशिक यांनी हे इस्टिमेट पुढील पडताळणीसाठी मा. अधिक्षक अभियंता (विद्युत) सा.बा.विद्युत विभाग, औरंगाबाद यांचेकडे पाठविले होते.

आता मा. अधिक्षक अभियंता (विद्युत) सा.बा.विद्युत विभाग, औरंगाबाद यांनी इस्टिमेटमधील वेळोवेळी सुचविलेल्या त्रूटी दुरुस्त करुन देण्यात आल्या असून आता मुंबई येथील मा.मुख्य अभियंता यांचेकडून इस्टिमेट पडताळणी करुन घेणे बाकी आहे.

औरंगाबाद येथे इस्टिमेट पडताळणीचे वेळेस दिनांक ०६-१०-२००६ रोजी तेथील मा.श्री.कावळे साहेब, अधिक्षक अभियंता (विद्युत) सा.बा.विद्युत विभाग, औरंगाबाद व मा.श्री.मांजरे , उप अधिक्षक अभियंता (विद्युत) सा.बा.विद्युत विभाग,औरंगाबाद यांना, मुंबई येथील इस्टिमेट पडताळणीचे काम चालू असताना प्रसादालयाचे इलेक्ट्रीफिकेशाचे काम लवकर चालू व्हावे, याकरीता या कामाचे टेंडर बोलाविण्याची प्रक्रिया आता या काळात संस्थानमार्फत सुरु करणे योग्य राहील काय? याबाबत विचारणा केली असता त्यांनी {(मा.अधिक्षक अभियंता (विद्युत) व मा.उप अधिक्षक अभियंता (विद्युत)} यांनी असे संगितले की, या इस्टिमेट्मधील जवळपास सर्वच दुरुस्त्या केल्या गेल्या आहेत. त्यामुळे मुंबई येथे पडताळणीस जास्त दुरुस्त्या कराव्या लागणार नाहीत असे वाटते. म्हणून संस्थान मार्फत आता जाहिरात देऊन टेंडर बोलाविण्याची प्रक्रिया चालू करण्यास हरकत नाही.

त्यामुळे नविन प्रसादालयाचे बांधकाम प्रगतीपथावर असून या प्रकल्पाचे इलेक्ट्रीफिकेशाचे काम टेंडर बोलाविण्याची प्रक्रिया चालू करणे गरजेचे आहे. मा.अधिक्षक अभियंता(विद्युत) सा.बा.विद्युत विभाग, औरंगाबाद यांनी वेळोवेळी सुचविलेल्या इस्टिमेटमधील त्रूटी दुरुस्त करुन देण्यात आल्यानंतर कामाच्या इस्टिमेट्ची एकुण रक्कम रु. २,९६,५८,२०६.०० ( रु. दोन कोटी शहान्नव लाख अठ्ठावन्न हजार दोनशे सहा मात्र) इतकी झाली आहे.

प्रसादालयाचे इलेक्ट्रीफिकेशन कामाचे टेंडर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागवावे लागणार आहेत. तरी या कामाच्या अंदाजित रु. २,९६,५८,२०६.०० ( रु. दोन कोटी शहान्नव लाख अठ्ठावन्न हजार दोनशे सहा मात्र) इतक्या खर्चास तसेच या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यतादेणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८. श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ रुग्णालय यामध्ये विविध ठिकाणी बसवावे लागणारे ए.सी. खरेदीबाबत**

**निर्णय क्र.८५५.** श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ रुग्णालय यामध्ये विविध ठिकाणी बसवावे लागणारे ए.सी. खरेदीबाबत उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९. संस्थानचे वेबसाईटवर Online Darshan सुविधा सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.८५६.** संस्थानची www.shrisaibabasansthan.org ही अधिकृत वेबसाईट माहे १९९९ पासून सुरु करण्यात आली आहे. या वेबसाईटमध्ये वेळोवळी बदल करुन ती सध्या इंग्रजी, मराठी व हिंदी अशा मुख्य तीन भाषेमधून प्रसारित करण्यात आली आहे. आपल्या अधिकृत वेबसाईटवर सर्व प्रकारच्या भाषेतील श्री साईचरित्र अपलोड करण्यात आले असल्याने, श्री साईभक्तांना त्यांच्या मायबोलीतून श्री साईंचे चरित्राचे पारायण करणे शक्य झाले आहे. संस्थानच्या प्रकाशीत होणारे सर्व साईलीला अंक वेबसाईटवर प्रकाशीत केले जातात. वेबसाईटवर संस्थानच्या विविध उपक्रमांची अद्ययावत माहिती दिलेली आहे. त्याचप्रमाणे श्रींचे मुळ छायाचित्रांसहीत विविध प्रासंगीक सध्याचे छायाचित्रे प्रसारित करण्यात येत असल्याने, श्री साईभक्तांचा आपली वेबसाईट पाहण्यासाठी उत्तम प्रतिसाद लाभत आहे. अशाप्रकारे वेबसाईटवर एक जीबी एवढा डाटा संकलीत करण्यात आला आहे.

संस्थानच्या वेबसाईटला नियमित भेट देणारे साईभक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अशा अनेक श्री साईभक्तांकडून वेळोवेळी मागणी करण्यात येते की, श्री बाबांचे ऑनलाईन दर्शन सुविधा वेबसाईटवर उपलब्ध करुन दिल्यास आम्ही स्वतःला धन्य समजू. अशा प्रकारे श्रींच्या मंदिरामधील दृश्य वेबसाईटवर ऑनलाईन भक्तांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन देणेसाठी संस्थानला मोठ्या प्रमाणात खर्च अपेक्षीत आहे. शिवाय शिर्डीमध्ये बीएसएनएलकडून आवश्यक असणारे कमीत कमी २ Mbps ही लाईन उपलब्ध नसल्याने अशा प्रकारे सेवा संस्थानला स्वतःच्या बळावर वेबसाईटवर उपलब्ध करुन देणे सद्य परिस्थितीत शक्य होत नाही.

श्री साईभक्तांच्या मागणीप्रमाणे संस्थानच्या वेबसाईटवर ऑनलाईन दर्शन सुविधा मोफत उपलब्ध करुन देण्यासाठी VSNL (सध्याची टाटा इंडिकॉम) यांनी दिनांक ०६ ऑक्टोबर, २००६ च्या ई-मेलप्रमाणे संस्थानला चांगला प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

**अ) VSNL (सध्याची टाटा इंडिकॉम) पुरविणार असणाऱ्या सुविधा व त्यावरील खर्च-**

हार्डवेअर खर्च ( उच्च क्षमतेचे कॅमेरे, युपीएस, केबलींग इ.)

शिर्डी ते मुंबई दरम्यान कनेक्टीव्हीटीसाठी येणारा सर्व खर्च.

सर्व्हर / आयडीसी खर्च इ. वरील येणारा सर्व खर्च.

अशा प्रकारे ऑनलाईन दर्शन सुविधा संस्थानच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यासाठीVSNL यांना अंदाजे रुपये १५ ते ४० लाख एवढा खर्च अपेक्षित आहे. हा सर्व खर्च VSNL करणार आहे.

**ब) संस्थानकडून पुरवाव्या लागणाऱ्या सुविधा-**

VSNL यांचा उच्च क्षमतेचा कॅमेरा मंदिरामध्ये लावण्यासाठी जागा व त्याची परवानगी.

कॅमेरासाठी करावी लागणारी केबलींग व इतर साहित्य बसविण्यासाठीची परवानगी.

VSNL यांच्या प्रतिनिधींना हे सर्व साहित्याची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठीची नियमीत परवानगी.

कॅमेरा व इतर सामुग्रीसाठी लागणारा अखंडीत विद्युत पुरवठा.

VSNL यांचे प्रतिनिधी शिर्डीत आल्यानंतर त्यांना राहण्यासाठी व भोजनासाठी संस्थानमार्फत मोफत व्यवस्था करणे.

VSNL यांच्या hhtp://myhome.tataindicombroadband.in या कार्यालयीन वेबसाईटला आपल्या वेबसाईटची लिंक जोडण्याची परवानगी द्यावी जेणेकरुन अधिकाधिक भक्तांपर्यंत ऑनलाईन दर्शनाची (Online Darshan) सुविधा पोहोचण्यास मदत होईल.

VSNL यांचेशी या संबंधीत कमीत कमी तीन वर्षाचा करारनामा करावा लागेल.

वेबसाईटवर भक्तांना ऑनलाईन दर्शन सुविधा VSNL ने आतापर्यंत तिरुपती देवस्थान, सिध्दीविनायक मंदिर, इसकॉन टेम्पल, मुंबई, हाजीआली , मुंबई इत्यादींना उपलब्ध करुन दिलेली आहे. अशाच धर्तीवर संस्थानलाही ऑनलाईन दर्शन सुविधा संस्थानच्या अधिकृत वेबसाईटवर सुरु होणे भक्तांच्या इच्छेनुसार आवश्यक वाटते. यासाठी संस्थानला कोणताही खर्च न करता ही सुविधा VSNL मार्फत त्यांच्या प्रस्तावाप्रमाणे सुरु होऊ शकते.

उपरोक्त परिच्छेदांत नमुद केल्याप्रमाणे संस्थानचे अधिकृत वेबसाईटवर VSNL (सध्याची टाटा इंडिकॉम) यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेसाठी व त्यासाठी VSNL सोबत तीन वर्षाचा करारनामा करण्यास व त्यांना ही सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक ते संस्थानकडून सहकार्य करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०.** **आयकर कायद्यातील तरतूदींन्वये सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**निर्णय क्र.८५७.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यास सर्व माध्यमांव्दारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(सी) (v) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत तरतूदींमध्ये सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारित तरतूद पुढीलप्रमाणे आहे : -

" Provided also that the fund or trust or institution [ or any university or other educational institution or any hospital or other medical institution ] referred to in sub-clause (iv) or sub-clause (v) [ or sub-clause (vi) or sub-clause (VIA) ] applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April-2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५ % उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते शक्य न झाल्यास या ८५ % उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पूर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायदयातील तरतूदीनुसार त्या आर्थिक वर्षासाठी लागू असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

संस्थानचे सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरण आयकर कार्यालयाकडे दि.३१ ऑक्टोबर,२००६ पर्यंत दाखल करावयाचे आहे. सदर आयकर विवरणासोबत सन २००५.०६ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल या बाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक आहे. त्या दृष्टीने अखर्चित उत्पन्न पुढील ५ वर्षामध्ये विविध उपक्रमांवर खर्च करणेविषयी खालीलप्रमाणे निर्णय होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

Shri Saibaba Sansthan Trust is contemplating to take up various project towards the fulfillment of its objects. The execution of these projects would take a period of 4-5 years.

The Trust is likely to generate a surplus for the accounting year ended on 31st March,2006. Such surplus could be expended for the fulfillment of these projects.

It is therefore, recommended that such surplus be set aside out of the surplus for the year, to be spent on the projects as resolved hereinafter.

An application in this regard be also made to the Income Tax Assessing Officer, to set aside the funds in terms of section 11(2) of the Income Tax Act, 1961.

**RESOLUTION**

" Resolved that such surplus as is available for the year ending 31st March,2006 shall be accumulated or set apart as per requirements of section 11(2) of the Income Tax Act, 1961 and shall be spent on the following objects and activities of the Trust :

| Sr. No. | Particulars |
|---|---|
| 1 | To create additional infrastructure of verious services and to reconstruct, renovate, carry out appropriate additions, alterations of existing buildings and provide additional rooms/Lodging facilities to Sai devotees and provide better amenities and services. |
| 2 | To construct additional buildings for educational and medical purposes as well as multipurpose service centers for Sai devotees such as Railway & State Transport, reservation counters facilities, Reading Room and other I.T. services. |
| 3 | To provide audio-visual facilities with appropriate modernisation and install additional devotee facilitation installations/services/ equipments within the temple complex and other various buildings of the Sansthan. |
| 4 | To create additional educational facilities by starting the educational, technical,vocational and professional training facilities,colleges for higher |

| | |
|---|---|
| | education. |
| 5 | To construct additional buildings for multipurpose services, Staff quarters and provide residential accommodations to medical, technical, educational & professional staff of sansthan |
| 6 | To purchase additional & modern medical machinery, Furniture, Equipments, Instruments, apparatus etc. for Hospital, educational purposes and other various departments of the Sansthan. |
| 7 | To purchase Land for development of various projects/ activities of the Sansthan. |
| 8 | Grant-In-Aid to the local infrastructural development works within Shirdi Nagarpanchayat limit i.e. construction and/or upgradation of internal and peripheral roads, sub-ways, Schools, Gardens etc.for Sai devotees. |
| 9 | To provide additional safe water supply by developing new water supply scheme for sansthan & to the increasing local and floating population of Shirdi Town. |

FURTHER RESOLVED THAT an application be made to the Income Tax Office seeking permission U/s 11(2) of the Income Tax Act' 1961 and a copy of this Resolution be provided along with the application for the purpose or their record ." (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११. सी.आर्म (स्टेनोस्कोप-६०००) मशिनचे दुरुस्तीबाबत**

**निर्णय क्र.८५८.** श्रीसाईनाथ रूग्णालयातील ऑपरेशन थिएटर विभागात हाडांच्या शस्त्रक्रीया करताना वापरण्यासाठी सी.आर्म मशिन (मॉडेल-स्टेनोस्कोप-६०००) हे मशिन मे. विप्रो जी.ई.मेडिकल सिस्टिम,मुंबई याचेकडुन सन १९९९ साली रू.१८,६०,०००.०० इतक्या रकमेत खरेदी करण्यात आलेले आहे. सदरचे मशिनने व्यवस्थित काम देण्यासाठी कंपनीकडे दि. ०५/०९/०६ ते दि.१४/०९/०७ या कालावधीकरीता सर्व करांसहित एकुण रु.५०,०००/(अक्षरी रू. पंन्नास हजार मात्र) इतकी रक्कम अदा करून वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात आले आहे. सदर सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत स्पेअर पार्टची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

दि.२३/०९/०६ रोजी कंपनीचे इंजीनीअर त्यांचे रेग्युलर सर्व्हीसींग करीता आले असता त्यांनी मशीनचे एम.पी.एन.मेमरी युनिट (कार्ड) खराब झालेले असल्यामुळे ते तातडीने बदलणे गरजेचे आहे असे सांगीतले.सदर मशीनचे स्पेअर्स पार्ट फक्त में. विप्रो जी.ई.मेडिकल सिस्टिम, मुंबई यांचेकडेच मिळतात. मे. विप्रो जी.ई.मेडिकल सिस्टिम,मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.PUN/Ser/ pare/२००६/१८१ दि.२५/०९/०६ चे अन्वये सदरच्या एम.पी.एन.मेमरी युनिट (कार्ड) चे सर्व करांसहित एकुण रू २,७०,७२५/-(अक्षरी रू.दोन लाख सत्तर हजार सातशे पंचवीस मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठवीले आहे.

तरी सी.आर्म (स्टेनोस्कोप-६०००) मशिनचे एम.पी.एन.मेमरी युनिट (कार्ड) बदलणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू.२,७०,७२५/-च्या खर्चास आणि सदरची रक्कम मे.विप्रो जी.ई.मेडिकल सिस्टिम,मुंबई यांना आगाऊ पाठविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला हाता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२. श्री साईबाबा हॉस्पिटलचे प्रशासकीय कार्यालय व कॉन्फरन्स हॉलबाबत**

**निर्णय क्र.८५९.** सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/बांधकाम विभाप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३. एम.आर.आय.मशिन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.८६०.** श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे एम.आर.आय. मशिन खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १६/०७/२००६ निर्णय क्र. ५२९ अन्वये सदर खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. ३ कोटीचे खर्चास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. निविदा फॉर्म हे दि. १४/०८/२००६ पासून विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येऊन स्विकारण्याची शेवटची मुदत २८/०८/२००६ ठेवण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात दोन निविदांची विक्री होऊन दोन उत्पादक कंपन्याकडून बंद कोटेशन प्राप्त झालेले होते.

मे. इनोव्हेटीव्ह, चंदीगढ

मे. सिमेन्स लि., मुंबई

सदरचे कोटेशन मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १६/०९/२००६ चे सभेपुढे समक्ष उघडण्यात आले होते. याच दिवशी मे. इनोव्हेटीव्ह, चंदीगढ व मे. सिमेन्स लि., मुंबई यांना सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.त्यांचेकडून आलेले मूळ दर व वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (CMC & AMC) इत्यादी बाबतचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला होता व त्यांचेशी झालेल्या चर्चेनुसार त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर दिले होते. दि. १६/०९/२००६ चे सभेत सदर विषयावरील निर्णय मा. व्यवस्थापन समितीचे पुढील

सभेपुढे घेण्यात यावा, असे ठरले होते. त्यानुसार सदरचा विषय आजचे सभेपुढे निर्णयार्थ ठेवण्यात आलेला होता.

**<u>तुलनात्मक दराचा तक्ता-</u>**

| Sr.No | Name of Party | Specification/Model | Quoted rates | Rate after Negotation | Remarks |
|---|---|---|---|---|---|
| 01. | Siements Ltd.Pune | Mgnetom Avento | 7.50 Crore | 5.25 Crore | 2 years Warranty 5 yrs. CMC 20% Advance payment against order & balance payment against proof of dispatch. CMCM Charges Rs 2200000/- for 3rd year & 5% Esclation thereafter. For Magnetom C CMC 1350000/- & amc 350000 & 5% Esclation thereafter + Taxes Extra. |
| | | Magnetom Symphony | 5.75 crore | 4.45 crore | |
| | | Magnetom C(Permant Magnat) | 2.55 Crore | 2.25 Crore | |
| | | OPtional Accessories for above | 1.11 Crore | 1.11 Crore | |
| | | | | | EMD amount is submitted with tender. |
| 02. | Innovative, Chandigarh | Achieva 1.5T. 10 Helium inclueded | 6.25 Crore | 5.55 Crore | 2 yrs. CMC/ 10 yrs. Helium cost. A/C & Electrical work inside MRI Room. AMC Charges 700000/- for 3rd yr. & 5% Escaltion thereafter. CMA 2200000/- Charges for 3rd yr. & 5% Escaltion thereafter. Taxes Extra. |
| | | Achieva 1.5T. 5 year CMC free & 10 Helium & Cold Head inclueded | 6.92 Crore | 5.80 Crore | |
| | | Achieva 1.5T. 5 year CMC free & Maintenance & Helium & Spears inclueded | 6.15 Crore | 6.15 Crore | |
| | | Optional Accessories-Camara CCTV, Monitor Rs 10 lakh, Additional Cost for 16 Channel is Rs 1 Crore. | 1.10 Crore | 1.10 Crore | |
| | | | | | No EMD amount is submitted with tender. |
| | | | | | All Electrical False Celing, A.C. work is inclueded in above. |

दिनांक १६.९.२००६ चे सभेत ठरलेप्रमाणे मे.सिमेन्स लि.मुंबई व मे.इनोव्हेंटीव्ह,चंदीगढ यांना आजचे सभेपुढे फेर चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यापैकी मे.सिमेन्स लि.मुंबई हे आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी उपसिथत होते त्यांचेशी Mgnetom Avento 1.5 T या मॉडेलबाबत चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्यनंतर त्यांनी दिनांक १६.९.२००६ चे सभेत दिलेल्या दरानंतर अजून सूट दिली आहे ती खालीलप्रमाणे -

| Sr.No | Name of Party | Specification/Model | Quoted rates | Rate after Negotation | Remarks |
|---|---|---|---|---|---|
| 01. | Siements Ltd.Pune | Mgnetom Avento | 7.50 Crore | 5.05 Crore | 2 years Warranty 5 yrs. CMC 20% Advance payment against order & balance payment against proof of dispatch. CMCM Charges Rs 2200000/- for 3rd year & 5% Esclation thereafter. For Magnetom C CMC 1350000/- & amc 350000 & 5% Esclation thereafter + Taxes Extra. |
| | | Magnetom Symphony | 5.75 crore | 4.45 crore | |
| | | Magnetom C(Permant Magnat) | 2.55 Crore | 2.25 Crore | |
| | | OPtional Accessories for above | 1.11 Crore | 1.11 Crore | |
| | | | | | EMD amount is submitted with tender. |
| 02. | Innovative, Chandigarh | Achieva 1.5T. 10 Helium inclueded | 6.25 Crore | 5.55 Crore | 2 yrs. CMC/ 10 yrs. Helium cost. A/C & Electrical work inside MRI Room. AMC Charges 700000/- for 3rd yr. & 5% Escaltion thereafter. CMA 2200000/- Charges for 3rd yr. & 5% Escaltion thereafter. Taxes Extra. |
| | | Achieva 1.5T. 5 year CMC free & 10 Helium & Cold Head inclueded | 6.92 Crore | 5.80 Crore | |
| | | Achieva 1.5T. 5 year CMC free & Maintenance & Helium & Spears inclueded | 6.15 Crore | 6.15 Crore | |
| | | Optional Accessories-Camara CCTV, Monitor Rs 10 lakh, Additional Cost for 16 Channel is Rs 1 Crore. | 1.10 Crore | 1.10 Crore | |
| | | | | | No EMD amount is submitted with tender. |
| | | | | | All Electrical False Celing, A.C. work is inclueded in above. |

निविदा मागवितांना टर्नकीचे कामासह निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतू मे.सिमेन्स लि.मुंबई यांनी टर्नकीचे कामाचे दर दिलेले नसल्याने वरील दर हे टर्नकीचे कामाव्यतिरिक्त असल्याचे त्यांनी सभेपूढे सांगितले.

टर्नकीचे कामासाठी मे.सिमेन्स इंडिया लि.मुंबई यांचेकडून दर मागवून घेण्यात येऊन ते व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावे.

मे.सिमेन्स लि.मुंबई यांनी मशिनरीची किंमत रुपये ५.०५ कोटी इतकी दिली आहे. याशिवाय कंपनी दोन वर्षाची वॉरंटी देणार असून त्यानंतर तिसऱ्या वर्षापासुन कंपनीस (CMC) चार्जेस रुपये २० लाख तर त्यापुढील वर्षासाठी ५% वाढ (Escalation ) + सर्व्हीस टॅक्स वेगळा देण्यात यावा. सदर CMC चे दर हे एम.आर.आय या मशिनसाठी लागणारे Helium gas सह आहे. मे.सिमेन्स लिमिटेड,मुंबई यांना पुरवठा आदेशासोबत २०% ॲडव्हान्स पेमेंट देण्यात येऊन उर्वरित पेमेंट त्यांचेकडून मशिन मुंबई येथे प्राप्त झाल्यानंतर लॉरी रिसीट प्राप्त झालेनंतर अदा करण्यात यावे व मे.सिमेन्स लि.मुंबई यांना एम.आर.आय मशिन पुरवठा आदेश देण्यात यावा, तसेच याशिवाय सदर मशिनसाठी लागणाऱ्या पर्यायी अतिरिक्त ॲक्सेसरीज याबाबत रुग्णालयाचे रेडिओलॉजिस्ट यांचा सल्ला घेऊन त्यास मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांची मान्यता घेऊन आवश्यकतेनुसार ॲक्सेसरीज खरेदी करण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १४. मशिनरी/उपकरणे/हत्यारे खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणे बाबत**

**निर्णय क्र.८६१.** श्रीसाईबाबा आणि श्री साईनाथ रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे मशिनरी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०८.२००६ चे सभेत प्लास्टीक सर्जरी इन्ट्रुमेंट , इक्वीपमेंट, फिजीओथेरपी मशिनरी / उपकरणे, एक्स-रे मशिन बायबॅक ऑफर , इ.एन.टी इन्स्टुमेंट तसेच साईबाबा रुग्णालयासाठी लागणाऱ्या मशिनरी उपकरणे खरेदीस निर्णय क्रमांक ५३५(१),५३५(९),५४८, ५७५,६४३ अन्वये खालीलप्रमाणे मशिनरी /उपकरणे/हत्यारे खरेदीस अंदाजे रु.२,२५,७३,५१०.०० च्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | विषय | अंदाजे रक्कम |
|---|---|---|
| १ | फिजिओथेरपी विभागासाठी उपकरणे / साहित्य खरेदी बाबत. | ४१,१०,०१०.०० |
| २ | प्लॅस्टिक सर्जरीसाठी मशिनरी साहित्य / हत्यारे इ.खरेदी बाबत. | २०,००,०००.०० |
| ३ | क्ष-किरण मशिन खरेदी बाबत. | ३०,००,०००.०० |
| ४ | इ.एन.टी. शस्त्रक्रिया करणेसाठी मशिनरी /उपकरणे /हत्यारे खरेदी बाबत. | ३५,०१,०००.०० |
| ५ | मशिनरी /उपकरणे खरेदी | ९९,६२,५००.०० |
| | **अंदाजे एकुण किंमत** | **२,२५,७३,५१०.००** |

वरील प्रमाणे त्यानुसार विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०७.१०.२००६ अखेर बंद पाकिटात निविदा मागविण्यात आले होते. सदरच्या मशिनरी / उपकरणे / हत्यारे खरेदी साठी मुंबई कार्यालयाकडून १० व शिर्डी येथील कार्यालयात २ अशा एकुण खालीलप्रमाणे १२ अधिकृत विक्रेते / कंपन्यांचे सिलबंद निविदा प्राप्त झालेले आहे.

| अ.नं. | पार्टीचे नांव | अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|---|---|
| १ | बी.पी.एल.लि.,मुंबई | २ | इसबी डायनामेड प्रा.लि,मुंबई |
| ३ | हीन्टेक इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि.,दिल्ली | ४ | सिमॅडझु प्रा.लि.,मुंबई |
| ५ | श्री वेंकटेस सर्जीकल,मीरज | ६ | बायो-टेक,मुंबई |
| ७ | रेकॉर्डर्स अॅण्ड मेडीकेअर सिस्टीम प्रा.लि.,चंदीगड | ८ | बी.एल.लाईफ सायन्स प्रा.लि.,दिल्ली |
| ९ | बायोमेडीकॉन सिस्टीम प्रा.लि.,मुंबई | १० | नितिश डिस्ट्रीब्युटर्स प्रा.लि.,मुंबई |
| १० | गाफीक डिव्हासेस,मुंबई | १२ | मेडटेक,मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५. मा.उपाध्यक्ष साहेब यांचेकरीता नवीन वाहन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.८६२.** सदरहू विषय मागे घेण्यात आला.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६. श्रींना पाणी पिण्यासाठी "सुवर्ण झारी" देणगीदाखल स्विकारणे बाबत.**

**निर्णय क्र.८६३.** समाधी मंदिरात दुपारी माध्यान्ह आरतीचे वेळी श्रींना पाणी पिण्यासाठी चांदीची झारी ठेवण्यात येते. आरतीनंतर सदर झारीतून चांदीच्या फुलपात्रात पाणी घेऊन श्रींच्या मुखाजवळ नेऊन पाणी पाजण्याचा विधी पूर्ण करण्यात येतो. त्याचप्रमाणे रात्री शेजारतीपुर्वी सदर झारी पाण्याने भरुन त्यावर चांदीचे फुलपात्र झाकुन ठेवण्यात येते.सदर झरी रात्रभर श्रींचे समाधीवर ठेवण्यात येते व सकाळी काकड आरतीनंतर समाधीवरुन खाली घेण्यात येऊन झारीतील पाण्याचा तीर्थ म्हणून वापरण्यात येते.

सदर नक्षीच्या चांदीच्या झारीचे वजन १ किलो ४८३ ग्रॅम आहे. साईभक्त श्रीर बी.विजयकुमार,हैद्राबाद यांनी त्यांचे दिनांक १३.१०.२००६ चे पत्रान्वये त्यांचे वडील कै.बी.आर मोहनराव यांचे स्मरणार्थ सोन्याची २८०० ग्रॅम वजनाची झारी बनविली असून सदर झारी श्री साईबाबांना देणगी दाखल देण्याची इच्छा प्रदर्शित केली असून ती स्वीकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मंदिर विभागप्रमुख)

**दिनांक १४.१०.२००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापूरती नक्कल-**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७. अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचेस उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.८६४.** शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद अहमदनगर यांनी त्यांचे दि.२८/०९/२००५ चे पत्रान्वये "अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अधिनस्त एकूण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा २९३४ (सोबतच्या तक्त्यानुसार) असून सदर शाळेमध्ये एकूण विद्यार्थी ३३०४८५ असून सदर विद्यार्थ्यांना बसण्यासाठी (एका बेंचेसवर दोन विद्यार्थी) या प्रमाणे १६५२४३ अवश्यकता असुन एका बेंचची किंमत अंदाजे रुपये २१००/- असुन १६५२४३ बेंच खरेदीसाठी अंदाजे रक्कम रु.३४,७०,१०,३००/- खर्च अपेक्षित आहे.

सदरची योजना ही टप्याटप्याने राबविण्यासाठी प्रथम टप्यात खालीलप्रमाणे खर्च येईल. अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अधिनस्त इयत्ता १ ली ते ७ वीच्या वरिष्ठ ५६२ शाळांतील १३०३०५ विद्यार्थ्यांना (एका बेंचवर दोन विद्यार्थी) या प्रमाणे ६५१५३ डयुएल डेक्सची आवश्यकता असुन एका बेंचची अंदाजे किंमत रुपये २१००/- असुन ६५१५३ बेंच खरेदीसाठी अंदाजे रु.१३,६८,२१,३००/- अपेक्षित आहे.

द्वितीय टप्यात जिल्हा परिषदेच्या अधिनस्त असलेल्या एकुण २३७२ प्राथमिक शाळांमधील २००१८० विद्यार्थ्यांना (एका बेंचवर दोन विद्यार्थी) या प्रमाणे १०००९० डयूएल डेक्सची आवश्यकता असुन एका बेंचची अंदाजे किंमत रु.२१००/- असुन १०००९० बेंच खरेदीसाठी अंदाजे रु.२१,०१,८९,०००/- अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अधिनस्त असलेल्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी डयुएल डेक्स उपलब्ध करुन दिल्यास ग्रामिण भागातील जिल्हा परिषद प्राथमीक शाळेतील विद्यार्थ्यांचा खाजगी शाळेत जाणेचा ओढा कमी होऊन जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे उपस्थितीचे प्रमाण वाढेल. असे कळविलेले आहे.

त्यास अनुसरुन, दि.२८/०९/२००५ चे पत्रान्वये मा.अध्यक्ष,श्री जयंत ससाणे,यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना "जिल्हा परिषद अहमदनगर यांनी एकुण २९३७ शाळेतील एकूण ३३०४८५ विद्यार्थ्यांना (एका बेंचेसवर दोन विद्यार्थी) या प्रमाणे १६५२४३ बेंचेस खरेदीसाठी एका बेंचला रुपये २१००/- याप्रमाणे १६५२४३ बेंच खरेदीसाठी अंदाजे रक्कम रु.३४,७०,१०,३००/- खर्च अपेक्षित असल्याचे दर्शविलेले आहे. सदरचे काम टप्याटप्याने हाती घेता येईल. सदर एकुण खर्चापैकी रुपये १० कोटी मात्रचे बेंचेस ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरीता जिल्हा परिषद अहमदनगर यांना सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून देण्याचा संस्थानचा मानस आहे. अशा उपक्रमास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१(२) (एक) (अध्यादेशान्वये सुधारित) मधील तरतुदीन्वये राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे. तरी सदरचे प्रस्तावास मान्यता मिळावी अशी विनंती केलेली आहे.

मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे दि.१४/११/२००५ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती मागविलेली आहे : -

अ) सदर प्रस्तावास व्यवस्थापन समितीची मान्यता आहे काय?

ब) जिल्हा परिषद हे निमशासकीय कार्यालय आहे. सदर जिल्हा परिषदेस शाळेकरीता बेंचेस उपलब्ध करुन देण्याकरता शासनाकडुन अनुदान मिळते किंवा कसे ?

क) जिल्हा परिषद,अहमदनगर यांच्या बेंचेस बाबतच्या प्रस्तावाची प्रत पाठवावी.

ड) जिल्हा परिषद शाळांना सदर बेंचेस कोण उपलब्ध / तयार करुन देणार आहे.

इ) बेंचेस बाबतच्या रु.१० कोटी खर्चाचे शाळानिहाय तपशिलवार विवरण पत्र पाठवावे.

असे कळविलेले आहे.

तरी सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळणेस तसेच जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडुन वरीलप्रमाणे माहिती प्राप्त करुन, शासनास पाठविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८. तीनचाकी सायकल वाटपाचे नियमावलीत अपंगाचे उत्पन्नाचे व वयाची मर्यादेबाबत.**

**निर्णय क्र.८६५.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था समितीचे दि.०४/०२/२००६ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.८७ " संस्थानमार्फत अहमदनगर जिल्हयातील अपंगांना ३००० तीन चाकी सायकली देणेकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी व त्यासाठी नियमावली तयार करण्यात यावी, " असा पारित झालेला आहे.

यास अनुसरुन इकडील जा.नं.एसएसएस ,वशी-३/३७१६/०६,दि.१५/०३/२००६ चे पत्रान्वये अहमदनगर जिल्हयातील अपंगांना ३००० (तीन हजार ) तीन चाकी सायकल वाटपास मान्यता मागविण्यात आली होती त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासन पत्र.क्र.सासंवि-२००६/२७४/(३६)-का सोळा,विधी व न्याय विभाग,मुंबई दि.२९/०६/२००६ अन्वये -

अ) अपंगांना सायकली पुरविण्याबाबत नियमावली तयार करुन शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्या सदर लाभ घेऊ इच्छिणा-या व्यक्तीला अपंगात्वाचा दाखला कोणी दिलेला असणे आवश्यक आहे हे स्पष्टपणे नमुद केलेले असावे. त्याचप्रमाणे सदरहू व्यक्तीचे कायमचे राहण्याचे ठिकाण कोणते? त्यास सदर तीन चाकी सायकलीचा निश्चितपणे उपयोग होणार आहे किंवा कसे याबाबतचे तज्ञांचे अभिप्राय घेणे,इत्यादी बाबी अंतर्भूत असाव्यात.

ब) एका विशिष्ट कालावधीनंतर लाभार्थी अपंगांना निमावलीच्या अधिन राहून प्रत्येक वेळी संस्थानमार्फत १०० (शंभर) सायकलींचे वाटप करण्यात यावे. सदर लाभार्थींची यादी अर्जा सोबत प्राप्त झालेल्या कगदपत्रांच्या प्रतींसह प्रत्येक वेळी शासनास सादर करावी, असे निर्देश दिलेले आहेत.

शासनाचे पत्र व समाजकल्याण विभाग मुंबई यांचे माहिती पुस्तकातील नियमावलीसे अनुसरुन खालीलप्रमाणे नियमावली तयार करणेत आलेली आहे.

१. मा.तहसिलदार यांचेकडील रु.१८,०००/- पर्यंतचा उत्पन्नाचा दाखला.

२. जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडील, अपंग हा दोन्ही पायांनी निकामी असल्याचा दाखला.

३. अपंगाचे वय १८ वर्ष पुर्ण असलेचा दाखला.

४. रहिवासी दाखला . (ग्रामसेवक,नगरपालिका,महानगरपालिका)

५. जिल्हा समाजकल्याण कार्यालयाकडुन सायकल मिळाली नसलेचा दाखला.

६. अपंगाचा पुर्ण फोटो.

७. अर्जदार दोन्ही पायांनी अपंग असुन त्यांचे हात तीन चाकी सायकल चालविण्यास सक्षम आहेत. ते .......... हा व्यवसाय करीत असुन त्यांना व्यवसायाकरीता जाणे-येणेसाठी सायकलची गरज आहे. तरी अर्जदारास तीन चाकी सायकल देण्यात यावी असा. ग्रामसेवक, तलाठी किंवा मुख्याधिकारी नगरपालिका, यांचेकडील दाखला.

सदरचे नियमावलीस शासनाची मान्यता घेणे आहे.

तथापी (१) शासनाकडील वार्षिक उत्पन्न मर्यादा रु १८,०००/-ही खुपच अत्यल्प असल्यामुळे अनेक गरजु अपंगांना संस्थानकडुन तीन चाकी सायकल देता येत नाही. करीता सदरची उत्पन्न मर्यादा रु. ३०,०००/- पर्यंत वाढवावी. तसेच (२) इयत्ता ८ वी व त्यापुढील वर्गात शिकणा-या विद्यार्थ्यास तीन चाकी सायकल दिल्यास त्याला शिक्षणासाठी उपयोग होईल म्हणुन वयाची मर्यादा १२ वर्ष पुर्ण अशी ठेवण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९. श्री विरभद्र बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांकरीता रु.५०,०००/- मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.८६६.** श्री हरिभाऊ हेमाजी बनकर, अध्यक्ष, श्री विरभद्र यात्रा कमिटी, शिर्डी (बिरेगांव बन) व विरभद्र दल , रा.बन, यांनी त्यांचे दिनांक १२/१०/२००६ रोजीचे अर्जात विरभद्र यात्रा हि दि.०३/११/२००६ ते दि.०५/११/२००६ अखेर बिरोबा बन, शिरडी येथे मोठया थाटात भरणार असून यात दि.०५/११/२००६ रोजी कुस्त्या हंगामाही भरवला जाणार आहेत, या कुस्त्यांसाठी वाटण्यासाठी म्हणून रु.५०,०००/- ची आर्थिक मदत स्वतः संस्थानचे अधिका-यांचे हस्ते रविवार, दि.०५/११/२००६ रोजी दुपारी ३.०० ते ६.०० चे दरम्यान वाटावेत अशी नम्र विनंती करण्यात आलेली आहे.

कुस्त्यांसाठी म्हणून संस्थानमार्फत फक्त श्री रामनवमी उत्सवातच रु.५०,०००/- इतकी रक्कम देत असते. त्यावेळी संस्थानचे प्रतिनिधी म्हणून लेखाशाखेतील कर्मचारी मदतीसाठी असतात. श्री रामनवमी उत्सवातील प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी नियुक्त करुन रक्कम वाटता येईल. मागील वर्षी मागील वर्षी दि.०५/११/२००५ रोजीचे शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७१२ अन्वये संस्थानमार्फत कुस्त्यांसाठी म्हणून रु.५०,०००/- मात्रची रक्कम लेखाशाखेमार्फत वाटण्यात आलेली होती.

अर्जदारांनी साध्या कागदावर विनंती अर्ज केलेला आहे. सदर कमिटीचे लेटरहेड नसुन सदरची कमिटी शासनमान्य नोंदणीकृत केलेली नाही. तसेच सध्या आचारसंहिता लागु असलेने कुस्ती हंगामासाठी आर्थिक मदत देणेबाबतचा विचार धोरणात्मकरित्या घेणे आवश्यक आहे.

तथापि दि.०३/११/२००६ ते दि.०५/११/२००६ अखेर होणा-या विरभद्र यात्रेतील रविवार, दि.०५/११/२००६ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हंगामासाठी रु.५०,०००/- (अक्षरी रु.पंन्नास हजार मात्र) रक्कम श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०. महाराष्ट्रातील स्वतंत्र्य सैनिकांच्या मेळाव्या करीता आर्थिक अनुदान मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.८६७.** दिनांक १४ नोव्हेंबर,२००६ रोजी अहमदनगर येथे महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांच्या भव्य मेळाव्यास आर्थिक अनुदान मिळणेबाबत श्री बन्सीलाल कोठारी यांनी केलेली विनंती अमान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१. शिधा सामुग्री मिळणेबाबत सौ.विमल बाबासाो शेटे, अध्यक्षा, शेटेवाडी महिला मंडळ व ग्रामस्थ मंडळ देवळाली प्रवरा यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.८६८.** खालील समितीने मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | सौ.विमल बाबासाहेब शेटे, अध्यक्षा, शेटेवाडी महिला व ग्रामस्थ मंडळ, देवळाली प्रवरा, मु. पो. देवळाली प्रवरा, जिल्हा-अहमदनगर | दि.०९/१० ते दि.१६/१०/०६ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व देवभक्त (वर्धापन दिन) सोहळा कार्यक्रम होणार असून महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | महाप्रसादासाठी शिधारुपी मदत मिळणेबाबत पत्र. |

आजतागायत संस्थानमार्फत धार्मिक /सामाजिक कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे स्वरुप पाहुन रु.११,००० ते १,००,०००/- पर्यंत शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

सौ.विमल बाबासाहेब शेटे, अध्यक्षा, शेटेवाडी महिला व ग्रामस्थ मंडळ, देवळाली प्रवरा, मु. पो. देवळाली प्रवरा, जिल्हा-अहमदनगर यांनी शिधा मिळणेबाबत पहिल्यांदाच मागणी केलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण )(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याणाचे उदात्त कार्यास चालना देईल, अशी तरतुद आहे. त्यानुसार सद्या संस्थानमार्फत शिधा स्वरुपातील मदत देण्यात येत आहे.

तरी सौ.विमल बाबासाहेब शेटे, अध्यक्षा, शेटेवाडी महिला व ग्रामस्थ मंडळ, देवळाली प्रवरा, मु. पो. देवळाली प्रवरा, जिल्हा-अहमदनगर यांना दि.०९/१० ते दि.१६/१०/०६ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व देवभक्त (वर्धापन दिन) सोहळा कार्यक्रम होणार असून रु. ५,०००/- (अक्षरी रु. पांच हजार मात्र) रकमेपर्यंतची महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२. संस्थान कर्मचाऱ्यांसाठी समुह जनता अपघात विमा योजना लागू करणेबाबत.**

**निर्णय क्र.८६९.** गुंतागुंतीची दिनचर्या,वेगवान प्रवास व त्यामुळे वाढते अपघात यामुळे सर्वसाधारणतः जीवन असुरक्षीत होत आहे.त्यातच एकत्रीत कुटुंब पध्दतीने विघटन होत असुन कमवत्या व्यक्तीचे व पर्यायाने संस्थान कर्मचा-यांचे कुटुंब प्रमुख म्हणून वैयक्तीक जबाबदारी अधिकाअधिक वाढत आहे.वाढत्या जबाबदा-या पूर्ण करण्यासाठी होणा-या धावपळीमुळे या कर्मचा-याची जोखीम ही वाढत आहे.कर्मचा-यांचे कुटुंबामध्ये कुटुंबप्रमुख व कमवता घटक बहुतेक तो स्वतः आहे.त्यामुळे कर्मचा-याला व्यक्तीगत कुटुंबाच्या भविष्याची मोठी काळजी असतांना ती पुरेशा तन्मयतेने व उत्साह एकाग्रतेने त्याला नेमून दिलेल्या कामामध्ये सहभागी होऊ शकणार नाही.त्यामुळे त्याच्या कुटुंबाच्या भविष्यकालीन आर्थिक सुरक्षिततेविषयी काही योजना राबविणे आवश्यक ठरते.

याबाबत पूर्वीच्या मा.विश्वस्त मंडळाचे कार्यकालात दि.२२-१०-२०००चे सभेतील निर्णय क्रं.४४४(२) अन्वये "समुह जनता अपघात योजना" राबविण्यात आलेली आहे.किमान आर्थिक भार व अधिक अधिक अर्थिक संरक्षण या दृष्टीने"समुह जनता अपघात योजना"अत्यंत सुयोग्य अशी आहे.ही योजना संस्थानचे अस्थापनेवर असणा-या सर्व ११०० कर्मचा-यांसाठी लागू करण्यात आलेली आहे.सर्वसाधारणपणे चारही राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांची स्पर्धात्मक दरपत्रके मागवुन न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी,शाखा श्रीरामपूर यांना रु.१६१/-प्रती व्यक्ती या न्युनतम दराने पाच वर्षासाठी दि.३१-१०-२००५ अखेर देण्यात आले होते.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे पुर्व मान्यतेने १०५० कायम संस्थान कर्मचा-यासाठी प्रत्येकी रु.५३/- या दराने एक लाख विम्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.सदरची मुदत दि.३१-१०-२००६ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील पाच वर्षासाठी संस्थान अस्थापनेवरील कायम कर्मचा-यांना विमा संरक्षण देण्यासाठी इकडील जा.नं.एसएसएस /वशी-७ए/१३६९४/२००६ दि.०४-१०-२००६ अन्वये खालील विमा महामंडळाच्या अंगीकृत कंपन्याकडून दरपत्रके मागविण्यात आले होते.

| | |
|---|---|
| ०१)युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी,शाखा राहूरी | ०२)युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी,शाखा श्रीरामपूर |
| ०३)दि ओरएंटल इंडिया कंपनी,शाखा-कोपरगांव | ०४) नॅशनल इन्शुरन्स कंपनी,शाखा-कोपरगांव |
| ०५)न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी,शाखा-श्रीरामपूर | |

खालील विमा कंपन्यानी त्यांची दरपत्रके इकडेस सादर केलेली आहे.त्यांनी त्यांचे नावासमोर दर्शविलेप्रमाणे प्रतीमाणसी दर सादर केलेले आहेत.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | प्रतिमाणसी दर १ लाख रक्कमेसाठी | |
|---|---|---|---|
| | | एक वर्षासाठी | पाच वर्षासाठी |
| १ | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी,शाखा राहूरी | रु.५१ | रु.२०४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी,शाखा-शिर्डी | रु.४६.५० | रु.१८६ |
| ३ | दि न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि.शाखा-राहुरी | रु.५२ | रु.२१० |
| ०४ | दि ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी,शाखा-संगमनेर | रु.६० | रु.१८६ |
| ०५ | न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी,शाखा-श्रीरामपूर | रु.५२.७३ | रु.२१०.९० |

ही योजना लागु झालेनंतर ५ वर्षपर्यंत दि.०१-११-२००६ ते दि.३१-१०-२०११या कालावधीत प्रत्येक संस्थान कर्मचा-यांसाठी रुपये एक लाख चे अपघात विमा संरक्षण लागु राहील.तसेच वरिल अ.नं.२,४,५ यांचे पत्रानुसार अपघाती अपंगत्व येणा-या व्यक्तीस देखील विमा संरक्षण दिलेले आहेत

सध्याचे संस्थान कर्मचारी अधिक श्री साईबाबा रुग्णालयाकडील नव्याने नेमलेल्या कर्मचा-याचा समावेश होणे आवश्यक आहे.

उपरोक्त निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. सभेने उपस्थित सर्व निविदासादरकर्त्यांना एकत्रित सभागृहात बोलावून त्यांना त्यांनी देऊ केलेल्या समूह जनता अपघात योजना दराबरोबर संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबितांना मेडिक्लेम विमा योजना लागू करावयाची असल्याने समूह जनता अपघात योजना व मेडिक्लेम बाबत सुधारित दर देणेबाबत सांगणेत आले.

निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या उपरोक्त सुधारित दराबाबत उपसमितीचे सभेत चर्चा/वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३.श्री कोते मिनीनाथ भाऊसाहेब यांना प्रयोगशाळा सहाय्यक पदावर नेमणूक मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.८७०.**सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४. मा.विश्वस्तांचे निवासव्यवस्थेबाबत.**

**निर्णय क्र.८७१.** मा.विश्वस्त शिरडी अथवा मुंबई येथे व्यवस्थापन समितीच्या सभेसाठी अथवा संस्थान कामासाठी येतात. त्यावेळी त्यांची निवास व प्रसादभोजन व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते.

संस्थानचे विद्यमान विश्वस्त मिटींग भत्ता-मानधन घेत नाहीत हे विचारात घेऊन सभेमध्ये अशी चर्चा झाली की मा.विश्वस्त व त्यांचे कुटूंबिय (आई-वडील,पत्नी,मुलगा-सुन नातवंडे) इ.व्यवस्थापन समितीचे बैठकीचे व्यतिरिक्त शिडी येथे येतील अशा वेळी त्यांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत विनामूल्य करण्यात यावी. तसेच संस्थान विश्वस्तांमार्फत संस्थान निवासस्थान पुरविणेबाबत प्रसंगी काही नातेवाईकांसाठी शिफारस करण्यात येते त्यांना संस्थान नियमानुसार, सेवाआकार घेऊन निवासस्थाने उपलब्धतेनुसार निवासासाठी देण्यात यावीत. मात्र तीन तासांपेक्षा कमी वास्तव्य असल्यास अशावेळी मा.विश्वस्तांनी शिफारस केलेल्या त्यांचे नातेवाईकांकडून सेवाआकार घेण्यात येऊ नये.

सदर निर्णयाची कार्यवाही दिनांक १.९.२००४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक, प्रसादलय/अधिक्षक चौकशी व निवासस्थान/धर्मशाळा प्रमुख/जनसंपर्क अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २५ साईआश्रम व साईविश्राम प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट फी बाबत**

**निर्णय क्र.८७२. (अ)**शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई, तामीळनाडू यांचेमार्फत साईभक्तांच्या निवासाकरीता साईआश्रम तसेच वृध्दांसाठी वृध्दाश्रम व अनाथांसाठी अनाथाश्रम साईविश्राम तसेच ध्यानासाठी साईध्यान प्रकल्प देणगी स्वरुपात बांधकाम करुन देणार आहेत. याबाबत संस्थान व शिर्डी साई ट्रस्ट यांचेमध्ये करार झालेला आहे. या प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट नेमणूकीबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४ मार्च, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १७४ खालीलप्रमाणे झालेला आहे :

" .. यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांनी हॉल व खोल्या यांचा सुधारीत आराखडा व एस्टिमेट तयार करावे व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांना सदर प्रकल्पासाठी १.५% फि + सर्व्हीस टॅक्स व येण्या-जाण्याच्या खर्चाची प्रतीपूर्ती देण्यात यावी, असे ठरले. "

उपरोक्त निर्णयानुसार, डि.ओ.निकम, आर्किटेक्ट, पुणे यांनी शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेशी संपर्क साधून विषयांकित प्रकल्पाचे कामकाज सुरु केलेले आहे.

**(ब)** कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी त्यांचे दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजीचे फॅक्स पत्राव्दारे खालीलप्रमाणे कळविलेले आहे :

०१. शिर्डी साई ट्रस्ट यांचे दिनांक २१ फेब्रुवारी, २००६ रोजीचे पत्रान्वये डि.ओ.निकम, पुणे यांनी साईआश्रम प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. डि.ओ.निकम आर्किटेक्ट यांना त्यांच्या कार्यकक्षेसाठी १.५% आर्किटेक्ट फी + सर्व्हिस टॅक्स देण्यात यावा, असे ठरलेले आहे. या आर्किटेक्ट फी मध्ये बांधकामाच्या अनुषंगाने येणाऱ्या सर्व कामांचा समावेश आहे. त्यावेळी ठरलेल्या कामांची कार्यकक्षा (Scope of Work) शिर्डी साई ट्रस्ट यांनी उपरोक्त पत्रासोबत आर्किटेक्ट यांना दिलेली आहे.

०२. डि.ओ.निकम, आर्किटेक्ट यांनी ट्रस्टला असे कळविले आहे की, साईआश्रम प्रकल्पाच्या प्रोजेक्ट मॅनेजमेंटचे काम करण्यास इच्छुक नाही. मात्र प्रोजेक्ट मॅनेजमेंटचे काम पाहावयाचे असेल तर त्यासाठी अतिरिक्त फी द्यावी लागेल. ट्रस्ट ही विनंती मान्य करु शकत नाही, कारण इतर आर्किटेक्टस् १.५% आर्किटेक्ट फीमध्ये प्रोजेक्ट मॅनेजमेंटचे कामासह काम करणेस इच्छुक आहेत.

०३. डि.ओ.निकम, आर्किटेक्ट यांना प्रकल्पाचे मोठे स्वरुप पाहून १.५% आर्किटेक्ट फी ही प्रोजेक्ट मॅनेजमेंट फीसह देण्यात आलेली आहे. जर प्रोजेक्ट मॅनेजमेंट फी या आर्किटेक्ट फीमध्ये समाविष्ट नसेलतर, ते करणार असलेल्या कामाच्या प्रमाणात आर्किटेक्ट फी कमी करण्यात यावी. यासाठी ट्रस्ट खालीलप्रमाणे सुचवित आहे :

१. डि.ओ.निकम,आर्किटेक्ट यांचे कामाचे कार्यक्षेत्रातून प्रोजेक्ट मॅनेजमेंट काम वगळून, कामाची कार्यकक्षा कमी करण्यात यावी.

संपूर्ण प्रकल्पाची किंमत रुपये ८०-९० कोटी मात्र गृहीत धरुन संस्थानने एकरकमी स्वरुपात आर्किटेक्ट फी ठरवावी.

विषयांकित प्रकल्पासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंटची स्वतंत्ररित्या नेमणूक करण्यात यावी. प्रोजेक्ट मॅनेजमेंटच्या कार्यकक्षेमध्ये प्रकल्प सुरु होऊन संपेपर्यन्त कामावर पर्यवेक्षण, कामाचा दर्जा, परिमाण, किंमत निश्‍चिती आणि कामाचे कालावधीचे नियोजन याचा समावेश असावा. यानुसार त्यांचे कामाची कार्यकक्षा व फी ठरविण्यात यावी.

**(क)** उपरोक्त परिच्छेद ब मध्ये विवेचन केल्यानुसार, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत राबविण्यात येत असलेल्या विषयांकित प्रकल्पासाठी स्वतंत्ररित्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंटची नेमणूक करणेस, तसेच त्यांचे कार्यकक्षेमध्ये प्रकल्प सुरु होऊन संपेपर्यन्त संपूर्ण कामावर पर्यवेक्षण, कामाचा दर्जा, परिमाण व किंमत निश्‍चिती, काम नियोजित वेळेत पूर्ण करणेसाठी कामाच्या वेळेचे नियोजन इत्यादी बाबींचा समावेश करणेस मान्यता असावी.

डि.ओ.निकम, पुणे यांची विषयांकित प्रकल्पासाठी ठरविण्यांत आलेली आर्किटेक्ट फी त्यांचे कामाच्या कार्यकक्षेतून प्रोजेक्ट मॅनेजमेंटचे काम वगळणेत आल्याने प्रकल्पाची अंदाजित किंमत आधारभूत धरुन त्याप्रमाणात आर्किटेक्ट फी कमी करण्यास मान्यता असावी. याकामी आर्किटेक्ट डि. ओ. निकम, पुणे यांचेशी समक्ष चर्चा करणेत यावी, असे नम्र मत आहे.

विषयांकित प्रकल्पासाठी स्वतंत्ररित्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट नेमणेसाठी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त परिच्छेद क मध्ये नमुद केलेल्या बाबींवर निर्णय होणेकामी मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला होता.

यावर साधक-बाधक चर्चा होऊन, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत साईभक्तांसाठी साईविश्राम व साईआश्रम या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या मुख्य इमारतींचे बांधकाम करणेसाठी संस्थानमार्फत जमीन उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत करण्यात येणारे अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी, विद्युत, संरक्षक भिंत, बाग-बगीचा आदि पायाभूत सोयी-सुविधा ह्या श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत स्वतंत्ररित्या विकसित करण्यांत येणार आहेत. या प्रकल्पासाठी नेमण्यात आलेले आर्किटेक्ट डि.ओ.निकम यांचेशी वर नमुद केल्याप्रमाणे आर्किटेक्ट फीबाबत समक्ष चर्चा करुन त्यांची आर्किटेक्ट फी कमी करणेत यावी.

तसेच विषयांकित प्रकल्पाचा आवाका लक्षात घेता तसेच दैनंदिन देखरेख, कामाची मोजमापे, आवश्यक पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे याकरिता स्वतंत्ररित्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट यांची नेमणुक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे सहमतीने या संपूर्ण प्रकल्पासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट यांची नेमणुक करण्यात यावी. स्वतंत्र प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट नेमणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देणेकामी व इतर अनुषंगिक कामासाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २६** **श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ मोठी साईज (खाजगी दिनदर्शिका) छपाई बाबत.**

**निर्णय क्र.८७३.** मे मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई दि.१२.१०.२००६ चे पत्राअन्वये त्यांनी मागिल वर्षाप्रमाणे याहीवर्षी सन २००७ या वर्षासाठी श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ मोठी साईज छपाई करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. सदरची दिनदर्शिका कॉस्ट टु कॉस्ट ( ना नफा ना तोटा ) या तत्वावर करुन देणार असल्याचे कळविले आहे. मे मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांनी मागिल वर्षाचे दिनदर्शिकेसाठी चांगल्या प्रकारचा फोटो ग्राफ, डिझाईनचा वापर करुन कॅलेन्डर सुबक आकर्षक असे तयार केले होते, यानुसार मागिल वर्षाप्रमाणे चालू वर्षीही मे मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई हे श्री साईबाबा दिनदर्शिका मोठी साईज प्रती नग रुपये १६२/- या छपाई दराने २०,००० प्रती छपाई करुन देण्याची तयारी दर्शविली असून, यातील १०,००० नगांचा सुरुवातीस पुरवठा करणार असल्याचे कळविले आहे. यात मागणी वाढल्यास

पुन्हा ५,००० नगांची पुरवठा करणार असल्याचे त्यांनी कळविले आहे. उपरोक्त प्रमाणे चालू वर्षीही श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ छपाई करुन घेण्याचे ठरल्यास त्यास खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**(अ) दिनदर्शिका २००७ ( ८ पेजेस ) मोठी साईज २२"x३५"**

| एकूण दिनदर्शिका छपाई | छपाई दर प्रती नग | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|
| २०,००० नग | रुपये १६२/- | ३२,४०,०००/- |

सन २००४ मध्ये मे मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांनी ३,३०० कॅलेन्डर्स संस्थानला देणगी दिलेले होते. त्या कॅलेन्डर्सची किंमत प्रती नग रुपये २५०/- प्रमाणे संस्थानने विक्री केली असून, विक्री झालेली रक्कम संस्थानमध्ये जमा आहे. तसेच सन २००६ मध्ये दिनदर्शिका मोठी साईज २२" x३५" ची छपाई त्याचे दि.१५.०७.२००५ चे पत्राअन्वये मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ चे सभेतील विषय नं. ०७ निर्णय ७५६ नुसार २०,००० नग प्रती नग छपाई दर रुपये १५०/- या प्रमाणे जा.न्नं. एसएसएस/वशी/प्रकाशने/ १०५८६/२००५ दि.२४.०९.२००५ नुसार पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्यांचेकडून सदर दिनदर्शिकेची छपाई होईल २०,००० नगांपैकी त्यांचेकडून आवक झालेले १९४७५ नगांची विक्री तपशिल अहवाल खालील प्रमाणे अवलोकनार्थ सादर केला आहे.

| एकूण आवक | विक्री कालावधी | विक्री नग | विक्री दर रुपये | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १९४७५ | डिसेंबर २००५ ते ७ फेब्रुवारी २००६ पर्यंत | ६,१३३ | २५०/- | १५,३३,२५०/- |
| | ८ फेब्रुवारी २००६ ते २७ सप्टेंबर २००६ पर्यंत | १०,१९५ | १८०/- | १८,३५,१००/- |
| | २८ सप्टेंबर ते १३ ऑक्टोबर २००६ | १,३६४ | १००/- | १,३६,४००/- |
| | एकूण | १७,६९२ | | ३५,०४,७५० |

वरील तपशिलाप्रमाणे एकूण १९४७५ आवक नगांपैकी १७,६९२ नगांची वरीलप्रमाणे विक्री करण्यात येवून एकूण १२८ नग संभावना खाते खर्ची टाकण्यात येवून याप्रमाणे एकूण १७,८२० नगांची प्रतीपूर्ती होऊन अद्याप १,६५५ शिल्लक नगांची विक्री होणे बाकी आहे. मे. मॅग्ना ग्राफिक्स इंडिया लि., मुंबई यांनी त्यांचेकडील दि.१२.१०.२००६ चे पत्राद्वारे मागिल वर्षाप्रमाणे चालू वर्पीही सन २००७ साठी दिनदर्शिका छपाई करुन देण्याविषयी प्रस्ताव सादर करुन सदरचा छपाई आदेश "साईग्रेस फाऊंडेशन", मुंबई या त्यांचेद्वारा सुरु केलेल्या धर्मदाय संस्थेच्या नावाने छपाई आदेश देणेबाबत सुचित केले आहे.

मे. मॅग्ना ग्राफिक्स ( इंडिया) लि., मुंबई यांनी त्यांचे वरील संदर्भिय पत्राद्वारे श्री साईबाबांचे विविध आकारातील फोटोंचे कॅलेन्डर बाबत खालील तपशिलाप्रमाणे चालू वर्षी प्रथमतः निर्मिती केली असून, ते संस्थानला खरेदी करावयाचे असल्यास ना नफा ना तोटा या तत्वावर छपाई किंमतीचे दराने पुरवठा करण्याची तयार दर्शविली आहे.

**(ब)**

| **अ.नं.** | **तपशिल** | **एकूण छपाई** | **प्रती नगास छपाई दर रुपये** |
|---|---|---|---|
| ०१ | ३ डी श्री साईबाबांचे छाया चित्रीत पॉकेट कॅलेन्डर आकार -२.५ " X ३.५" | १०,००० | १२.५० |
| ०२ | ३ डी श्री साईबाबांचे नियमित कॅलेंडर आकार २३.५" X २३.७५" | ३,००० | १५००.०० |
| ०३ | ३ डी ए/४ साईजचे श्री साईबाबांचे कॅलेंडर आकार ८" X १२" | ३,००० | ४९०.०० |
| ०४ | ३ डी मोठ्या आकाराचे श्री साईबाबांचे पोस्टर आकार २७.५" X ३३.५" | २,००० | ७,७००.०० |
| ०५ | ३ डी मोठी साईजचे श्री साईबाबांचे बॅक लिट पोस्टर आकार २३.२५" X २९" | १,००० | ७,५०० |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा फक्त संस्थान प्रकाशित फोटोंचीच विक्री केली जाते. इतर खाजगी संस्थानद्वारा श्री साईबाबांचे फोटो, पोस्टर ची विक्री केली जात नाही. चालू वर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा दिनदर्शिका २००७ सिक्स शिटर व श्री साईबाबा दिनदर्शिका २००७ सिंगल शिट प्रकाशित करुन श्री साईभक्तांना विक्रीस उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे. मे.मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांचे द्वारा वरील "ब" यात दर्शविलेप्रमाणे त्यांनी त्यांचे संदर्भिय पत्रात नमुद केलेप्रमाणे फोटोंचे स्पेसिफिकेशन असल्याने त्यांचे कॅलेन्डर्स सुबक व आकर्षक असल्याने ते भक्तांना आकर्षक ठरतील.

तरी वरील "अ " यात नमुद केलेप्रमाणे मे. मॅग्ना ग्राफिक्स ( इंडिया) लि., मुंबई यांचे दि.१२.१०.२००६ चे पत्रात नमुद केलेप्रमाणे "साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई" या नावाने दिनदर्शिका मोठी साईज २०,००० नग प्रती नग रु.१६२/- मात्र प्रमाणे छपाई करुन घेणेस येणा-या एकूण रक्कम रुपये -३२,४०,०००/- (अक्षरी रुपये बत्तिस लाख, चाळीस हजार) मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता असावी. त्याची प्रति नग रु.१७५/- प्रमाणे विक्री केलेस रु.२,६०,०००/- संस्थानला मिळतील तसेच मे. मॅग्ना ग्राफिक्स ( इंडिया) लि., मुंबई द्वारा "ब" यात दर्शविलेप्रमाणे कॅलेन्डर, फोटो फ्रेम्स, संस्थानमार्फत विक्री करणेबाबत योग्य तो निर्णय होणेस विनंती आहे.

तरी वरील "अ" नुसार नमुद केलेप्रमाणे मागिल वर्षाप्रमाणे दिनदर्शिका २००७ मोठी साईज भक्तांना उपलब्ध करुन देणेकामी दिनदर्शिका मोठी साईज २०,००० नग प्रती नग रु.१६२/- मात्र प्रमाणे छपाई करुन घेणेस येणा-या एकूण रक्कम रुपये -३२,४०,०००/- (अक्षरी रुपये बत्तिस लाख, चाळीस हजार) मात्रचे खर्चास तसेच सदरचा छपाई आदेश

"साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई"  या नावाने देण्यास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्रकाशने प्रमुख)

वरील निर्णय क्र. ७८४ ते ८७३ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (भाऊसाहेब रा.वाकचौरे) | (जयंत मुरलीधर ससाणे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी | श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी |